# घटक -१

# नापास मुलांची गोष्ट

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ दुसऱ्या वेळी पास झालो - महात्मागांधी
१.३ वाटेवरच्या सावल्या - कुसुमाग्रज
१.४ संगमनेरचे दिवस - दया पवार
१.५ शंभरपैकी शुन्य मार्क - ना. सी. फडके
१.६ सरगम - सी रामचंद्र

## १.१ प्रस्तावना

'नापास मुलांची गोष्ट' ह्या ललित लेख संग्रह अरुण शेवते यांनी संपादित केला असून यातील केवळ दहा लेखच अभ्यासाला निवडले आहेत. त्यातील या घटकात पाच लेखांचा समावेश केला आहे तर उर्वरित पाच लेखाचा समावेश पुढील घटकात केला आहे.

## १.२ दुसऱ्या वेळी पास झालो - महात्मा गांधी

### १.२.१ परिचय :

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर, १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचा मृत्यू ३० जानेवारी, १९४८ रोजी दिल्ली या ठिकाणी झाला. १८८३ मध्ये वयाच्या १३ वर्षी गांधीजींचा विवाह कस्तुरबा माखनजी यांच्याबरोबर झाला. शालेय शिक्षण संपवून ते वयाच्या १९ व्या वर्षी १८१८ मध्ये इंग्लंडमध्ये वकिलीचे शिक्षण घेण्यास गेले. इंग्लंडमधून कायद्याचा अभ्यास करुन आल्यानंतर त्यांना काही दिवस भारतात वकिली केली. त्यानंतर काही वर्षांनी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला या चळवळीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. समाजाला त्यांनी सत्य, अहिंसा व सत्याग्रहाचा संदेश दिला. रविंद्रनाथ टागोरांनी त्यांना सर्वप्रथम 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यानंतर ते महात्मा गांधी म्हणून ओळखले जाऊ लागले. लोक त्यांना प्रेमाने बापू असे संबोधतात. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये त्यांना राष्ट्रपिता संबोधले. गांधीजींनी आयुष्यभर सत्य व अहिंसा या तत्त्वांचा पुरस्कार केला. इतरांनीही या तत्त्वाचा अवलंब करावा असे त्यांना वाटत होते. तसेच त्यांनी स्वतःही हे तत्त्व पूर्णतः अंगिकारले होते. आयुष्यभर त्यांनी 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्त्वांचा अवलंब केला आणि देशाला इंग्रजांच्या बंधनातून मुक्त केले. गांधीजींनी नवजीवन हरिजन, यंग इंडिया या नियतकालिकांचे संपादन करुन त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर लेखन केले. 'सत्याचे प्रयोग' हे त्यांचे आत्मकथन प्रसिद्ध आहे.

### १.२.२ दुसऱ्या वेळी पास झालो :

'दुसऱ्या वेळी पास झालो' हा लेख सिताराम पुरुषोत्तम पटवर्धन यांनी गांधीजींच्या 'सत्याचे प्रयोग' या आत्मकथनातून अनुवादित केला आहे. या लेखात गांधीजींनी आपल्या बालपणीच्या शालेय जीवनातील तसेच लंडन येथील काही आठवणी सांगितलेल्या आहेत. लहान वयातच लग्न झाल्याने त्या काळात त्यांना शालेय शिक्षणाचे एक वर्ष गमवावे लागले होते. तसेच इंग्लंडमध्ये असताना त्यांनी लॅटीन शिकण्यासाठी खासगी मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात प्रवेश घेतला होता. मॅट्रिक्युलेशनची परीक्षा दर सहा महिन्यांनी होत असे. मात्र प्रवेश घेतल्यानंतर त्यांना लॅटीन शिकण्यासाठी केवळ पाच महिन्यांचाच कालावधी मिळाला होता. एवढ्या छोट्या कालावधीत लॅटीन शिकणे अवघड होते. परिणामी ते लॅटीनमध्ये नापास झाले. थोडक्यात गांधीजींनी आयुष्यात अयशस्वी होऊन खचून मागे राहिले नाही, तर उलट आपल्यातील चांगल्या गुणांवर विश्वास ठेवत ते महात्मा या पदाला जाऊन पोहचले.

### १.२.३ प्रस्तावना :

महात्मा गांधीजींनी 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रातून आपल्या जीवनातील खडतर प्रवास वर्णन केले आहे. त्यांना आयुष्यातील अनेक बऱ्या-वाईट अनुभव सांगितले आहे. 'दुसऱ्या वेळी पास झालो' या लेखात त्यांनी त्यांच्या शालेय जीवनातील व लंडन येथील जीवनातील काही आठवणी सांगितल्या आहेत. आयुष्यात येणाऱ्या अडचणींला खचून जाण्याची वेळ आली, तरी गांधीजींनी नेहमी त्याच्यातून मार्ग काढून आपले आयुष्य अधिक चांगले बनविण्याचा प्रयत्न केला. आपल्या जीवनातील चांगल्या वाईट अनुभव या आत्मचरित्रातून कथन केला आहे. या आधारित हा लेख आहे.

### १.२.४ शालेय जीवनातील आठवणी :

महात्मा गांधींचजीचे वय साधारणतः सात वर्षे असताना त्यांच्या वडिलांची पोरबंदरहून राजकोटला बदली झाली, तेव्हा त्यांनी राजकोटच्या एका गावठी शाळेत प्रवेश घेतला. तेथे असताना त्यांची अभ्यासातील प्रगती अधिक चांगली होती असे नाही. राजकोट याठिकाणी गांधीजींनी त्यांच्या आयुष्यातील सुमारे ६ वर्षांचा कालावधी घालविला. गावठी शाळेपासून ते मुख्य शाळा व तेथून हायस्कूल असा त्यांचा शालेय प्रवास राजकोट या ठिकाणी झाला. त्यादरम्यानच्या काही आठवणी गांधीजी सांगतात. तेथे असेपर्यंत त्यांनी कधीही शाळेत शिक्षकांशी 'लबाडी' केली नाही, तसेच कोणत्याही मित्राशी आपली मैत्री तोडली नाही. शाळेत असताना त्यांनी अभ्यासाव्यतिरिक्त दुसरे कोठेही लक्ष दिले नाही. शाळेत असेपर्यंत त्यांचे काम आणि ते असा दिनक्रम होता. शाळा संपताच ते कोणाशीही बोलत उभे न राहता लगेचच घरी जात असे. कारण कोणत्याही विद्यार्थ्यांने आपली थट्टा करु नये अशी भिती नेहमीच त्याच्या मनात होती. राजकोटच्या हायस्कूलमधील एक प्रसंग ते या ठिकाणी आवर्जुन सांगतात. पहिल्याच वर्षी परीक्षा चालू असतना शाळा खात्याचे इन्स्पेक्टर "जाइल्स" हे शाळा तपासण्यासठी आले होते. त्यांनी पहिल्या इयत्तेच्या मुलांना इंग्रजी पाच शब्द लिहायला दिले होते. त्यातील एक शब्द गांधीजींनी चुकीचा लिहिला होता. वर्गातील मास्त त्यांना समोरच्या विद्यार्थ्यांचे पाहून बरोबर लिही, असा इशारा करीत होते. मात्र शिक्षकांविषयी आदरभाव असल्याने ते आपणांस कॉपी करण्यास प्रवृत्त करणार नाहीत असा समज त्यांचा झाला.

**१.२.५ कसरतीच्या तासाला गैरहजर :**

गांधीजी सहाव्या इयत्तेत असताना दारोबजी एदलजी गिमी हे हेडमास्तर होते. त्यांनी 'वरच्या इयत्तांसाठी' कसरत व क्रिकेट आवश्यक केले होते. गांधीजींच्या भिडस्त स्वभावामुळे ते कधीही कोणत्याही खेळामध्ये सहभागी होत नव्हते. परिणामी त्यांना कसरतीसाठी वेळ देण्यास कंटाळा येई. याखेरीज वडिलांची सेवा करण्याची इच्छा असल्यामुळेही त्यांना कसरतीस जाण्याचा कंटाळा येत असे. शिवाय 'कसरतीचा शिक्षणाशी कोणताही संबंध नाही' असा त्यांचा चुकीचा समज झाल्यामुळे कसरतीसाठी टाळाटाळ करीत असे. एकेदिवशी शनिवारी सकाळची शाळा होती व कसरतीसाठी संध्याकाळी चार वाजता शाळेत गांधीजींना जायचे होते. त्यांच्याजवळ घड्याळ नव्हते. त्यामुळे आकाशातील सूर्याची स्थिती लक्षात घेऊन ते कसरतीला जात असे. मात्र त्या दिवशी आकाशात ढग दाटून आल्यामुळे त्यांना वेळेचा अंदाज आला नाही. त्यामुळे ते उशिरा शाळेत पोहचले तोपर्यंत कसरतीची वेळ संपली होती. परिणामी त्यांची त्यादिवशी कसरतीसाठी गैरहजेरी लागली. दुसऱ्या दिवशी गिमी सरांनी हजेरी तपासल्यानंतर त्यांना समजले की, गांधीजी कसरतीसाठी गैरहजर होते. त्यांना खरे कारण विचारले असता त्यांनी आहे ती परिस्थिती मास्तरांना सांगितली. मात्र मास्तरांना ही गोष्ट खरी वाटली नाही. त्याबद्दल गांधीजींना एक की दोन आणे दंड बसला. त्यादिवशी गांधीजींनी ठरविले की, 'सत्य बोलणाऱ्याने व सत्य आचरणाऱ्याने गाफीलही राहता कामा नये?' त्यांनी 'तो दंड माफ करवून घेतला व कसरतीतून ही मोकळीक मिळवून मिळालेला वेळ वडिलांच्या सेवेसाठी घालविला.'

**१.२.६ लग्नानंतर शिक्षणावर झालेला परिणाम :**

हायस्कूलमध्येच शिकत असताना गांधीजींचा वयाच्या तेराव्या वर्षी बालविवाह लावून देण्यात आला होता. त्यावेळी त्यांच्यासाठी लग्न म्हणजे चांगले-चांगले पदार्थ खायचे व नवीन कपडे घालायचे एवढाच अर्थ अभिप्रेत होता. त्यांच्यासोबतच त्यांच्यापेक्षा एका वर्गाने पुढे असणाऱ्या बंधूचा विवाह ही संपन्न झाला होता. मात्र या विवाहामुळे दोघांनाही त्यांच्या शालेय जीवनातील एक वर्ष फुकट वाया घालवावे लागले होते. याठिकाणी गांधीजी असे नमूद करतात की, 'विद्याभ्यास आणि विवाह या दोन्ही गोष्टी हिंदूसमाजामध्ये एकत्र आढळतील' मात्र या दोन्ही गोष्टींच्या एकत्रिकरणामुळे कितीतरी तरुणांवर याचा अनिष्ट परिणाम होत आहे. गांधीजींचे एक वर्ष वाया गेले, तरी त्यांनी पुढे जाऊन एकाच वर्षी दोन इयत्तांचा अभ्यास केला व आपले वर्ष भरुन काढले. (त्यावेळी विद्यार्थ्यांना नापास झाल्यास एकाचवेळी दोन वर्ष भरुन काढण्याची संधी मिळत असे.), मात्र विवाहानंतर त्यांच्या बंधूची शाळा कायमचीच बंद झाली.

**१.२.७ शिक्षणातील हस्ताक्षराचे महत्त्व :**

'दुसऱ्या वेळी पास झालो' या लेखात गांधीजींनी आयुष्यात आणि शिक्षणात सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व कसे आहे यासंदर्भात एक आठवण सांगितलेली आहे. 'शिक्षणामध्ये हस्ताक्षर चांगले लिहिण्याची जरुरी नाही' असा काहीसा गैरसमज गांधीजींचा झाला होता. मात्र दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतर तेथील वकिलांची व नवयुवकांची सुंदर व मोत्यासारखी अक्षरे पाहिल्यानंतर त्यांना त्यांच्या हस्ताक्षराची लाज वाटू लागली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, 'खराब अक्षर हे अर्धवट शिक्षणाची निशाणी असली पाहिजे'. नंतर त्यांनी अक्षर सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र त्यामध्ये त्यांना सफलता प्राप्त झाली नाही. त्यामुळे ते सर्वच युवक-युवतींना संदेश देतात की, सुंदर अक्षर हा एक शिक्षणाचा महत्त्वाचा घटक आहे. अक्षर सुधरविण्याचे काम एका विशिष्ट वयातच होऊ शकते. त्यामुळे त्यांच्या उदाहरणावरुन सर्वांनी सावध होऊन सुंदर अक्षरासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

munotes.in

### १.२.८ मित्रांच्या संगतीने वाईट सवयी लागल्या :

मित्रांच्या संगतीने गांधीजींच्या हातून चोरीचा गुन्हा घडला होता! विड्यांची थोटके, चाकरांचे पैसे यांसारख्या गोष्टींची चोरी गांधीजींनी केली होती. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या हातून जो चोरीचा गुन्हा घडला तो अतिशय भयंकर होता असे गांधीजी सांगतात. गांधीजींच्या बंधूंवर साधारणतः पंचवीस रुपयांचे कर्ज झाले होते. ते कर्ज कसे फेडायचे या चिंतेत असतानाच त्यांना एक कल्पना सुचली. त्यांच्या बंधूंच्या हातात एक सोन्याचे भरीव कडे होते, त्या कड्यातून एक तोळा सोने कापून घेणे कठीण नव्हते. शिवाय कड्यातून सोने कापून घेतल्याचा संशयही कोणालाही येणार नव्हता कारण कडे भरीव होते. कड्यातून सोने कापून घेऊन त्यांनी कर्जफेड तर केली; मात्र चोरी करण्याची ही सल त्यांच्या मनामध्ये त्यांना नेहमीच बोचत राहिली. केलेल्या चोरीची वडिलांजवळ कबुली दिली पाहिजे असे त्यांना सतत वाटत होते. मात्र वडील आम्हां दोघांना काही बोलण्यापेक्षा व मारण्यापेक्षा ते स्वतःला काही त्रास करुन घेतील अशी गांधीजींच्या मनात भीती होती. तरीदेखील त्यांनी धाडस करुन पत्राद्वारे झालेल्या गुन्ह्याची कबुली दिली. तसेच वडिलांनी स्वतःला त्रास करुन घेऊन नये असे देखील पत्रात लिहिले. अशा प्रकारचा गुन्हा परत होणार नाही अशी शपथ देखील घेतली, चिठ्ठी वाचून वडिलांना झालेले दुःख गांधीजी अजूनही विसरु शकत नाहि असे ते सांगतात.

### १.२.९ संस्कृत विषयाची आवड :

चौथ्या इयत्तेमध्ये जेव्हा युक्लिडच्या तेराव्या प्रमेयाशी गांधीजींची ओळख झाल्यानंतर त्यांना भूमिती विषयात गोडी निर्माण झाली होती व भूमितीसारखा दुसरा कोणताही सोपा विषय नाही. असे त्यांना वाटू लागले. भूमितीबरोबरच गांधीजींची ओळख संस्कृत या विषयाशी झाली. मात्र संस्कृताशी त्यांची गट्टी काही बसत नाही. शेवटी सहाव्या इयत्तेत आल्यानंतर त्यांनी संस्कृत हा विषय सोडण्याचा निर्णय घेतला. याखेरीज संस्कृत विषय शिकविणारे शिक्षक हे कडक शिस्तीचे होते, तर फारसी शिकविणारे मौलवी हे गरीब होते. 'आहे त्या गोष्टीवर' ते चालवून घेत असत. तसेच फारसी फार सोपेही आहे हे पाहून गांधीजींनी फारशीच्या वर्गात जाऊन बसण्याचा निर्णय घेतला. हे पाहून त्यांच्या संस्कृत विषयाच्या शिक्षकांना दुःख झाले. त्यानंतर त्यांच्या शिक्षकांनी त्यांना बोलावून संस्कृत विषयाचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांना संस्कृत शिकताना येणाऱ्या अडचणीही ते दूर करतील असे गांधीजींना आश्वासन दिले. शिक्षकांची ही आपल्या प्रतीची तळमळ पाहून गांधीजींनी पुन्हा संस्कृत शिकण्यास प्रारंभ केला. त्यावेळी ते जेवढे संस्कृत शिकले त्यामुळे त्यांना आज संस्कृत शास्त्राची गोडी वाटते. मात्र संस्कृतला पुरेसा अभ्यास न केल्याची खंत ही त्यांच्या मनाला नेहमीच बोचत राहते असे गांधीजी याठिकाणी नमूद करतात.

### १.२.१० पुढील शिक्षणासाठी लंडन रवाना :

गांधीजींना पहिले अपत्य झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी विलायतला जाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ते मुंबईला आले. मात्र जून-जूलै महिन्यांमध्ये हिंदी महासागरात तुफान असते अशी माहिती त्यांच्या तेथील मित्रमंडळींनी दिली. शिवाय ही गांधीजींची पहिलीच समुद्रावरील सफर असल्यामुळे त्यांनी दिवाळीनंतर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात विलायतेस जाण्याचे ठरविले. तोपर्यंत त्यांचा मुक्काम हा मुंबईतच असणार होता. गांधीजींना मुंबईला सोडायला आलेले त्यांचे वडीलबंधू त्यांना मुंबईत ठेवून परत राजकोटला गेले. जाताना त्यांच्या एका मेव्हण्यापाशी गांधीजींसाठी पैसे ठेवून गेले. तसेच इतर मित्रांजवळ त्यांच्यासाठी मदतीची शिफारसही करुन गेले. गांधीजी विलायतेला जाणार याची माहिती ज्ञातीमध्ये सर्वदूर पसरली व

गांधीजींनी विलायतेला जाऊ नये यासाठी ज्ञातीची सभा बोलाविण्यात आली. ज्ञातीचे प्रमुख व गांधीजींच्या वडिलांचे चांगले स्नेहसंबंध होते. त्यांनी गांधीजींना सांगितले की, 'आपल्या धर्मामध्ये समुद्र ओलांडून जाण्याची परवानगी नाही. तसेच विलायतेस गेल्यानंतर आपणास आपला धर्म सांभाळता येत नाही. म्हणून विलायतेस जाण्याचा निर्णय बदलावा', मात्र गांधीजींनी मोठे धैर्य दाखवून आपला विलायतेला जाण्याचा निर्णय ठाम आहे असे सांगितले. तसेच विलायतेस गेल्यावर मी धर्मपालन करेल, असे देखील त्यांनी ज्ञातीच्या सभेसमोर बोलून दाखविले. त्यांना त्यांच्या आईची व बंधूची विलायतेला जाण्यासाठीची परवानगी मिळाली आहे असे देखील गांधीजींनी सर्वांना सांगितले. मात्र ज्ञाती व गांधीजी दोघेही आपापल्या निर्णयावर ठाम होते. परिणामी ज्ञातीने गांधीजींना ज्ञातीबहिष्कृत केले व त्यांना जे लोक मदत करतील त्या लोकांना सव्वा रुपया दंड आकारण्यात येईल, असा निर्णय ज्ञातीसभेने घेतला. या निर्णयानंतरही गांधीजींनी आपला ध्यास सोडला नाही.

ज्ञाती सभेच्या निर्णयानंतर ४ सप्टेंबर रोजी जुनागडचे एक वकील त्र्यंबकराय मजुमदार हे बॅरिस्टर होण्यासाठी बोटीने विलायतेला जाणार असल्याची बातमी गांधीजींना मिळाली. ही बातमी मिळताच त्यांच्या बंधूनी ज्या मित्रापाशी गांधीजींची शिफारस केली होती त्या मित्राला गांधीजी भेटले. त्यानेही गांधीजींना सांगितले की, तू त्र्यंबकरायांची सोबत चूकवू नकोस. त्यानंतर गांधीजींनी त्यांच्या बंधूंना तार करुन विलायतेला जाण्याची परवानगी मागितली, त्यांनी लगेचच गांधीजींना परवानगी दिली. जातीच्या हुकूमामुळे त्यांच्या मेव्हण्यांनी त्यांना पैशाची मदत केली नाही. शेवटी एका मित्राकडून भाड्याला लागणारे पैसे गांधीजींनी घेतले व विलायतेला तिकीट काढले. इतर मित्रमंडळीनी विलायतेला जाण्याची सर्व तयारी गांधीजींना करुन दिली. विलायतेला जायचे म्हणून गांधीजींना त्यांच्या नावडतीचा पोषाखही परिधान करावा लागला. त्र्यंबकराय यांच्याच खोलीत गांधीजींची व्यवस्था करण्यात आली. गांधीजींची काळजी घ्या असे मित्रांनी त्र्यंबकरायक यांना सांगितले. त्र्यंबकराय यांनीही आश्वासन दिले व गांधीजींनी वयाच्या १८ व्या वर्षी ४ सप्टेंबर, १८८८ रोजी विलायतेकडे प्रस्थान केले.

### १.२.११ लंडन येथील राहणीमान व अनुभव :

हिशोब ठेवण्याच्या त्याच्या या सवयीचा त्यांना पुढील आयुष्यातही फायदा झाला. म्हणून ते तरुणांना सांगतात की, मिळणाऱ्या प्रत्येक पै न पैसा हिशोब ठेवल्यास भविष्यात प्रत्येकालाच फायदा होऊ शकतो. सतत ठेवलेल्या हिशोबामुळे गांधीजींना आपण आयुष्यात कोठे जास्त खर्च करीत आहोत हे लक्षात आले, सुरुवातीला गांधीजी एका कुटुंबासोबत राहत होते. तेथून कॉलेपर्यंतचा गाडी-भाड्याच्या खर्च हा वाजवीपेक्षा जास्त होता. याशिवाय कुटुंबात राहत असल्यामुळे आठवड्यातून एकदा बाहेर जेवायला नेण्याचा शिष्टाचार पाळतानाही गांधीजींचा बराच खर्च होत असे. कुटुंबाबरोबर मेजवाणीस गेल्यास गाडीभाड्याचा खर्च तसेच कधीतरी सोबत मुलगी असल्यावर तिचाही करावा लागणारा खर्च हा अधिक होता. म्हणून गांधीजींनी कुटुंबात राहण्याऐवजी बाहेर स्वतःची खोली घेऊन राहण्याचा निर्णय घेतला. घर घेताना त्यांनी कामाच्या जागी अर्ध्यातासात चालत पोहचता येईल अशा ठिकाणी घेतले. त्यामुळे येण्याजाण्याच्या गाडी खर्च वाचला व शिवाय चालण्याफिरण्याने लंडनच्या प्रतिकूल वातावरणात त्यांचे शरीरस्वास्थ टिकून राहण्यास मदत झाली. तसेच त्यांच्या खर्चात निम्याहून अधिक कपातही झाली. गांधीजींनी राहण्यासाठी दोन खोल्यांचे घर घेतले होते. एक खोली बसण्या-उठण्यासाठी, तर दुसरी झोपण्यासाठी. मात्र लंडनमध्ये शिकत असलेले अनेक विद्यार्थी आपल्यापेक्षा ही अधिक साधे राहत आहेत हे गांधीजींच्या लक्षात आल्यावर त्यांनी दोन

खोल्यांऐवजी एका खोलीत राहण्याचा निर्णय घेतला. तसेच बाहेर जेवण्यापेक्षा घरीच स्वयंपाक बनवून खर्चात कपात करता येईल हे देखील गांधीजींच्या लक्षात आल्याने ते सकाळ संध्याकाळचा स्वयंपाक घरीच करु लागले व दुपारचे जेवण बाहेर करु लागले अशारीतीने गांधीजींनी दररोजचे जेवळ केवळ एक ते सव्वा शिलिंगमध्ये भागविले व स्वतःच्या जीवनात अधिकाधिक साधेपणा आणण्याचा प्रयत्न केला.

### १.२.१२ समारोप :

वरीलप्रमाणे गांधीजींनी आपल्या शालेयक जीवनातील व विलायतेत घालविलेल्या दिवसांच्या आठवणी सांगितल्या आहेत. अनेक बऱ्या वाईट प्रसंगातून गांधीजींचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. जीवनात आलेल्या वाईट अनुभवातूनही त्यांनी चांगली शिकवण आत्मसात केली व सर्व जगासमोर एक चांगला आदर्श निर्माण केला.

## १.३ वाटेवरच्या सावल्या - कुसुमाग्रज

### १.३.१ परिचय :

कुसुमाग्रज यांचे मुळ नाव गजानन शिरवाडकर असे होते. पण त्यांच्या काकांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णु वामन शिरवाडकर झाले. त्यांचा जन्म पुण्यात २७ फेब्रुवारी, १९१२ रोजी झाला. पिंपळगाव येथे प्राथमिक शिक्षण, नाशिकमध्ये माध्यमिक शिक्षण व मॅट्रीक, पदवीधर हे मुंबई विद्यापीठातून झाले. बी.ए.ची पदवी संपादन केल्यानंतर काही काळ ते चित्रपट क्षेत्रात पटकथा लिहित होते. तसेच विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणूनही त्यांनी कार्य केले. त्यानंतर मराठी साहित्यातील एक यशस्वी लेखक म्हणून किर्ती त्यांनी मिळविली. तसेच त्यांनी काही पाठ्यपुस्तकांचेही संपादन केले आहे आणि संयुक्त महाराष्ट्रांच्या आंदोलनातही सक्रिय सहभाग घेतला होता. कुसुमाग्रज या नावाने त्यांनी काव्यलेखन केले. 'विशाखा', 'किनारा', 'जीवनलहरी', 'मुक्तायान', 'पाथेय', 'मराठी माती', 'स्वगत', 'हिमरेषा' आणि 'वादळवेल' हे त्यांचे काही प्रसिद्ध कवितासंग्रह आहेत. तसेच त्यांनी बरीच नाटकेही लिहिली, त्यापैकी 'नटसम्राट', 'वीज म्हणाली धरतीला', 'दूरचे दिवे', ही काही प्रसिद्ध नाटके आहेत. 'वैळाव', 'जान्हवी', 'कल्पनेचा तिरावर' या त्यांच्या काही प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. तसेच त्यांनी 'फुलवाली', 'सतारीचे बोल' आणि इतर कथा, 'काही वृद्ध काही तरुण' व 'निवडक बारा कथा' असे कथासंग्रह लिहिले आहेत. त्यांनी मांडगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यांना साहित्य क्षेत्रात मानाचे स्थान असणाऱ्या ज्ञानपीठ या पुरस्काराने १९८८ साली सन्मानित करण्यात आले. तसेच १९९१ साली पद्मभूषण हा पुरस्कारही त्यांना मिळाला. याशिवाय अनेक पुरस्कार त्यांच्या साहित्याला प्राप्त झाले. अशा या थोर साहित्यिकाचे निधन नाशिक येथे १० मार्च, १९९९ रोजीझाले.

### १.३.२ वाटेवरच्या सावल्या :

'वाटेवरच्या सावल्या' या लेखात कुसुमाग्रज यांनी आपल्या लहानपणीच्या आठवणी सांगितल्या आहेत. अभ्यासात सर्वसाधारण गती असणारे कुसुमाग्रज हे अभ्यासाव्यतिरिक्त इतर विषयांचे लेखन-वाचन, नाटक, क्रिकेट यात अधिक रममाण होत असत. शालेय जीवनात गणित हा त्यांच्या आवडीचा विषय नव्हता. त्यामुळे महाविद्यालयात गणित विषयात ते नापास झाले. परिणामी त्यांचे एक वर्ष वाया गेले. त्याचे त्यांच्या वडिलाना खूप वाईट वाटले होते. वडिलांना

होणारा त्रास बघून त्यांनी अधिक जोमाने अभ्यासाला सुरुवात केली आणि ते पास झाले. पुढे त्यांनी मराठी व इंग्रजी हे विषय घेऊन बी.ए. ची पदवी संपादन केली. एक कवी, लेखक व नाटककार म्हणून आपली ओळख निर्माण केली. अशाप्रकारे परिस्थितीवर मात करुन ते यशस्वी लेखक व कवी बनले. म्हणजेच आपल्याला अपयश आले तरी त्यानंतर आपण आपल्या आवडीच्या विषयामध्ये यश मिळवू शकतो हे कुसुमाग्रजांनी दाखवून दिले.

### १.३.३ प्रस्तावना :

कुसुमाग्रज हे नामवंत कवी, कथाकार, नाटककार, कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून सर्व परिचित आहे. 'वाटेवरच्या सावल्या' या लेखातून निदर्शनास येते की, सुरुवातीला अपयशी ठरलेला मुलगा नामवंत लेखक बनतो व अवघे मराठी साहित्यविश्व व्यापून टाकतो. गणित विषयाची आवड नसल्याने कुसुमाग्रज हे नापास झाले; परंतु त्या अपयशाने खचून न जाता आपल्या आवडीचे विषय घेऊन ते यशस्वी झाले. या लेखात त्यांनी लहानपणी घडलेले प्रसंग आठवणीच्या स्वरुपात मांडले आहेत. त्यातून एका लेखकाची जडणघडण कशी होत गेली याची प्रचिती आपल्याला येते.

### १.३.४ शालेय जीवनातील अडचणी :

नाशिकपासून अठरा-एकोणीस मैलांच्या अंतरावर असलेल्या पिंपळगाव या ठिकाणी कुसुमाग्रज आपल्या कुटुंबीयांसोबत राहत होते. त्यांचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण हे पिंपळगावातील मराठी शाळेतच झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना नाशिक येथे पाठविण्यात आले होते. यापूर्वीही त्यांचे नाशिकला सुट्ट्यांच्या निमित्ताने मामाच्या घरी येणे जाणे होत असे; परंत आता मात्र पुढील शिक्षणासाठी त्यांना येथेच राहावे लागणार होते. त्या काळात प्रवेश नाशिक शहरातील प्रमुख माध्यमिक विद्यालय असलेल्या सरकारी हायस्कूलमध्ये त्यांचा प्रवेश घेण्यात आला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर, कॉ. डांगे हे त्या विद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. त्या विद्यालयाची दगडी इमारत प्रशस्त डौलदार होती. तसेच सभोवताली विशाल मैदान होते. या शाळेभोवती असणारे मैदान फक्त मोकळे मैदान नसून हजार मुले व्यवस्थित खेळू शकतील असे सर्व प्रकारच्या खेळांची व्यवस्था असलेले मैदान होते. यावरुन शालेय जीवनात अभ्यासाबरोबर खेळही त्या काळात किती महत्त्वाचा होता हे लक्षात येते. या शाळेतील वातावरण शिस्तीचे होते. या शाळेची तिसरी घंटा झाली की, शाळेच्या आवारात कुणीही आढळत नसे. त्यामुळे कुसुमाग्रजांना शाळेचे वातावरण भावनाशून्य वाटत असे. तसेच त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे राहणीमानही त्यांच्यापेक्षा वेगळे होते. म्हणून त्यांना एकटेपणाही जाणवत होता. त्याचप्रमाणे शाळेतील शिक्षक शिकविण्यात कुशल होते; परंतु त्यांची शिकविण्याची पद्धती ही लेखकासाठी वेगळी होती. लेखकाला अशा शिस्तप्रिय व वेगळ्या वातावरणाची सवय नव्हती. कारण लेखक चौथीपर्यंत गावाकडील ज्या शाळेत होते, त्या शाळेचे वातावरण शहरातील शाळेपेक्षा अगदी वेगळे होते. गावाकडील शाळेत त्यांचे खूप मित्र होते. तसेच वकिलांचा मुलगा म्हणून शिक्षक त्यांना अधिक महत्त्व देत असे. मुख्य म्हणजे कधी शाळा असह्य झाली, तर घर जवळ असल्याने घरीही जाता येत होते. तसेच नदीही जवळ असल्याने नदीकाठी मोराची पिसे शोधण्यासाठी जाता येत असे. त्यामुळे अचानक नाशिकमधील मोठ्या शाळेत आल्यावर तेथील वातावरणाविषयी त्यांच्या मनात एक प्रकारची भिती निर्माण झाली होती. मात्र असे असले तरी लेखक हळूहळू या शाळेतील वातावरणात रुळले तसेच याच शाळेतील पाच वर्षात त्यांच्या जीवनाला नवीन वळण लागले. वाङ्मयासंबंधीचे विशेषतः काव्यासंबंधीचे पूर्ण आयुष्याला व्यापून टाकणारे प्रेम लेखकाच्या मनात याच काळात निर्माण झाले होते. तसेच एक नट म्हणूनही प्रथम ते

येथेच सर्वांसमोर आले होते. एक विद्यार्थी म्हणून ते सर्वसाधारण होते. गणित विषयात त्यांना जास्त रस नव्हता पण इतर विषयात ते ठिक होते; परंतु अभ्यासाव्यतिरिक्त क्रिकेट, नाटक, लेखन, वाचन स्वच्छंदी फिरणे यामध्ये त्यांना अधिक रस होता. अशा प्रकारे याच शालेय जीवनात त्यांच्या आयुष्याला एक वेगळे वळण लागले.

### १.३.५ नाट्य या साहित्य प्रकाराचा परिचय :

नाशिकच्या उत्तर दिशेला सप्तशृंग नावाचा डोंगर असून या डोंगराच्या पायथ्याशी वणी गाव आहे. हे गाव लेककांच्या घरच्यासाठी महाबळेश्वर-माथेरान होते. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये ते वणीला जात असत. त्या ठिकाणी एक इनामदारी वाडा होता, ज्यात इनामदारी वैभवाच्या व इतिहासाच्या जीर्ण खुणा कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे इकडे तिकडे लोंबत होत्या. त्या वाड्यात गेल्यावर लेखकाला भूतकाळात जात असल्याचे वाटत होते. तेथे एक छोटेसे ग्रंथालय होते. त्या ग्रंथालयात अडीच-तीनशे पुस्तके एका कपाटात होती. या कपाटाचे कुलूप लेखक सुट्टीला आल्यावर उघडले जात असे. चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून सुरस ग्रंथमालेच्या कादंबऱ्या अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांचा समावेश या कपाटातील पुस्तकांमध्ये होता. या ग्रंथालयात लेखकाची नाटकांशी ओळख वाङ्मयीन स्वरुपात झाली. या नाटकामध्ये राम गणेश गडकरी यांची नाटके होती. त्यामुळे 'वेरुळची लेणी पहावयास गेल्यावर तेथे कैलास पर्वताचे दर्शन व्हावे' असे त्यांना वाटते. जी नाटके ते वाचत होते, त्यातले सारेच त्यांना समजत होते असे नाही; परंतु त्यातून मिळणारा अपूर्व आनंदाचा अनुभव ते नव्याने घेत होते. या पुस्तकांमधील नाटक वाचून ती साभिनय करण्याचा प्रयत्न लेखक रोज करु लागले. वाड्याच्या गच्चीवरुन सप्तशृंग डोंगर हाकेच्या अंतरावर असल्यासारखा वाटायचा. संभाजीची किंवा सुधाकराची भाषणे लेखक उच्च स्वरात त्यास ऐकवत असे आणि तो ही आपण साबाजी किंवा रामलाल असे समजून शांतपणे ऐकत असे लेखक सांगतात.

### १.३.६ 'कविता' या साहित्यप्रकाराची आवड :

लेखक मॅट्रिकच्या वर्गात जाण्यापूर्वीच त्यांचे नव साहित्याचे वाचन बऱ्यापैकी झाले होते. त्यांना जे-जे नवसाहित्य मिळत गेले ते-ते साहित्य ते वाचत गेले. त्यामध्ये गो.गो. दातार, ह.ना. आपटे, नाथ माधव गडकरी, बालकवी यांचे साहित्य तसेच भारत गौरव ग्रंथमाला, सुरस ग्रंथमाला या साहित्याचा समावेश होता. त्याचप्रमाणे त्यांची आधुनिक भाव कवितेशी तोंड ओळख होती; परंतु त्यातील खरे मर्म काय आहे हे जाणून घेण्याची संधी त्यांना सहावीत असताना पुरोहित सरांमुळे मिळाली. एकदा पुरोहित सर जादा तास घेण्यासाठी वर्गावर आले व त्यांनी तांबे यांची 'वारा' ही कविता शिकविण्यास सुरुवात केली. तेव्हा लेखकांना संतपंताच्या कक्षेपलीकडे जाऊन आधुनिक भावकविता कशी वाचावी ती कशी समजून घ्यावी, तसेच तिच्यात असणाऱ्या रस सौंदर्याचा आस्वाद कसा घ्यावा याची खरी प्रचिती आली. यापुर्वीही त्यांनी हस्तलिखित अंकासाठी पद्यलेखन केले होते. त्यामध्ये राघोबाचा पराक्रम, नारायणरावांचा वध, सिंहगड हे विषय कुशलतेने मांडलेले होते. त्यामुळे शार्दुल विक्रीडित, शिखरिणी, पृथ्वी या वृत्तांचा योग्य ठिकाणी वापर करणेही त्यांना जमत होते. तसेच पुरोहित सरांच्या या काव्य समजवून सांगण्याच्या शिकवणीमुळे तर ते अधिकच काव्याकडे आकर्षित झाले. वार्षिक परीक्षा झाल्यावर मात्र, वर्गशिक्षक म्हणून पुरोहित सरांशी संबंध संपला होता. त्यामुळे त्यांना वाईट वाटत होते व त्यांनी जाताना निरोपाची कविता त्यांच्या हातात दिली. पुढील काळात लेखन क्षेत्रात लेखक म्हणून कार्यरत असताना त्यांना पुरोहित सरांनी आपल्या शाळेतील प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित केले होते. खूप वर्षे झालीतरी त्यांच्यात थोडासाही बदल झाला नव्हता. मात्र सरांशी बोलताना

'वारा' शिकविणारे इतिहासाच्या कथा रंगवून सांगणारे सर थोडेसे कुठेतरी हरविल्याची जाणीव लेखकाला झाली होती.

### १.३.७ कुसुमाग्रजाचे नाट्यलेखन :

वणीला सतत दोन-चार वर्षे उन्हाळ्याच्या सुट्टीत येणे होत होते. त्या काळात लेखकांच्या मनात नाटक अधिक खोलवर रुतून बसले. नाटकाबरोबर इतर साहित्याचेही ते वाचन करत होते; परंतु त्यामध्ये नाटकाइतकी गोडी वाटत नव्हती. ठराविक मुखवटे आणि नाट्यप्रसंगांची छायाचित्र असलेले नाट्यपुस्तक पाहिले की, त्यांच्या मनावर पुलक चढल्यासारखे त्यांना वाटे. जेव्हा गंधर्व नाट्य प्रयोगाचे नाट्य पुर्ण वृत्तांत पुणे किंवा मुंबई येथून आलेले पाहुणे सांगत तेव्हा ते किती ऐकावे किती नाही असे त्यांना होत. नाट्याविषयी असलेल्या प्रेमातून नाट्यलेखन करणे तर साहजिकच होते. तेव्हा योगसंन्यास किंवा धर्मसंन्यास नावाचे नाटक त्यांनी लिहिले. जेवढी उत्तमरितीने नाटकाची निर्मिती होणे अपेक्षित होते. तेवढी चांगलि नाट्यनिर्मिती त्यावेळी झाली नाही. या नाटकातील प्रमुख पात्र योगेश्वर होते. या नाटकाची भाषणे ही गडकऱ्यांच्या नाटकातील वाक्यावरुन तयार केली होती. या नाटकाचे थोडेच प्रयोग झाले. त्यानंतर बरेच दिवस त्यांनी नाट्यलेखन केले नाही. कारण त्यानंतर आपण कवी आहोत याची प्रचिती त्यांना आली होती.

### १.३.८ सारांश :

मराठी साहित्यातील ज्येष्ठ लेखक वि.वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांनी मराठी साहित्याला फार मोठे योगदान दिले आहे. त्यांनी सर्वच साहित्य प्रकारात लेखन केले असेल ही. काव्य आणि नाटक या साहित्यप्रकारात त्याचे लेखन अधिक आहे. २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिवस मराठी राज्य भाषा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. मराठी साहित्य क्षेत्रातील नामांकित पुरस्कार कुसुमाग्रजांना प्राप्त झाले आहेत.

## १.४ संगमनेरचे दिवस - दया पवार

### १.४.१ परिचय :

दया पवार यांचे खरे नाव दगडू मारुती पवार होते. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर, १९३५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील धामणगाव या खेड्यात झाला व त्यांचा मृत्यू २० सप्टेंबर, १९९६ रोजी झाला. दया पवार हे मराठीतील नामांकित साहित्यिक आहेत. मराठी दलित साहित्यातील ते अग्रणी साहित्यिक म्हणून ओळखले जातात. 'कोंडवाडा' या त्यांच्या कविता संग्रहाला राज्यसरकारचा पुरस्कार मिळालेला आहे. 'चावडी', 'जागल्या', 'पासंग' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहे. 'धम्मपद' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. याखेरीज त्यांनी 'पाणी कुठवर आलं गं बाई' व 'विटाळ' हे वैचारिक साहित्यही प्रसिद्ध झाले आहे. विटाळचा 'बीस रुपये' हा हिंदी अनुवाद देखील प्रसिद्ध आहे. 'बलुतं' या त्यांच्या आत्मचरित्राला महाराष्ट्र सरकारचा १९७९ साली उत्कृष्ट वाङमयासाठीचा पुरस्कार मिळालेला आहे. 'बलुतं' हे दया पवारांचे आत्मकथन अनेक भारतीय भाषांमध्ये झालेले आहे. दया पवारांच्या या आत्मकथनाने मराठी दलित साहित्याची पाऊलवाट निर्माण केली. याखेरीज दया पवार यांना भारत सरकारने १९९० साली "पद्मश्री" या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

munotes.in

### १.४.२ संगमनेरचे दिवस :

'संगमनेरचे दिवस' हा लेख दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनातून घेतला आहे. संगमनेरच्या बोर्डिंगमध्ये राहून दया पवार यांनी त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण केले. दरम्यान त्यांच्या चुलत्याने त्यांना व त्यांच्या आईला न विचारता दया पवार यांचे लग्न ठरविले. परिणामी मॅट्रिकला त्यांचा इंग्रजी हा विषय राहिला व ते मॅट्रिकला नापास झाले. मात्र नापास झाल्यानंतर त्यांनी खचून न जाता अभ्यासास सुरुवात केली, नापास झालेल्या मुलांना बोर्डिंगमध्ये राहता येत नव्हते. मात्र दया पवार यांनी अधिकाऱ्यांची परवानगी काढली व नापास झाल्यानंतरही ते बोर्डिंगमध्ये राहू लागले. नापास झालेल्या दया पवारांना बोर्डिंगमधील मूले चिडवत असत. परिणामी त्यांच्या अभ्यासात व्यत्यय येत होता. तेव्हा त्यांनी बोर्डिंगजवळच्या कोंबडीच्या खुराड्यात बसून अभ्यास केला व ते मॅट्रिक पास झाले. एके काळी मॅट्रिक नापास होणाऱ्या दया पवारांनी मराठी साहित्य क्षेत्रात नावलौकिक मिळविला व त्यांना पद्मश्री सारख्या सन्मानीय नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### १.४.३ प्रस्तावना :

'संगमनेरचे दिवस' हा लेख दया पवार यांच्या 'बलुत' या आत्मकथनातून घेतलेला आहे. शालेय जीवनापासूनच त्यांना भारतीय जातीव्यवस्थेच्या दोषांची जाणीव झाली होती. तसेच सभोवतालच्या परिस्थितीमुळे, दिल्या जाणाऱ्या वागणुकीमुळे त्यांना सामाजिक शोषणांची प्रखर जाणीव होत होती. अशा सामाजिक विषमतेच्या वातावरणात दया पवार यांचे शिक्षण चालू होते. एस.एस.सी. च्या वर्षाला असताना त्यांच्या चुलत्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या चुलत्यांनी त्यांना न विचारता त्यांचे लग्न ठरविलेले असते. चुलत्याच्या मरणोपरान्त त्यांची वचनपूर्ती करण्याची जबाबदारी पवारांवर येते. ठरलेल्या विवाहामुळे त्यांना एस.एस.सी. चे वर्ष गमवावे लागते.

### १.४.४ चुलते तात्याचे निधन :

संगमनेरला शाळेत शिकायला असताना दया पवार यांच्या चुलत्यांची मुंबईला तब्येत अतिशय बिघडली. तेव्हा दगडूला (दया पवार) तार करुन संगमनेरहुन मुंबईला तातडीने बोलावले जाते. तात्या गेले तर त्यांना पाणी कोण देणार? तात्यांचा मुलगा खूप लहान असल्याने व पुतण्याने पाणी द्यावे असा नियम असल्यामुळे दगडूला संगमनेरहून बोलावून घेतले जाते. दगडू मुंबईला पोहोचल्यानंतर कळते की, तात्या तर शेवटच्या घटका मोजत आहेत. त्यांच्या वडिलांना जो त्रास होता तोच चुलत्यांनाही होता. दारुमुळे लिव्हर खराब झालेले होते. आतड्यांना 'बीळ' पडलेली होती. दगडू लहान असताना त्यांचे वडील गेले तेव्हा त्यांच्या चुलत्याने वडिलांना पाणी दिले होते. आता त्यांना चुलत्यांना पाणी द्यायचे होते. तात्या जाणार अशी त्यांनी स्वतःची मानसिकता करुन ठेवल्यामुळे त्यांना तात्या गेल्यानंतर अधिक त्रास झाला नाही. तसे तात्यांनी त्यांच्या आईचा केलेला अपमान ते विसरले नव्हते. म्हणून अश्रू गाळण्याचाही प्रश्न नव्हता. मात्र आजीने हंबरडा फोडला होता. स्वतःपेक्षा त्यांना त्यांच्या काकूचे नवल वाटत होते. त्यांची काकू भिती वाटते म्हणून कधीही मेलेल्या माणसाचे तोंड पाहत नसे. मात्र नवरा गेल्यानंतरही तिने बाहेर येऊ नये यामुळे दवाखान्यात चर्चा सुरु झाली होती. शेवटची अंघोळ बायकोने घालावी अशी प्रथा असतानाही ती बाहेर आली नाही. कदाचित 'सुटले एकदाची' असे तिला वाटत असावे असा दया पवार म्हणतात.

munotes.in

### १.४.५ दया पवार विवाह :

तात्या गेल्यानंतर त्यांनी दया पवार यांच्यासमोर एक पेचप्रसंग निर्माण केला. तेथून त्यांच्या आयुष्याचा अर्थच बदलला असा ते सांगतात. एका पोरक्या मुलाला मदत करण्याच्या उद्देशांनी तात्यांनी त्यांचे लग्न त्यांना व त्यांच्या आईला न विचारता ठरविले होते. पंचांच्यासमोर सुपारीही फोडलेली होती. त्यामुळे तात्यांनी दिलेले वचन पाळावेच लागेल असा सर्वांकडून दबाव आणला जात होता. त्यातच मुलगी न पाहता लग्न ठरविलेल पाहुन त्यांना खूप चीड येत होती. मुलगी शिकलेलीही नव्हती. तसेच दया पवार यांना एवढ्या लहान वयात लग्नांच्या बेडीत अडकायचे नव्हते. डॉ. आंबेडकरांसारखे खूप शिकायचे होते आणि लग्न केले तर त्याच्या या स्वप्नात अडथळा निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. तसेच त्यांना जशी बायको हवी आहे तशी ती असेल की नाही यांसारख्या असंख्य प्रश्नांनी त्यांना घेरुन टाकले होते. मात्र घरातीौल सर्व मंडळी त्यांच्या लग्नामुळे आनंदी झाली होती.

### १.४.६ तात्याचे निधन :

पूर्वीच्या काळी काही महार मंडळी प्रेत पुरीत असत. पुढे बाबासाहेबांना चैत्यभुमीवर जाळताना पाहिल्यानंतर ही प्रथा मोडीत निघाली. त्यामुळे त्याकाळच्या पद्धतीनुसार तात्यांनाही दफन करण्याचे ठरले. त्याकाळी म्युनिसिपार्टीचे नोकर पुरुषर खड्डा खोदून देत असत. हे नोकर जातीने महारच. वरळी मधील सोनापूरात तात्यांचा देह दफन केला गेला. दफन करण्यापूर्वी (माती लोटण्यापूर्वी) त्यांना पाणी पाजून, 'खासेला' चकरा मारल्यानंतर मडक फोडताना 'बोंब मारायची' या सर्व विधींचा अर्थ अजूनही मला कळालेला नाही असे दया पवार सांगतात. लिंबाचा पाला तोंडात घालणे, डोक्यावरील केस काढणे, पिंडदान, मनुष्य कोणत्या योनीत जन्माला गेला याची कल्पना यांसारख्या परंपरा दया पवार यांना हास्यास्पद तसेच "बंडल" वाटत होत्या.

### १.४.७ सईची पहिली भेट :

दया पवार यांचा विवाह त्यांच्या तात्यांनी ज्या मुलीशी दया पवारांचे लग्न ठरविले होते, त्या मुलीचे नाव त्यांनी मनोमन 'सई' असे ठेवले होते. तिचं गाव संगमनेरपासून पाच ते सहा मैलांच्या अंतरावर होते. शनिवारच्या दिवशी संगमनेरचा आठवडे बाजार भरायचा त्यांची शाळाही दुपारनंतर सोडून देण्यात यायची. एका शनिवारी असेच बाजारात फिरत असताना सईचे एक नातेवाईक त्यांना भेटले. त्या नातेवाईकाने दुरुनच त्यांना सई दाखविली. शेतातील माल विकायला ती तिच्या आईबरोबर बाजारात आलेली होती. तिला पाहताच त्यांची दांडी उडाली. गिऱ्हाईकांना तागड्यात ती माल मोजून देत होती ते दुरुनच सईला न्याहाळत होते. चिटाचा परकर आणि चिटाचाच पोलका सईने घातला होता. उन्हामुले गाल लाल झाले होते. अस्ताव्यस्त झालेले केस वाऱ्यामुळे कपाळावर येत होते. निळसर घारे डोळे, धारदार नाक, वय वर्षे १० ते १२ असे सईचे वर्णन करतात. संगमनेरच्या बाजारात माल विकण्यास कोणी 'आस्मानाची परी' आल्याच जणू त्यांना भास होत होता. शाळेतील मुलींसारखा हिला जर पेहराव घातला तर तिच्या जवळपास कोणतीही मुलगी उभी राहू शकत नाही अशा प्रकारचे अनेक विचार त्यांच्या मनात येऊ लागले होते. मात्र तिच्याशी कोणत्याही प्रकारचा संवाद साधता आला नाही. किंबहुना ते शक्य ही नव्हते. तिला पाहून परत बोर्डिंगवर गेल्यावर मनाला पंख फुटले आहेत, असे वाटत होते. मनात विलक्षण टोकाची हूरहूर दाटून येत होती. तिला पाहण्याच्या आधी ती शिकलेली नाही म्हणून विचार करणारे दया पवार तिला पाहतात

### १.४.८ सईचे घर :

यात्रेनंतर आजी बरोबर सईच्या गावी जाण्याचा प्रसंग येतो. संध्याकाळच्या वेळी ते तिच्या गावी पोहोचले हाते. तेथे गेल्यानंतर सर्वप्रथम दया सईलाच शोधत होते. रात्रीचे जेवण झाले, तरी सई कोठेच दिसत नव्हती. संपूर्ण रात्र तिच्याच विचारांमध्ये गेली होती. सकाळी उठून ते पुन्हा सईला शोधू लागले, तर सई सकाळी अंगणात एका कोकराबरोबर खेळत होती. त्यांना पाहिल्यानंतर ती लाजून घरात पळून गेली. सईचे घर बरेच मोठे होते. चार-पाच भावांचे एकत्र कुटुंब, घरात मुबलक मेंढर होती. सईचे वडील पी.डब्ल्यु.डी. मध्ये मुकादम होते. रंगाने खूपच काळे होते म्हणजेच फक्त दातचं चमकतील असे होते. अंगाने मजबूत होते. त्यांच्याकडे पाहिल्यावर असे वाटायचे की, एवढ्या काळ्या माणसाची एवढी गोरी मुलगी कशी काय? मात्र तिच्या आईकडे पाहिल्यावर त्याचे उत्तर मिळाले. अशाप्रकारे सर्व सईच्या विचारांमध्ये कसे गेले ते कळालेच नाही.

### १.४.९ देवगडची यात्रा :

चैत्र महिन्यात देवगडची यात्रा भरायची. 'खंडोबाचं जागती ज्योत' हे तेथील देवस्थान प्रसिद्ध आहे. संगमनेरपासून दोन ते तिन मैलांच्या अंतरावर देवगड स्थित होते. देवगडच्या यात्रेला जाण्याचा रस्ता हा दया पवार यांच्या बोर्डिंगवरुनच जात होता. त्यांचे नातेवाईक नियमितपणे या जत्रेला येत; मटणाचा बेत, तमाशा-हंगामा आणि बरबाट यांसारख्या गोष्टी जत्रेत होत असत. खंडोबाची यात्रा असल्याने सर्व वातावरण खंडोबामय होऊन जायचे. यामध्ये खंडोबाचे प्रेमप्रकरण मात्र दया पवार यांना मनापासून आवडत होते. धनगराच्या बानूसाठी त्यांनी जेजुरी सोडली. वरती देवळात खंडोबा आणि त्याची लग्नाची बायको यांची मूर्तीचे जत्रेत लग्न लागते. त्यावेळी मात्र खालच्या बाजूला असलेल्या बानूच्या मूर्तीवर भंडारा पडतो अशी सर्वांची समजूत होती. जेजुरीला गेल्यावर जशी नवीन जोडपी आपल्या बायकोला कडेवर घेऊन गडाच्या पायऱ्या चढतात तसेच दया सईला घेऊन गडाच्या पायऱ्या चढाव्या लागतील का? असा विचार देवगडच्या जत्रेत करीत होते. त्यातच त्या यात्रेत सई त्यांना दिसली. टोपपदरी भडक लुगड तिने घातलेले होते. तसेच नाकात नथ घातली होती. त्यांना पाहून सई लागत होती. तिच्या वयाच्या मुली तिला 'तो बघ तुझा नवरा' म्हणून चिडवत होत्या. ती दया पवार यांना पाहून लाजुन पळून जायची यावरुन तेही तिला आवडले होते असे लक्षात येते.

munotes.in

### १.४.१० जीवनात आलेल्या अडचणी :

नापास झाल्यामुळे पुढे आयुष्यात काही तरी करुन दाखविण्याची त्यांची उर्मी संपली. इंग्रजीच्या भितीमुळे सतत घुसमट होऊ लागली. नापास झाल्यानंतर पुन्हा बोर्डिंगवर राहता येणार नव्हते. संस्थाचालकांच्या हातापाया पडून बोर्डिंगमध्ये राहण्याची परवानगी त्यांनी मिळविली. बहुतेक या विद्यार्थ्याला काढले तर याची आई ही निघून जाईल या भितीने संस्थाचालकांनी 'स्पेशल केस' म्हणून दया पवार यांना तेथे राहण्याची परवानगी दिली. मात्र नापास झाल्यामुळे बोर्डिंगमधील इतर विद्यार्थ्यांसाठी ते एक कुचेष्टेचा विषय ठरले. थोड्या अन्नासाठी आपण लाचार होऊन येथे राहत आहोत असा विचार सारखा त्यांच्या मनात यायचा मात्र या सर्वांतूनही त्यांनी मार्ग काढला. मुलांच्या नजरा टाळून ते बोर्डिंगमध्ये फक्त जेवायला जात. बोर्डिंगजवळ एक उंच कोंबडीचे खुराडे हाते. तेथे बसून ते अभ्यास करीत. ऑक्टोबरच्या परीक्षेला बसल्यानंतर त्यांनी शनिवारच्या आठवडे बाजारात जाऊन सईला बघण्याचेही सोडून दिले व अभ्यासात दमदार सुरुवात केली. त्यांचे पाठांतर चांगले होते. त्याच्याच जोरावर ते

इंग्रजित ६३ मार्क्स घेऊन एस.एस.सी. सुटले. ही केवळ पाठांतराची कमाल होती असे ही ते याठिकाणी नमूद करतात.

### १.४.११ सारांश :

थोडक्यात दया पवार एस.एस.सी. नापास झाले तरी नैराश्याच्या गर्तेत गेले नाही. उलट त्यानंतर त्यातून बाहेर पडून नव्या उमेदीने, नव्या जिद्दीने अभ्यास केला व ते एस.एस.सी. पास झाले. म्हणजेच आयुष्यात कितीही काळे ढग दाटून आले तरी, त्यानंतर सोनेरी पहाट होतच असते.

## १.५ शंभरपैकी शुन्य मार्क - ना. सी. फडके

### १.५.१ परिचय :

४ ऑगस्ट, १८९४ रोजी ना.सी. फडके यांचा जन्म कर्जत (अहमदनगर) येथे झाला. त्यांचा मृत्यू २२ ऑक्टोबर, १९७८ रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव नारायण सीताराम फडके असे होते. ते मराठी साहित्यातील एक नावाजलेले लेखक म्हणून परिचित आहेत. तसेच त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक म्हणूनही कार्य केले आहे. त्यांनी आपल्या लेखामध्ये तंत्रावर अधिक भर दिला असून तंत्रशुद्धता, रेखीवपणा, डौलदार भाषाशैली ही त्यांच्या कथा लेखनाची वैशिष्ट्ये होत. लक्षवेधक सुरुवात, कथेमध्ये क्लिष्टता व शेवटी कथेची उकल असे तांत्रिक स्वरुप त्यांच्या लेखनाचे होते. 'अल्ला हो अकबर' ही त्यांची पहिली कादंबरी असून 'टेंपरल पॉवर' या मारी कोरेली लिखित इंग्रजी कादंबरीच्या आधारे लिहिली आहे. तसेच 'अखेरचे बंड', 'अटेपार', 'कलंदर', 'झंझावात', 'झेलम' व 'दौलत' या त्यांच्या काही प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. तसेच "बावन काशी" या नावाने त्यांनी काही प्रतिनिधिक कथा संग्रहित केल्या आहेत. त्यांच्या कथा व कादंबऱ्या या इंग्रजी व भारतीय भाषांमधून अनुवादित केलेल्या आहे. १९४० साली रत्नागिरी येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भुषविले होते. तसेच त्यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन १९६२ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या पुरस्काराने सन्मानित केले गेल.

### १.५.२ शंभरपैकी शून्य मार्क :

'शंभरपैकी शून्य मार्क' या लेखात ना.सी. फडके यांनि त्यांच्या आठवणी शब्दांकित केल्या आहेत. एखादा अभ्यासात कच्चा असणारा खट्याळ मुलगा भविष्यात सुधारणारच नाही असे लोक त्यांच्या बाबतीत गृहीत धरतात. मात्र ना.सी. फडके यांना ही गोष्ट मान्य नव्हती. मुलांच्या अंतःप्रवृत्ती आणि योगायोग यांच्या क्रिया-प्रतिक्रियांच्या योगायोगाने त्यांच्या जीवनाला वळण लागत असतं असे त्यांचे मत होते. त्यासाठी ते आपल्या लहानपणीच्या आठवणी सांगतात. वडील मामलेदार असल्याने त्यांचे शिक्षण अनेक ठिकाणी झाले. तेव्हा त्यांचे कुटुंब अचानक पुण्याला स्थायिक झाले. पुण्यातील नवीन शाळा, नवीन शिक्षक, तेथील वातावरण यांचे दडपण त्यांच्यावर आले. तसेच मुलगा हुशार आहे त्यामुळे त्याने लवकरच मॅट्रिक पास व्हावे ही त्यांच्या वडिलांची अपेक्षा होती. अशा दोन्ही गोष्टींचे त्यांच्यावर दडपण आल्याने त्यांचा अभ्यासातील रस नाहीसा झाला. परिणामी ते गणित विषयात 'शंभरपैकी शून्य मार्क' मिळवून नापास झाले. या प्रसंगामुळे त्यांची महत्त्वाकांक्षा जागृत झाली आणि ते पुन्हा जोमाने अभ्यासाला लागले व हुशार

विद्यार्थी म्हणून आपली ओळख नव्याने निर्माण केली. त्यानंतर वडिलांचा स्वभाव, कुटुंबातील वातावरण, त्यांची वाचनाची आवड, त्यांना लागलेले नाटकाचे वेड व त्यांची लाडकी कुत्री त्यांच्याकडून हिरावणे या सर्व

**१.५.३ प्रस्तावना :**

ना.सी. फडके हे तंत्रशैलीचा उहापोह करणारे व मराठी साहित्याला नव्या वळणावर नेऊन ठेवणारे लेखक म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचे शालेय जीवन अनेक ठिकाणी व्यतीत झाले कारण त्यांचे वडील हे मामलेदार असल्यामुळे त्यांची सतत बदली होत असे; परंतु त्यांच्या वडिलांनी त्यांच्या शिक्षणात कोणत्याही प्रकारचा खंड पडू दिला नाही. प्रत्येक क्षणी ते एक मार्गदर्शक म्हणून त्यांच्याबरोबर होते. मग ते अभ्यास करणे असो वा पूजाअर्चा करणे अथवा वर्तमानपत्रे वाचन करणे असो. अशाप्रकारे वडिलांच्या संस्कारांमध्ये त्यांची जडणघडण होत गेली. त्यामुळे त्यांच्या जीवनातील वडिलांची भूमिका अतिशय महत्त्वाची होती.

**१.५.४ शालेय जीवनात अभ्यासाची आवड :**

शालेय जीवनात त्यांना वाचनाची अभ्यासाची आवड होती. त्यांचे वडील मामलेदार होते. त्यामुळे त्यांचे शिक्षण हे निरनिराळ्या तालुक्याच्या ठिकाणी झाले आणि त्या काळातील अशा तालुक्यांच्या ठिकाणच्या शाळा आवश्यक तेवढ्या प्रमाणात सुधारलेल्या नव्हत्या; त्यांच्या वडिलांनी त्यांचे शिक्षण कधीच या शाळेवर अवलंबून ठेवले नाही. वडील घरच्या घरी त्यांचा स्वतः रोज नेमाने अभ्यास घेत असत. तरी, ही रोज शाळेत जाण्याची सवय त्यांना अवघ्या पाचव्या वर्षापासून वडिलांमुळेच लागली.

या वाचनाच्या आवडीतून त्यांना साहित्याची आवड निर्माण झाली. पुण्यात आल्यावर त्यांनी पहिल्यांदाच 'केसरी' हे वर्तमानपत्र पाहिले. त्यांनी त्यातील अग्रलेख वाचायला सुरुवात केली. त्यातील आडव्या दिशेने असलेले सर्व कॉलम त्यांनी वाचले पण त्यांना त्यातून काहीच अर्थबोध झाला नाही. जेव्हा त्यांनी वडिलांना विचारले, तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना वर्तमानपत्रातील उभ्या आणि आडव्या कॉलमचा अर्थ समजवला. लेखकाच्या घरी रोज वर्तमानपत्र येत नसे. पण त्यांचे आजोबा (आईचे मामा) 'करमणूक' व 'मनोरंजन' हे वर्तमानपत्र वाचत असल्यामुळे त्यांना वर्तमानपत्र वाचनाची अधिक गोडी निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी साहित्य लेखन केले.

**१.५.५ प्राण्यांची विशेष आवड :**

लेखकांच्या वडिलांना पशुपक्षांचे विशेष आकर्षण होते. त्यामुळे त्यांच्या घरामध्ये कुत्री, माकडं, पोपट, साळंक्या, मोर असे प्राणी नेहमी असे. त्यांचे वडील दुपारी झोपले की, त्यांच्या अंथरुणाभोवती दोन-तीन मोर असत व ते ढेकूण चिलटं इत्यादींची शिकार करत. जशी वडिलांमध्ये प्राण्याविषयी आवड होती. तेच गुण लेखकामध्ये देखील सहज उतरले होते. त्यामुळे त्यांनाही एका बैदूकडून एक कुत्री घेतली होती. तिचे नाव 'जाई' असे होते. त्यांची ती खुप लाडकी कुत्री होती. एकदा लेखक जीना उतरत असताना ती लाडकी कुत्री त्यांच्या पायात घुटमळली आणि ते जिन्यावरुन खालच्या पायरीवर येऊन आपटले. तेव्हा त्यांच्या डाव्या हाताचे हाड मोडले आणि हा अधूपणा काही प्रमाणात अजुनही तसाच आहे असे ते सांगतात. पण त्या कुत्रीवर त्यांचे खूप प्रेम होते. ज्यावेळी ती कुत्री मेली तेव्हा ते जीवाचा आकांत करुन पडले होते

munotes.in

यातूनच त्यांच्यामध्येही पशुपक्षाविषयी आवड होती आणि ही आवड त्यांच्यामध्ये वडिलांमुळे रुजली गेली होती.

### १.५.६ स्पष्टवक्तेपणा :

लेखक लहानपणी अभ्यासात हुशार होते आणि घरात एकुलता एक मुलगा असल्याने घरातील सर्व लोक त्यांचे कौतुक करत असे. त्याचप्रमाणे शाळेतही त्यांचे मामलेदाराचा मुलगा आणि त्यातल्या त्यात हुशार म्हणून कौतुक केले जात. लेखक पाच वर्षांचे असताना त्यांच्या वर्गात प्रतिनिधी निरीक्षक आले होते व त्यांनी आपल्या खिशातील घड्याळ काढून वर्गातील प्रत्येक मुलाला विचारले, "किती वाजले?" त्या प्रश्नाचे उत्तर लेखकाने एकदम चटकन आणि बरोबर दिले. त्यावर त्यांचे खूप कौतुक झाले; मात्र त्यांच्या वडिलांनी त्यांचे या गोष्टीबद्दल भलतेच कौतक कधीच केले नाही. तसेच लेखक लहान असताना ते शिपायाबरोबर शाळेत जात येत तेव्हा त्या शिपायाने त्यांना चिवडा खायला दिला. ही गोष्ट त्यांच्या वडिलांना कळल्यावर त्यांनी त्या शिपायाला शिक्षा म्हणून मार दिला. तो मार खरे तर लेखकालाच बसला असता पण त्यावेळी ते लहान होते. पुन्हा अशीच घटना दोन वर्षांनी घडली तेव्हा त्यांनाच जन्मभर आठवण राहील असा मार मिळाला होता. कारण त्यावेळी लेखकाने शिपायाच्या मळ्यात कलिंगड खाल्ली होती. वरील प्रसंगातून त्यांच्या वडिलांच्या अंगी असलेली निःस्पृहता व स्पष्टवक्तेपणा लेखकाला परिचित झाला व हे गुण लेखकानेही सतत आत्मसात करण्याचा प्रयत्न केला.

### १.५.७ शैक्षणिक जीवनातील यशअपयश :

लेखकांचे वडील मामलेदार असल्याने त्याच्या वडिलांची नेहमी बदली होत असे. त्यामुळे त्यांची वयाची नऊ वर्षे वेगवेगळ्या तालुक्याच्या ठिकाणी गेली. त्यावेळच्या तालुक्याच्या शाळा आवश्यक तेवढ्या सुधारित नसल्यामुळे वडील स्वतः त्यांचा अभ्यास घेत असे. लेखक अभ्यासात हुशार होते व त्यांना अभ्यासाची देखील आवड होती. ते पाच वर्षाचे असताना उजळणी उलट्या क्रमाने सहजपणे म्हणत होते. अचानक वडिलांनी शेतकी खात्यात नोकरी धरली व ते पुण्याला येऊन स्थायिक झाले. त्यांना पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दाखल करण्यात आले. तेथील गद्रे वाड्याची भव्य इमारत तीस-तीस चाळीस विद्यार्थ्यांचे वर्ग, प्रत्येक विषयासाठी वेगळे शिक्षक आणि तेथील मुख्याध्यापक असे एकदम वेगळे वातावरण त्यांना वाटू लागले. त्या वातावरणाचे दडपण त्यांच्यावर आले. त्यांनी हुशार असल्याने अल्पवयात मॅट्रिक व्हावे असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. याही गोष्टींची भिंती त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी इंग्रजीच्या तीन इयत्ता घरच्या घरी पूर्ण करुन घेतल्या. १९०६ मध्ये नूतन मराठी महाविद्यालयाच्या चौथ्या इयत्तेत त्यांना बसविण्यात आले पण तीन वर्ग घरीच झाल्याने भूगोल आणि गणित हे विषय कच्चे राहिले व इंग्रजीच्या शिक्षणाचा वेग झेपेना त्यामुळे त्यांच्या मनात अभ्यासाविषयी असलेली ओढ कमी झाली. त्याचा परिणाम म्हणजे ते चौथीच्या परीक्षेत शून्य मार्क मिळून गणित विषयात नापास झाले. त्यामुळे लोकांनी ठरवलं की, "बाबासाहेब फडक्यांच्या हा मुलगा चांगला निघणं शक्य नाही." या गोष्टीमुळे त्यांच्या वडिलांना खूप त्रास झाला. वडिलांना झालेला त्रास लेखकाला पहावेना त्यामुळे त्यांनी गणित विषयाकडे चांगले लक्ष देण्याचे ठरविले. त्यातून त्यांना सर्व विषयांमध्ये गोडी निर्माण झाली. मराठी व इंग्रजी विषयातील त्यांची चांगली प्रगती पाहून शिक्षकही त्यांचे कौतुक

### १.५.८ ना.सी. फडके यांना किर्तनाची आवड :

ना.सी. फडके यांच्या वडिलांना कीर्तनाची आवड होती. कीर्तन करताना कीर्तनाचे पूर्वरंग ते अतिशय मनोवेधकपणे सांगत असे. त्यांनी कित्येक वेळा स्वतंत्र आख्याने तयार केली व त्यामध्ये असणारी पदेही स्वतःच रचली होती. या पदांमुळे लेखकाचा संगिताशी पहिल्यांदा परिचय झाला होता. त्यांच्या

### १.५.९ धार्मिक कर्मकांड विषयी त्याचे मत :

लेखकाचे वडील कर्मनिष्ठ व चिकित्सक होते. त्यामुळे त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षी लेखकाची मुंज केली व त्याच्या वेदाध्ययनास सुरुवात केली. संध्या, वैश्वदेव, रुद्र इत्यादी ब्रह्मकर्माच्या शिकवणीसही सुरुवात केली. कॉलेजमध्ये गेल्यावरही वैश्वदेवाचे पठण करणे आणि लघुरुद्राच्यावेळी त्यांच्या बरोबरीने पठण करायला लावणे अशी सर्व कार्य त्यांच्याकडून ते करुन घेत. श्रावण महिन्यात ते उपाध्यावर सर्वस्वी अवलंबून न राहता पोथी स्वतः मोठ्याने वाचत आणि जरी उपाध्येतुना वाचत असतील आणि त्यांच्या वाचनात जर चूक झाली तर ते त्यांनाही आवर्जुन सांगत असे. त्यांच्या घरात श्रावणातील प्रत्येक विधी हे यथासांग करावे असे वडिलांना वाटत व त्या पद्धतीने ते विधी करुन घेत असे. श्रावणही त्यांच्या घरात कीर्तनाप्रमाणेच गाजत असे. त्यादिवशी गावातील ऋग्वेद शाखेतील सर्व ब्राह्मण येत. अशावेळी कोणीही त्यांच्या वडिलांच्या नजरेतून सुटत नसे व उपाध्येबुवाची त्यांच्या नजरेतून सुटताना मोठी तारांबळ उडत असे. तसेच श्रावण महिन्यात नेहमी होम-हवन होत. त्याचा धूर आणि पंचगव्य या गोष्टी चुकविण्यासाठी लेखकाला अनेक युक्त्या कराव्या लागत असे. त्यामुळे श्रावण महिना आला तर त्यांच्या मनात धडकी भरल्यासारखे व्हायचे. कारण त्यांना श्रावण महिन्यातील सर्व विधींना ?? त्यांना एका संकटासारखे वाटत असे.

### १.५.१० ना.सी. फडके यांचे रंगभूमी विषयीचे आकर्षण :

लेखक ना.सी. फडके यांना वाचनाची आवड निर्माण झाली. त्यावेळी वाचनाची आवड लागली तरी त्यांना आपण लेखक व्हावे अशी कल्पनादेखील मनात कधी आली नाही; परंतु नाटकात जाण्याची इच्छा त्यांच्या मनात होती. खाडिलकरांची 'कांचनगडची मोहना', 'कीचकवध' इत्यादी नाटके त्यावेळी खूप गाजलेली होती. तेव्हा दोन चार प्रयोग त्यांनी तिकीट काढून तिसऱ्या मजल्यावरुन पाहिली होती. त्यामुळे त्यांचे रंगभूमीविषयीचे आकर्षण अधिकच वाढत गेले. 'कांचनगडची मोहना', 'कीचकवध' या नाटकातील अनेक भाषणं घरी पाठ करुन साभिनय म्हणण्याचा प्रयत्न ते रोज करु लागले. त्याचा परिणाम असा झाला की त्यांनी महाराष्ट्र नाटक मंडळींच्या मालकांना एक पत्र लिहिले. त्या पत्रात लिहिले होते की, 'मला तुमच्या कंपनीत यायचं आहे' परंतु त्यांच्याकडून त्यांना कोणतेही उत्तर आले नाही. कारण त्यांना वाटले की, महाराष्ट्र नाटक मंडळीच्या मालकांनी ते एखाद्या नाटकवेड्या नासमज मुलाचे पत्र समजून फाडूनही टाकल असावं. त्यांच्याकडून काहीच उत्तर आले नाही म्हणून त्यांच्याकडे जाऊन विचारण्याचे धाडसही लेखकाला झाले नाही. अनेक वेळा या नाटक कंपनीत जाण्याचा प्रयत्न केला; परंतु दारापर्यंत गेल्यावर त्याचे हातपाय थरथर कापत होते आणि काही दिवसानंतर नाटक कंपनीत जाण्याचे वेड आपोआपच नाहीसे झाले होते. अशाप्रकारे ना.सी. फडके यांच्या मनामध्ये नाटकाविषयी आकर्षण निर्माण झाले होते; परंतु ते नाटकाविषयीचे वेड काही दिवसानंतर कमी होत गेले.

### १.५.११ समारोप :

अशाप्रकारे लेखकाच्या जडणघडणीत त्यांच्या वडिलांची महत्त्वाची भूमिका आहे. कारण त्यांच्यामुळे लेखकाला वाचनाची आवड, नियमित अभ्यासाची सवय होऊन संगिताशी ओळख झाली व पद्यरचनेचे संस्कारही त्यांच्यावर झाले. त्यामुळे 'शंभरपैकी शून्य मार्क' या लेखाच्या आधारे असे स्पष्ट होते की, लेखकांच्या जीवनात त्यांचे वडील त्यांचे एक मार्गदर्शक होते.

## १.६ सरगम - सी रामचंद्र

### १.६.१ परिचय :

सी रामचंद्र हे सुप्रसिद्ध संगीतकार होते. त्यांचे पूर्ण नाव रामचंद्र नरहर चितळकर असे होते. त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात पुणतांबे या गावी १२ जानेवारी, १९१८ रोजी झाला. तर त्यांचे निधन मुंबई येथे ५ जानेवारी, १९८२ रोजी झाले. 'सी रामचंद्र' हे संक्षिप्त नाव त्यांनी सिनेदिग्दर्शक जयंत देसाई यांच्या सुचनेनुसार धारण केले. निकटवर्तीयांमध्ये ते अण्णा म्हणून ओळखले जात होते. याखेरीज आर.एन. चितळकर, श्यामू, राम चितळकर, सी रामचंद्र अण्णासाहेब अशा विविध नावांनी त्यांनी संगीत दिग्दर्शन व पार्श्वगायन केले. मा. भगवान यांच्याशी झालेल्या मैत्रीमुळे त्यांना 'जयक्कोडी' हा तमिळ चित्रपट संगीत दिग्दर्शनासाठी मिळाला. त्यांनी संगीत दिलेला हा त्यांचा पहिला चित्रपट होय. सी रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेली हिंदी गाणी उत्कृष्ट व अविस्मरणीय ठरली. 'आधा है चंद्रमा रात आधी' (नवरंग), 'देख तेरे संसार की हालत' (नास्तिक), 'गोरे गोरे ओ बाके छोरे' (समाधी) यांसारखी अनेक सुप्रसिद्ध हिंदी गाणी त्यांनी संगीतबद्ध केली. 'शहनाई' या चित्रपटाला दिलेल्या संगीतामुळे त्यांचे नाव भारतभर सुप्रसिद्ध झाले. त्यांनी अनेक हिंदी बरोबरच मराठी, तमिळ, तेलगू व भोजपूरी या चित्रपटांनाही संगीत दिले. सुरुवातीच्या काळात आर.एन. चितळकर म्हणून त्यांनी मराठी चित्रपटात भूमिकाही केल्या. १९६० च्या दशकात त्यांनी 'धनंजय' व 'घरकूल' या मराठी चित्रपटांची निर्मिती केली. या चित्रपटांत त्यांनी प्रमुख भूमिका साकारुन त्या चित्रपटांना संगीतही दिले. २७ जानेवारी, १९६३ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या उपस्थितीत सी. रामचंद्र यांनी लता मंगेशकर यांच्या आवाजात सादर केलेल्या 'ऐ मेरे वतन के लोगो' या गीताला अद्‌भूतपूर्ण प्रतिसाद मिळाला. हा त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचा व अभिमानाचा क्षण होता.

### १.६.२ सरगम :

'सरगम' हा लेख 'माझ्या जीवनाची सरगम' या सी. रामचंद्र यांच्या आत्मकथनातून घेतलेला आहे. पुणतांब्याजवळील चितळी हे सी. रामचंद्र यांच्या घराण्याचे मूळ गाव होय. त्यांचे वडील रेल्वेत नोकरीस असल्याने त्यांची विविध ठिकाणी बदली होत असे. म्हणून त्यांचे बालपणही विविध ठिकाणी गेले. लहानपणापासूनच त्यांना शालेय शिक्षणात स्वारस्य नव्हते. मात्र संगीताची त्यांना खूप आवड होती. नागपूरच्या 'श्रीराम संगीत विद्यालयात' त्यांनी प्रथमत: संगीताचे धडे गिरविले. त्यांना चित्रपटात काम करण्याचीही ओढ होती. चित्रपटात केवळ निनावी पादचाऱ्याची भूमिका करण्यासाठी शालेय जीवनातील वार्षिक परीक्षेचा इतिहास-भूगोलाचा पेपर कोराच दिला. शालेय जीवनात फारशी प्रगती नसलेले सी. रामचंद्र यांनी संगीत क्षेत्रात मात्र मोठा नावलौकिक मिळविला.

### १.६.३ प्रस्तावना :

सी. रामचंद्र हे सुरुवातीपासूनच अभ्यासात कच्चे होते. अगदी बालवर्गापासून ते कधीही कुठल्याही वर्गात पास झाले नाहीत. अंकगणित, इंग्रजी, भूगोल, इतिहास, व्याकरण अशा सर्व विषयात सी. रामचंद्र कच्चे होते. पण वडिलांची इच्छा म्हणून ते शाळेत जात असत. मात्र त्यांच्या मनात शिक्षणाविषयी आस्था कधीच नव्हती. त्यांना आवड होती ती केवळ संगीताची, सिनेमाची आणि नाटकात काम करण्याची. सी. रामचंद्र इंग्रजी पाचव्या इयत्तेत नापास झाल्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांना त्यांच्या बंधुकडे पाठवले व तेथे गेल्यावर त्यांना त्यांच्या जीवनाची वाट सापडली असे ते सांगतात.

### १.६.४ शालेय जीवनातील आठवणी :

सी. रामचंद्र आपल्या शालेय अभ्यासाविषयी सांगताना म्हणतात की, ‘प्रगती ही अवस्था शालेय अभ्यासात मी कधीही येऊ दिली नाही’. या वाक्यावरुनच त्यांचे शालेय जीवन कसे होते हे लक्षात येते. त्यांचा असणारा कच्चा अभ्यास हा त्यांच्या शालेय प्रगतीतील अडथळा होता. त्यांना सर्वच विषय जड जात असे. या विषयांमध्ये अंकगणित, इंग्रजी, भूगोल, इतिहास, व्याकरण यांचा समावेश होता. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग पाठ करणे म्हणजे ती त्यांच्यासाठी ब्रह्मपरीक्षाच असायची ‘अंब्रेला’ या शब्दाचं स्पेलिंग त्यांच कधीच पाठ झाले नाही. त्यावरुन त्यांनी बराच मार खाल्ला होता. पण स्पेलिंग काही केल्या पाठ होत नव्हते. तेव्हा त्यांना डोंगरगडचा त्यांच्या शेजारी राहत असलेला म्हातारा आठवला. तो त्यांच्या नातवाची उजळणी गाण्याच्या स्वरुपात घ्यायचा.

### १.६.५ एकाचवेळी दोन शाळांमध्ये प्रवेश :

नागपूरला आल्यावर रामचंद्र यांच्या वडिलांनी त्यांना एकाचवेळी दोन शाळांमध्ये प्रवेश घेऊन दिला होता. शालेय अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूलच्या इंग्रजीच्या पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतला होता, तर त्यांची संगीताची आवड पाहून त्यांना श्रीराम संगीत महाविद्यालयाच्या प्रारंभ वर्गातही प्रवेश घेऊन दिला होता. शालेय शिक्षणात मात्र कधी ‘गती’ ही अवस्था प्राप्तच झाली नाही. मात्र गाण्यातील त्यांच्या गतीने जोरदार वेग प्राप्त केला होता. सप्रे मास्तर हे रामचंद्रावर खूप खूश असायचे. त्यांचा आवाजच मुलतः सुरेल होता. तसेच संगीत विद्यालयात प्रवेश घेण्याआधीच तालाची समज त्यांना आली होती. ‘पोरगा पुढे नाव काढील’ असे उद्‌गार सप्रे मास्तरांनी सी. रामचंद्र यांच्या वडिलांसमोर

### १.६.६ वडिलांची इतवारी स्टेशनवर बदली :

रामचंद्र यांच्या वडीलांची बदली इतवारी स्टेशनवर झाल्यानंतर ते नागपूरला रहायला आले. तेथे ते दोन नद्यांच्या (दोन मोहळांच्या) संगमावरती राहू लागले. त्या संगमावर एक शिवाचे मंदीर होते. नागपूरच्या मोठ्या परिसरात रामचंद्राच्या शिक्षणाची सोय चांगली होईल असे त्यांच्या वडिलांना वाटत होते. ढकलगाडीने त्यांची शाळा चौथीपर्यंत झाली होती. शिक्षणात त्यांना रसही नव्हता. त्यातच मराठीचाच अभ्यास त्यांना पेलवत नव्हता आणि पाचवीत तर इंग्रजीशी गाठ पडणार होती. संगमावरती त्यांनी एक विचार करीत बसण्यासाठी एक जागा शोधून काढली होती. एका संध्याकाळी रामचंद्र असेच त्याठिकाणी विचार करीत बसले असताना थोड्या वेळाने अंधार पडू लागला. मनातही काळजीचा काळोख निर्माण झाला होता. आपण एकटेच आहोत अशी त्यांना जाणीव झाली. कारण वडिलांनी नापास झाल्यावर त्यांना नग्न अवस्थेत घराबाहेर काढले

होते. तेव्हा घरी परत आल्यावर ज्या अर्धांध मोठ्या आईने त्यांच्यावर प्रेमाचा आणि वात्सल्याचा वर्षाव केला होता ती मोठी आई आज या जगात नव्हती.

### १.६.७ शाळेतील ढकलगाडी :

बालवर्गापासून सी. रामचंद्र कधीही कुठल्याही वर्गात पास झाले नाही. त्यांना प्रत्येकवेळी पुढे ढकलून पुढच्या वर्गात घातले जायचे. हे पुढच्या वर्गात ढकलण्याचे काम त्यांचे वडील परस्परच करीत असत. वडिलांच्या कामाचा संबंध ते आपल्या शिक्षणाशीही जोडतात. त्यांचे वडील रेल्वेखात्यात असिस्टंट स्टेशनमास्तर म्हणून नोकरीला होते. सायडिंगला पडलेला रेल्वेचा डबा चालत्या गाडीला जोडून देणे हे त्यांचे नित्याचे काम होते. त्याप्रमाणेच प्रत्येक वर्षी सी. रामचंद्र यांची ढकलगाडी पुढच्या वर्गाला जोडून देण्याचे काम त्यांचे वडील परस्पर करीत, कारण त्यांना रामचंद्र यांच्या शिक्षणाविषयी काही आकांक्षा होत्या. रामचंद्र यांनी शिकून सवरुन घराण्याचे नाव उंचवावे अशी त्यांची इच्छा होती. मात्र सी. रामचंद्र यांना केवळ गाण्यातच गोडी होती.

### १.६.८ पर्वतीच्या पायथ्याशी चित्रपटाचे शुटींग :

रामचंद्राचे पुण्यात शिक्षण चालूच होते. वार्षिक परीक्षा एक दोन दिवसांवर आली असताना त्याचवेळी पर्वतीच्या पायथ्याशी चित्रपटाचे शुटींग चालू आहे असे त्यांना कळाले. त्यांनी आतापर्यंत कधीही चित्रपटाचे शुटींग पाहिले नसल्याने त्यांना ते कोणत्याही परिस्थितीत पहायचेच होते. मात्र त्यांचे मित्र शुटींग पाहण्यासाठी येण्यास तयार नव्हते. म्हणून ते एकटेच चित्रटाचे शुटींग पाहण्यास गेले. तेथे गेल्यावर चित्रपटात काम करण्याचा शाहू मोडक नावाचा मुलाचा त्यांना हेवा वाटला. तेथील रिफ्लेक्टर, फूटमार्क, मायक्रोफोन, कॅमेरा, रेकॉर्डिंगचा ट्रक हे सारे पाहून त्यांना यक्षनगरीत आल्याचा भास झाला. के.पी. भावे हे विख्यात मराठी दिग्दर्शक या चित्रपटाचे दिग्दर्शन करीत होते. तेथे प्रेक्षक मंडळीना पाहून ते म्हणाले की, “अहो, तुमच्यातले कुणी, इकडून तिकडे नुसते जाल का?” ही संधी साधून सी. रामचंद्र पुढे आले व दिग्दर्शकाने सांगितल्याप्रमाणे ते एक-दोनदा इकडून तिकडे चालत गेले. चित्रपटात आपली छबी उमटली हे पाहून त्यांच्या आनंदाला पारावारच राहिला नाही. संध्याकाळपर्यंत ते पर्वतीच्या पायथ्याशीच होते. काम संपल्यावर दिग्दर्शकाने सांगितले की, आजची मंडळी उद्याही या, चित्रपटाचे शुटींग पाच ते सहा दिवस चालणार आहे. परीक्षा सुरु झाल्यावर त्यांनी एक-दोन पेपर कसेबसे दिले. पण सर्व मन हे पर्वतीच्या पायथ्याशीच होते. दिग्दर्शकाने तिकडे रोज बोलावले होते. शिवाय स्वतःहून होकार दिल्यामुळे जाणे ही भागच होते.

परीक्षेतील अनुभव सांगताना ते म्हणतात इतिहास-भूगोलाच्या पेपरच्या दिवशी काही केल्या उत्तर लिहिण्यामध्ये लक्ष लागेना. त्यांच्या डोळ्यासमोर सारखे चित्रपटाचे शुटींग फिर होते. शेवटी अनावर होऊन ते कोरा पेपर देऊन चित्रपटाचे शुटींग पाहायला निघाले, पण जाताना देखरेख करणाऱ्या शिक्षकांनी हटकले व विचारले पेपर झाला? त्यांनी देखील हो म्हणत पेपर पुढे केला. कोरा पेपर पाहून शिक्षक म्हणाले यावर नाव घालायला हवे. पेपरवर नाव टाकून ते पर्वतीच्या पायथ्याशी गेले. चित्रपटात केवळ निनावी पादचाऱ्याची भूमिका करण्यासाठी त्यांनी संपूर्ण पेपर कोरा दिला होता. तेव्हा त्यांनी याच चित्रपट व्यवसायात आपणाला चालत रहायचे आहे याची कल्पनाही केली नव्हती. कोरा पेपर दिल्यामुळे परीक्षेचा निकाल नेहमी प्रमाणेच लागला. शाळेच्या अधिकाऱ्याकडून त्यांच्या वडिलांना पत्र गेले की, “इतिहास-भूगोलाच्या पेपरला हा विद्यार्थी जूनमध्ये पुन्हा बसल्यास त्यास वरच्या वर्गात घेता येईल.” पण रामचंद्र यांना

munotes.in

वरच्या वर्गात नव्हे, तर सिनेमात जायचे होते. त्यांचे वडीलही त्यांच्या शिक्षणाविषयी नाराज झाले. रामचंद्र यांनाही काही केल्या मार्ग सापडत नव्हता. वडिलांनी रामचंद्र यांनाही पुण्याला परत जाणार का विचारल्यानंतर त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. त्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांना परत पुणतांब्याला नेले.

### १.६.८ पुण्यातील गायन व शिक्षण :

१९३१ साली त्यांचे वडील सेवानिवृत्त झाले. त्यानंतर त्यांचे सर्व कुटूंब नांदगावला आले. मोठ्या आईचा मुलगा नांदगावला नोकरीला होता. त्यामुळे वडील सेवा निवृत्त झाले की, तिकडे जाणे स्वाभाविक होते. नांदगावमध्ये गायन शाळा नसल्याने आपण तेथे राहून काय करणार असा प्रश्न रामचंद्र यांच्यासमोर उभा राहिला. त्यातच ते कधीही पास न होता इंग्रजी पाचवीच्या इयत्तेपर्यंत येऊन पोहोचले होते. शेवटी पुण्याला त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यात यावी, त्यासाठी वडील व त्यांचे दोघे मोठे भाऊ यांनी त्यांना पैसे पाठवावेत असे ठरले. इंग्रजी पाचवी इयत्ता शिकण्यासाठी व गायनाच्या पुढच्या शिक्षणासाठी रमणबागेतील हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. पंडीत विनायकबुवा पटवर्धन यांच्या गांधर्व विद्यालयात खोली घेतली. ती अप्पा बळवंत चौकात गायन शाळेच्या जवळ होती. शाळेत शेवटचे बाक व गायन शाळेत सर्व प्रथम असा त्यांचा पुण्यातील शिक्षणक्रम सुरु झाला. त्याच दरम्यान त्यांचे सिनेमाप्रतीचे वेड अधिकच बळावत गेले.

### १.६.९ सिनेमाचे व्यसन :

संगीत विद्यालयात शिकत असताना त्यांना सिनेमा पाहण्याचे व्यसन लागले. नागपूर हे मोठे शहर असल्याने अगदी लहान वयातच या व्यसनाला वाव मिळाला. सिनेमा पाहण्यासाठी ते मोठ्यांचा डोळा चुकवून जात असे. किंबहुना त्यांना तशी सवयच पडून गेली होती. देशी-विदेशी मुक सिनेमे पाहताना ते अगदी देहभान हरवून जात असे. एकदा त्यांच्याकडे सिनेमा पाहण्यासाठी पैसे नव्हते, तर त्यांनी पानवाल्याची चोरी केल्याचे सांगतात. तसेच सिनेमा पाहण्यासाठी त्यांनी सप्रे मास्तरांचाही मार खाल्ला आहे, असे रामचंद्र सांगतात. मात्र सिनेमाचे व्यसन कधीच सुटले नाही. उलट ते अधिकच वाढत गेले. त्याचकाळात सिनेमात काम करण्याची आशा ही त्यांच्या मनात रुजली. नागपूरात त्यासाठी संधी उपलब्ध नव्हत्या, नाही तर त्यांनी कधीच चित्रपटात काम केले असते असे रामचंद्र सांगतात.

### १.६.१० नवा खेळ मधील छबीची भूमका :

१९३० साली रामचंद्र यांना पुन्हा रंगमंचावर येण्याची संधी मिळाली ती 'नवा खेळ' या नाटकाच्या निमित्ताने या नाटकात त्यांना 'छबी' नावाच्या स्त्री पात्राची भूमिका साकारायची होती. लहानपणी दिसायला छान देखणे असल्यामुळे त्यांना ही स्त्री भूमिका मिळाली. थोडक्यात छबीच्या भूमिकेला योग्य छबी त्यांच्याजवळ होती. मात्र चालणे-बोलणे यात काही फरक नव्हता. नाटकातील एक गाणे आळवून आळवून गात असताना त्यांच्या डोक्यावरचा केशसंभार त्यांच्यात हाती आला, प्रेक्षक किंचीत हसले, मात्र रामचंद्राच्या गाण्याने त्यांना इतके प्रभावित केले होते की, त्यादिवशी त्यांची भूमिका प्रेक्षकांनी केवळ कानांनीच पाहिली. त्या गाण्याची सर्वत्र वाहव्वा झाली.

munotes.in

### १.६.११ कोल्हापूर - कलाकार :

वरील प्रकारामुळे रामचंद्र यांना अजिबात करमेनासे झाले ते पुणतांब्याहून त्यांच्या मोठ्या भावाकडे, नानाकडे सोलापूरला गेले. त्यांच्या मोठ्या भावात व त्यांच्यात सुमारे १० वर्षाचे अंतर होते. त्याने ब्रह्मचर्य स्वीकारले होते. तेथे गेल्यावर नाना रामचंद्रला नेहमी विचारीत की, तुझ्यासाठी गिरणीत काम शोधू का? पण रामचंद्र यांना गिरणीत काम करण्याची अजिबात इच्छा नव्हती. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ते गप्प राहून देत असे. नाना जे शिजवणार तेच ते खात होते. नाना कामाला गेल्यावर रामचंद्र गाण्याचा रियाज सुरु करीत. त्यांचे हे गाणे ऐकायला शेजारी-पाजारी गर्दी करत. यातच नानाने ओळकले असावे की, रामचंद्र यांना कोणता व्यवसाय करायचा आहे व एकेदिवशी मोठ्या आशेने त्यांनी वर्तमानपत्रात आलेली जाहिरात रामचंद्राना दाखविली. कोल्हापूरातील 'ललित पिक्चर्स' नावाच्या कंपनीला अभियनासाठी तरुण हवे होते. नानाने रामचंद्राचे पुष्कळ फोटो काढले होते. त्यातील काही फोटो अर्जासह त्याने ललित पिक्चर्सकडे पाठविले. काही दिवसातच ललित पिक्चर्स कडून तिसऱ्या वर्गाचे भाडे देण्याचे मान्य करुन भेटीला बोलावणे आले आणि रामचंद्र यांना जिकडे जायचे होते ती वाट सापडली. सोलापूरहून ते कोल्हापूरला निघाले. कोल्हापूर-कलापूर-चित्रपटांची नगरी असा त्यांचा प्रवास सुरु झाला.

### १.६.१२ सारांश :

थोडक्यात लहानपणापासूनच संगीताची आवड असणाऱ्या सी. रामचंद्र यांना त्यांच्या जीवनाची वाट सापडली. शालेय जीवनातील त्यांची प्रगती शुन्य असली तरी, संगीत, अभिनय व चित्रपटांच्या जगात त्यांनी नावलौकिक कमावला. आयुष्यात पुढे जाण्यासाठी शालेय शिक्षण खूप गरजेचे असतेच असे नाही. व्यक्तीमधील गुण त्यांच्या आयुष्यातील यशाचे शिखर ठरवित असतात. असे सुप्त गुण प्रत्येकातच असतात, गरज असते ती ओळखण्याची.

❖❖❖❖

munotes.in

# घटक -२

# नापास मुलांची गोष्ट या लेख संग्रहाविषयी

**घटक रचना :**

२.१ प्रस्तावना
२.२ पन्नासपैकी शुन्य मार्क - शांता शेळके
२.३ कोठे होतो कोठे आलो - सुशीलकुमार शिंदे
२.४ शब्दाचे मोल - चंद्रशेखर धर्माधिकारी
२.५ प्रारंभ - यशवंतराव गडाख
२.६ जडणघडण - वाय.सी. पवार

## २.१ प्रस्तावना

'नापास मुलांची गोष्ट' हा व्यक्तिचित्रणात्मक ललित लेखसंग्रह आहे या ललित लेख संग्रह अरुण शेवते यांनी संपादित केला असून त्याला नापास मुलांची गोष्ट असे नाव दिले आहे. या पूर्वीच्या घटकात आपण महात्मा गांधी, कुसुमाग्रज, दया पवार, ना.सी. फडके आणि सी. रामचंद्र यांचे लेख अभ्यासले आहेत. तर आता या लेखात शांता शेळके, सुशीलकुमार शिंदे, चंद्रशेखर धर्माधिकारी यशवंतराव गडाख आणि वाय.सी. पवार यांच्या आत्मचरित्र पर लेखाचा अभ्यास करायचा आहे.

## २.२ पन्नासपैकी शुन्य मार्क - शांता शेळके

### २.२.१ परिचय :

१२ ऑक्टोबर, १९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे शांता शेळके यांचा जन्म झाला. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यातच झाले. त्यानंतर मुंबईत आचार्य अत्र्यांच्या 'नवयुग' मध्ये त्यांनी उपसंपादक म्हणून काही वर्षे काम केले. पुढे नागपूर मधील हिस्लॉप महाविद्यालय आणि मुंबईमधील रुईया व दयानंद या महाविद्यालयातून त्यांनी मराठीच्या अध्यापिका म्हणून काम केले. अध्यापनाबरोबरच त्यांना लेखन क्षेत्रात विशेष आवड होती. कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, आत्मकथन, चित्रपटगीत, अनुवाद, समीक्षा अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी भरीव लेखन केले आहे. अनेक नाटके ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले आहे. त्यांची अनेक गाणी लोकप्रिय ठरली आहेत. लता मंगेशकर, आशा भोसले, किशोरी आमोणकर यांसारख्या नामवंत गायिकांनी त्यांची गाणी गायली आहेत. विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केलेले असले तरी कविता लेखन हा त्यांच्या आवडीचा साहित्यप्रकार होय. साध्या-सोप्या भाषेतल्या त्यांच्या कविता मनाला भावणाऱ्या आहेत. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत अशा सर्वांसाठी त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. लहान मुलांचे भावविश्व त्यांच्या कवितांमधून त्यांनी मांडले आहे. कवितांप्रमाणे गद्य लेखनातही त्यांनी आपले

योगदान दिले आहे. लेखन क्षेत्रातील त्यांची कामगिरी अतुलनीय आहे. त्यांनी अनेक वर्षे नाटक आणि चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्डवर काम केले होते. १९९६ मध्ये आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद शांता शेळके यांनी भूषविले होते. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित केले गेले. गदिमा गीतलेखन पुरस्कार (१९९६), सुरसिंगार पुरस्कार (मागे उभा मंगेश... या गीतासाठी), उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्या सन्मानित झाल्या आहेत. वेगवेगळ्या साहित्यप्रकारात भरीव लेखन करुन साहित्यक्षेत्र समृद्ध करणाऱ्या प्रतिभावंत कवयित्री व लेखिका शांता शेळके यांचे ६ जून, २००२ रोजी निधन झाले.

### २.२.२ पन्नासपैकी शुन्य मार्क :

व्यक्ती आयुष्यात कितीही मोठी झाली असली तरी आयुष्यात कधी ना कधी त्या व्यक्तीने नैराश्याचे ढग पाहिलेले असतात. शांता शेळके या सुप्रसिद्ध मराठी लेखिका होत्या. ज्यांनी लेखन क्षेत्रात मोलाची भर घातलेली आहे. अशा या किर्तीवंत लेखिकेनेही आयुष्यात नैराश्य अनुभवले होते. मराठी विषयात पारंगत असणाऱ्या शांता शेळके यांना मात्र पहिलीत असताना गणितात पन्नासपैकी शून्य मार्क मिळाले होते. शाळेतील हा प्रसंग शांता शेळके यांनी 'पन्नासपैकी शून्य मार्क' या लेखनात वर्णन केला आहे.

### २.२.३ प्रस्तावना :

लेखिका शांता शेळके यांनी आपल्या शालेय जीवनात निराशेचे ढग अनुभवलेले होते. गणितासारख्या विषयात नापास झाल्यावर त्यांचे आयुष्य तेथेच थांबले नाही. याउलट 'मराठी' या त्यांच्या आवडीच्या विषयामध्ये त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. आयुष्यात आलेले नैराश्य मनुष्याला अस्वस्थ करते. मात्र त्या अवस्थतेतून बाहेर येऊन यश संपादन केल्यानंतर ते यश मनुष्याला भारावून टाकते. याउलट इतरांपेक्षा आपण हुशार असल्याची भावना जर व्यक्तीमध्ये निर्माण झाली, तर तिच्यात अहंकार निर्माण होतो. मात्र आयुष्यात अशा काही घटना घडतात की, ज्यामुळे व्यक्तीमध्ये निर्माण झालेला अहंकार मावळतो. अशाच आशयाचा स्वतःच्या जीवनातील प्रसंग लेखिका शांता शेळके यांनी 'पन्नासपैकी शून्य मार्क' या लेखात सांगितला आहे.

### २.२.४ मराठी विषयाची आवड :

लेखिका शांता शेळके यांचा 'मराठी' हा विषय लहानपणापासूनच चांगला होता.एके दिवशी शाळेचे इन्स्पेक्शन आयोजित करण्यात आले होते. लेखिकेच्या वर्गात मराठीचा तास चालू असताना इन्स्पेक्टर आले. त्यांचे मराठीचे शिक्षक त्यांना 'दारिद्र्य मरण यातुनि मरण बरे या दरिद्रता खोटी' ही सुप्रसिद्ध कविता शिकवित होते. लेखिकेचा मराठी विषय चांगला असल्याचे शिक्षकांनाही माहित होते. त्यामुळे त्यांनी लेखिकेला कवितेवरील अनेक प्रश्न विचारले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे लेखिकेने अगदी बरोबर दिली. परिणामी मराठीचे शिक्षक आणि इन्स्पेक्शनसाठी आलेले इन्स्पेक्टर यांनी लेखिकेवर कौतुकाचा वर्षाव केला. शिक्षकांकडून व इन्स्पेक्टरसाहेबांकडून मिळालेल्या कौतुकाने लेखिकेसाठी जणू स्वर्गच ठेंगणा झाला व आपण इतरांपेक्षा कुणीतरी फार मोठ्या आहोत ही भावना अधिकच वाढीस लागली.

### २.२.५ गणितातील शून्य मार्क :

संपूर्ण वर्गासमोर झालेल्या कौतुकामुळे लेखिकेच्या मनातील अहंकाराची भावना वाढीस लागली. त्यामुळे त्या दिवशी त्या वर्गात कोणाशीही बोलण्यास तयार नव्हत्या. आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोत हा भाव त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. मधल्या सुट्टीनंतर गणिताचा तास होता. जे शिक्षक लेखिकेला मराठी शिकवायचे तेच शिक्षक त्यांना गणितही शिकवित होते. वर्गावर येताना त्यांनी मागील आठवड्यातील गणिताच्या परीक्षेचे पेपर आणले होते. गणित विषय कच्चा असल्यामुळे लेखिका जरा सावरुनच बसल्या, मनात भितीही निर्माण झाली. मात्र मराठीच्या तासाला झालेल्या कौतुकाची धुंदी अजूनही डोळ्यावर असल्याने गणितात तर आपण सहज पास होऊ. जास्त नव्हे तर किमान पास होण्याइतके मार्क्स तर आपण नक्कीच मिळवू. "गणित, गणित ते काय?" असे विचार लेखिकेच्या मनात येऊ लागले. शिक्षकांनी एका-एका विद्यार्थ्याचे नाव व गुण वाचून पेपर वाटण्यास सुरुवात केली. कौतुकाची धुंदी लेखिकेच्या डोळ्यावर असली तरी, जसजसा पेपरचा गठ्ठा कमी होत होता तसतशी लेखिकेची धडधड वाढत होती. ओठांना कोरड पडत होती, डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले होते. त्यातच शेवटचा पेपर शिक्षकांनी हातात घेऊन रुक्ष स्वरात पुकारले, 'शांता शेळके, मार्क शून्य' म्हणजेच लेखिका गणितात शून्य मार्क मिळवून नापास झाल्या होत्या.

### २.२.६ लेखिकेत निर्माण झालेला अहंकार :

लहानपणी लेखिका शांता शेळके यांनी एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला होता त्यांच्या वर्गात सर्व मुले होती व त्या एकट्याच मुलगी होत्या. त्यामुळे शाळेतील शिक्षकांना त्यांचे नेहमीच कौतुक वाटत असे. मुलगी असल्यामुळे मुलांना मिळणारा मार हा लेखिकेला सहसा मिळत नसे. परिणामी त्यांच्या मनात शाळेतील इतर मुलांपेक्षा आपण कोणीतरी विशेष आहोत ही भावना बळावली होती. त्याच परिणामस्वरुप त्यांच्यामध्ये किंचितसा अंहकारही निर्माण झाला होता.

गणितात मिळालेले शून्य मार्क ऐकून लेखिकेला दुपारी मिळालेल्या कौतुकाची धुंदी डोळ्यावरुन उतरली होती. जड पायाने टेबलाजवळ जाऊन त्यांनी शिक्षकांकडून गणिताचा पेपर घेतला. नापास झालेल्या इतर मुलांप्रमाणे त्यादिवशी लेखिकेलाही छडीचा प्रसाद मिळाला होता. दुपारपासून डोळ्यांवर चढलेली अहंकाराची झालर तत्काळ खाली आली होती. आजही कुणी कौतुक केले, तर त्यांना त्यांचा तो गणिताचा पेपर आठवतो अशा लेखिका सांगतात. त्यामुळे कोणी कौतुक केले, तर त्या कौतुकाने भारावून न जाता जमिनीवरच राहण्याचा त्या प्रयत्न करतात.

### २.२.७ सारांश :

थोडक्यात, व्यक्तीने आयुष्यात कितीही यशाची शिखरे सर केली तरी आपले पाय हे नेहमी जमिनीलाच टेकून ठेवावेत असा संदेश लेखिका शांता शेळके 'पन्नासपैकी शून्य मार्क' या लेखाच्या आधारे देतात. यामुळे आयुष्यात जर कधी हार पत्करावी लागली तरी व्यक्ती नैराश्याने ग्रस्त न होता आपला यशाचा पुढील मार्ग निश्चितच सर करु शकते.

## २.३ कोठे होतो कोठे आलो - सुशीलकुमार शिंदे

### २.३.१ परिचय :

सुशीलकुमार शिंदे यांचा जन्म ४ सप्टेंबर, १९४१ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील "माकडाची उपळाई" या गावी झाला. वडिलांच्या निधनानंतर त्यांना आयुष्यात अनेक समस्यांचा सामना करावा लागला. आठवी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी घराची जबाबदारी सांभाळण्यासाठी सोलापूरच्या न्यायालयात शिपाई म्हणून नोकरी केली. नोकरी सांभाळून त्यांनी आपले सर्व शिक्षण पूर्ण केले. बी.ए. पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक म्हणूनही काम पाहिले. दरम्यानच्या काळात त्यांचा राजकारणातील अनेक नामवंत व्यक्तींशी संपर्क आला. यातूनच त्यांच्या राजकारणातील प्रवासाची सुरुवात झाली. ते महाराष्ट्राच्या विधानसभेवर पाच वेळा निवडून आले. त्यानंतर त्यांच्यावर कॅबिनेट मंत्री म्हणून अर्थ, नियोजन, उद्योग, समाजकल्याण अशा विविध खात्यांचा कार्यभार सोपविण्यात आला होता. आरक्षित वर्गातील उमेदवार असूनही ते बाराव्या व तेराव्या लोकसभेवर सर्वसाधारण उमेदवार म्हणून निवडून आले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १८ जानेवारी, २००३ ते ४ नोव्हेंबर, २००४ पर्यंत कार्यभार सांभाळला. त्यानंतर म्हणजेच ४ नोव्हेंबर, २००४ ते २९ जानेवारी, २००६ पर्यंत त्यांनी आंध्रप्रदेशचे राज्यपाल म्हणून कार्यभार सांभाळला. १९९३-९४ मध्ये संसदीय कामातील योगदान व जास्तीत जास्त प्रश्न उपस्थित केल्याबद्दल त्यांना "नॅशनल सिटीझन" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### २.३.२ कोठे होतो कोठे आलो :

'कोठे होतो कोठे आलो' या लेखात सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या संघर्षमय जीवनाची वाट शब्दबद्ध केली आहे. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांचे नाव ज्ञानेश्वर असे ठेवले होते. ते नाटकात काम करायला लागल्यानंतर त्यांनी सुशीलकुमार या नावाने ओळख निर्माण केली. त्यानंतर सर्वांना ते याच नावाने परिचित झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबावर अनेक समस्या ओढावल्या गेल्या होत्या. लहानपणी सुशीलकुमार शिंदे हे उनाड स्वभावाचे होते. मात्र त्यांच्या सावत्र आईच्या संस्कारामुळे त्यांच्या या उनाड स्वभावाला आळा बसला. त्यानंतर त्यांनी घरखर्चात मदत करण्यासाठी अगदी लहानवयातच नोकरी स्वीकारली, नोकरी करुन शिकत असल्यामुळे त्यांना शालांत परीक्षा पास करण्यासाठी तीन वेळेस प्रयत्न करावे लागले. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक म्हणून नोकरी करीत असताना ते एल.एल.बी. करीत होते. मात्र नोकरीच्या व्यापामुळे ते एल.एल.बी. च्या पहिल्या वर्षाला नापास झाले. असे असले तरी, त्यांनी जिद्द व महत्त्वाकांक्षेची कास कधीच सोडली नाही. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी यशस्वी कारकिर्द सांभाळली.

### २.३.३ प्रस्तावना :

'कोठे होतो कोठे आलो' या लेखात सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या बालपणीच्या संघर्षाची कथा मांडलेली आहे. त्यांचे वडील हयात होते, तोपर्यंत त्यांच्या घरी श्रीमंती होती. मात्र वडिलांचे छत्र हरवल्यानंतर त्यांना अनेक आर्थिक बिकट परिस्थितींचा सामना करावा लागला. आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी त्यांना अगदी लहानपणीच नोकरी पत्करावी लागली होती. मात्र अशा या खडतर परिस्थितीतून मार्ग काढत ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत येऊन पोहोचले.

### २.३.४ शालेय जीवनातील आठवणी :

सुशीलकुमार शिंदे याच्या वडिलांना मूल होत नव्हते म्हणून त्यांनी चार लग्न केली. त्यांच्या वडिलांची चौथङ बायको म्हणजे सुशीलकुमार यांच्या आई होय. त्यांना चार मुले झाली, मात्र त्यातील तीन मुले वारली व फक्त सुशीलकुमार शिंदे हे जिवंत होते. शिंदे यांना शाळेची गोडी अजिबात नव्हती. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांच्या वडिलांनी त्यांना शाळेत घातले. मात्र शाळेत कोणत्याही प्रकारच रस नसल्याने ते शाळेत जात नव्हते. त्यांचे वडील मात्र त्यांना शाळेत जाण्यासाठी चार आणे देत असत. शाळेत असताना त्यांचा गणित विषय कच्चा होता. पाढे तर त्यांना जमतच नव्हते. वडील त्यांच्याकडून ते पाढे पाठ करुन घेत असत. पुढे वडिलांचा मृत्यू झाला. त्यानंतर आर्थिक परिस्थिती चांगली असूनही केवळ वडिलांचा धाक न राहिल्यामुळे ते उनाड झाले. त्यांच्या आईने त्यांना शाळेत पाठविण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

### २.३.५ शालेय जीवनातील चोरीची सवय :

शाळा सोडून दिल्यानंतर सुशीलकुमार शिंदे यांना एक वाईट सवय लागली ती म्हणजे चोरी करणे. त्यांच्या शहरात 'भांडी गल्ली' म्हणून भांड्यांच्या दुकानाची गल्ली प्रसिद्ध आहे. त्याठिकाणचे दुकानदार दर अमावस्येला दुकान धुऊन साफ करीत असे. तेव्हा दुकानातील बरेचसे सामान जसे की, भांडी, वजने, तराजू इत्यादी ते रस्त्यावर काढून ठेवीत असत. रात्रीच्या वेळी त्या ठिकाणी जाऊन हातात येईल ती वस्तू लेखक चोरुन आणत असत. ती वस्तू लक्ष्मी मार्केटच्या नाक्यावर बसलेल्या एका माणसाला विकत असे. या चोरीच्या पैशाने पाणीपुरी, भेळपुरी खाणे, सिनेमाला जाणे इत्यादी उद्योग चालत असत. त्यांच्या घराजवळच भांडी गल्लीचा कोपरा आहे. या कोपऱ्याशी एक झवेरी जमातीची बाई टोपलीत पत्त्यांचे कॅट, कात्र्या, गुंड्या वगैरे माल घेऊन विकायला बसायची. दुपारच्या वेळेस ती त्या मालावर चादर टाकून जेवायला जात असे. हीच संधी साधून सुशीलकुमार शिंदे यांनी त्या टोपलीतून दोन-तीन पत्त्यांचे कॅट, तीन-चार कात्र्या उचलल्या, मात्र यावेळी त्यांना ही चोरी करताना भांडी गल्लीतील इतर दुकानदारांनी पाहिले होते. ती बाई आल्यानंतर ढोराच्या घाऱ्या डोळ्याच्या मुलाने चोरी केल्याचे त्या बाईला सांगितले. ती बाई रडत रडत त्यांच्या घरी गेली व सुशीलकुमार यांनी चोरी केल्याचे सांगितले. मात्र चोरी केली नाही असे ते म्हणू लागले नंतर त्यांच्या आईने त्यांना बेदम मारुन देवापुढे चोरी केल्याचे कबूल करायला लावले. ज्या माणसाला माल विकला होता त्याला दोन रुपये देऊन तो माल परत घेतला व त्या महिलेला परत केला. या प्रसंगानंतर भांडी गल्लीतील त्यांच्या चोऱ्या थांबल्या असे सुशीलकुमार शिंदे सांगतात.

### २.३.६ कुटुंब खर्चाला हातभार :

सुशीलकुमार शिंदे यांचे वडील गेल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती आणखी खालावत चालली होती. घराचे येणारे भाडे व आईच्या दागिण्यांवर त्यांना चरितार्थ चालवावा लागत होता, असे असून देखील त्यांना कधीही कोणत्याही नातेवाईकांकडे मदतीसाठी हात पसरला नाही. दरम्यान त्यांच्या सावत्र आईच्या विचारांचा त्यांच्यावर खूप परिणाम झाला. त्यांच्या सावत्र आईनेच त्यांचे आयुष्य घडविले असे ते सांगतात. त्यांच्या समोरच राहणाऱ्या मामलेदाराची गोष्ट ती नेहमी सुशीलकुमार यांना सांगत असे. त्याच्या प्रमाणेच त्यांनीही खूप शिकावे व मोठे व्हावे अशी तीची इच्छा होती. सावत्र आईच्या विचारामुळे व उपदेशामुळे त्यांच्या वृत्तीत हळूहळू बदल होत होता. याशिवाय शिरीषकुमार यांच्या गोष्टींचाही त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. त्यांच्याप्रमाणेच आपणही आपल्या आईला घरकामात मदत करावी असे विचार त्यांच्या मनामध्ये

घोळू लागले होते. दिवाळी, दसरा या सणांच्यावेळी ते उद्‌बत्या विकून पैसे मिळवू लागले. त्यानंतर शाळेमध्येही जाऊ लागले. नंतर एका गोळ्याच्या

### २.३.७ उष्टी मिठाई खाण्याची सवय :

भांडी गल्लीतील चोऱ्या तर थांबल्या मात्र,त्यानंतर त्यांना आणखी एक वाईट सवय जडली ती म्हणजे कागदाच्या बोळ्यावर उरलेली उष्टी मिठाई खाण्याची. बाजारपेठेतील एका मिठाईच्या दुकानात लोक दिवसभर मिठाई खाण्यास येत असे. खाऊन झाल्यानंतर मिठाईचे कागद एका टोपलीत टाकले जात. त्या कागदाने भरलेल्या टोपल्या सुशीलकुमार व त्यांचे मित्र घेऊन जात असे व त्यातील उष्टी मिठाई खाऊन त्या रिकाम्या टोपल्या दुकानदाराला परत आणून देत असे. त्याच मिठाईच्या दुकानात पुणेकर आणि वळंगे नावाचे दोन हलवाई होते. ते दोघेही सुशीलकुमारांच्या वडिलांना चांगले ओळखत होते. एकदा त्यांनी सुशीलकुमार यांना उष्टी मिठाई खाताना बघितले. पुणेकरांनी त्यांना सुनावले की, "तुझा बाप चांगला श्रीमंत माणूस होता. आई घर सांभाळून आहे आणि तू येथे भिकाऱ्यासारखी उष्टी मिठाई खात आहेस." याशिवाय त्यांनी सुशीलकुमार यांच्या दोन थोबाडीतही मारल्या व तेथून त्यांना हाकलून दिले. त्यानंतर त्यांची ही सवय संपुष्टात आली.

### २.३.८ सुशिक्षित पांढरपेशा कुटूंबाची ओळख :

नंतरच्या काळात सुशीलकुमार शिंदे यांच्या वडिलांचे स्नेही डॉ. वैशंपायन यांनी मुले सांभाळण्याचे काम करशील का असे सुशीलकुमार यांना विचारले. डॉक्टरसाहेबांच्या घरी काम करण्याची त्यांनी तयारी दर्शविली. त्यानंतर ते वाडीया हॉस्पिटलमध्ये कामावर जायला लागले. महिन्याला पगार १२ रुपये झाला. तिथे गेल्यावर डॉक्टरांची मैत्रीण सोनुबाई आवटे यांच्या मुली सांभाळण्याचे काम होते. त्या मुलींना सांभाळायला जायला लागल्यावर सुशीलकुमार शिंदे यांची पांढरपेशा वर्गाशी ओळख झाली. श्रीखंड, कोशिंबीर यांसारख्या पदार्थांची त्यांना प्रथम ओळख याच ठिकाणी झाली. चपातीला पोळी म्हणतात हे देखील त्यांना सर्वप्रथम याच ठिकाणी माहीत झाले नाही तर त्यांनी पुरणपोळी खेरीज दुसरी पोळी माहिती नव्हती. जेवणार नेहमी भाकरी आणि मटणाचे कोरड्यास असणाऱ्या सुशीलकुमारांना येथे येऊन नवनवीन पदार्थाची ओळख झाली. याठिकाणी आल्यावर त्यांच्यावर अनेक चांगले संस्कारही झाले. घरात स्वच्छता, टापटीप कशी ठेवावी हे ते त्याठिकाणी शिकले. तसेच त्यांची वाणी शुद्ध होण्यासाही याठिकाणी मदत झाली. एकंदरीत ज्या दोन मुलींना सांभाळण्याचे काम त्यांनी केले, नंतर त्यांच्या लग्नालाही ते उपस्थित राहिले. त्यातली एक मुलगी एम.ए. लॉ झाली आहे तर दुसरी एका पोलीस अधिकाऱ्याची पत्नी आहे. एकंदरीत या कामाच्या माध्यमातून सुशीलकुमार शिंदे यांच्या जीवनाला एक नवी दिशा प्राप्त झाली. त्यानंतर आवटेबाईंच्या ओळखीने त्यांना लेडीज क्लबमध्ये अर्धवेळ नोकरी मिळाली. झाडलोट करण्याचे काम ते त्याठिकाणी करत. खेळांमध्ये त्यांचा रस निर्माण झाला तो याच ठिकाणी. ते बॅडमिंटन खेळायलाही या लेडीज क्लब मध्येच शिकले. त्यावेळी त्यांचे वय अवघे १२-१३ वर्षाचे होते. मात्र या वयात सुशिक्षित लोकांशी संबंध आल्याने त्यांच्या वागण्यात, बोलण्यात, राहणीमानात, शिष्टाचारात बराच बदल घडून आला. परिणामी त्यांची शिकण्याची ईर्ष्या पुन्हा एकदा जागृत झाली.

### २.३.९ राम शाळेत प्रवेश :

सुशिक्षित लोकांच्या वाढलेल्या सान्निध्यामुळे शिकण्याची इच्छा सुशीलकुमार यांच्या ठायी निर्माण झाली. क्लबच्या चाव्या त्याच्याकडे असायच्या त्यामुळे रात्री चार-पाच मित्रांसोबत

munotes.in

ते तिथेच अभ्यास करीत असत. त्यांच्या आईलाही त्यांनी एखादी छोटी नोकरी मिळण्याइतपत तरी शिकावे असे वाटत होते. वाडीया हॉस्पिटल ते सुशीलकुमारांचे घर यांमधील अंतर सुमारे चार मैलाचे होते. हॉस्पिटल ते घर याच रस्त्यावर एक नाईट स्कूल देखील होते. त्यांनी जेव्हा ते हायस्कूल प्रथम पाहिले, तेव्हा त्यांना आनंद झाला कारण शिक्षणाचा मार्ग सापडला त्यांच्या शिक्षणात मात्र बराच खंड पडल्याने नाईट स्कूलमध्ये

### २.३.१० न्यायालयात शिस्तेदारांचा शिपाई म्हणून नेमणूक :

आठवीची परीक्षा झाल्यावर वर्तमानपत्रात सोलापूरच्या कोर्टात ऑफिस-बॉयच्या जागा भरायच्या आहेत अशी जाहिरात त्यांनी वाचली. त्यांनी लगेचच त्या नोकरीसाठी अर्ज केला. उद्योग विनिमय केंद्रात तयंनी स्वतःचे नाव नोंदविले होते. त्या केंद्रातूनही त्यांचे नाव सुचविण्यात आले. नंतर कोर्टातून मुलाखतीसाठी बोलावणे आल्यावर सुशीलकुमार शिंदे मुलाखतीला गेले. व्ही.एन. पालेकर हे त्यावेळचे डिस्ट्रिक्ट जज्ज होते. त्यांनी शिंदेची मुलाखत घेतली. शिंदेनी पालेकरांना स्वतःची सर्व परिस्थिती सांगितली. मुलगा चुणचुणीत आहे हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी 'डॉ. वैशंपायन यांची चिठ्ठी आणली तरच मी तुला कामावर घेईल?' अशी अट घातली. शिंदे धावत पळतच डॉक्टर साहेबांकडे गेले. डॉक्टरांनीही चिठ्ठी दिली आणि दुसऱ्याच दिवसापासून त्यांची शिस्तेदारांचा शिपाई म्हणून नेमणूक करण्यात आली. वकिलांना पुकारायचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. 'अर्जदार हजर आहे?' असे तीन वेळा मोठ्याने पुकारायचे असे. मोठ्याने पुकारायचे म्हणजे आपण मोठे कोणीतरी आहोत अशी त्यांची समजूत झाली. अंगात पांढरे स्वच्छ कपडे, कमरेपर्यंत लाल पट्टा असा त्यांचा गणवेश होता. कोर्टातील सर्व कामे धावतपळत करायची जज्ज साहेबांसाठी ट्रे मधून चहा घेऊन जायचा या सर्वांचे त्यांना नाविण्य वाटत होते. त्यातच ऑफिस बॉयचा पहिल्या महिन्याचा पगार सत्तर रुपये जेव्हा हातात आला, तेव्हा त्यांच्या आनंद गगनात मावेनासा झाला. आतापर्यंत केवळ बारा-पंधरा रुपयांत काम केल्यामुळे एवढ्या मोठ्या पगाराचा आनंदही तितकाच मोठा होता. पगार आईच्या हातात दिला व खर्चासाठी हवे तेवढे पैसे मागून घेतले व नंतर त्यांनी मित्रांना पार्टी दिली.

न्यायालयात नोकरी लागलेली असली तरी, त्याठिकाणी त्रास नव्हता असे नव्हते. न्यायालय छोटे असल्याने तेथे रेकॉर्ड ठेवण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे कोर्टाचे रेकॉर्ड हे सरकारी नॉर्थकोर्टच्या हायस्कूलच्या इमारतीत ठेवले जायचे. ते रेकॉर्ड रुम अतिशय अंधकारमय होते. कचरा-धूळ तेथे सतत साचलेली असायची आठवड्यातून एकदा रेकॉर्ड-रूम झाडायला ते जात असत. कितीही साफ-सफाई केली तरी, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात धूळ साचतच रहायची. याखेरीज त्या खोलीमध्ये सापाची बिळे देखील होती. त्यामुळे त्या खोलीत जाण्याची भिती वाटत असे. जुन्या रेकॉर्डच्या प्रती हव्यात म्हणून लोकांचे अर्ज येत. हे जुने रेकॉर्ड मोठमोठ्या रॅकवर असायचे कोर्टातील एक कारकून आणि शिंदे यांच्यावर ही जुनी रेकॉर्ड काढण्याची जबाबदारी असे, रेकॉर्ड काढताना सापाच्या धुसफुसीचा आवाज यायचा. त्यामुळे त्यांना खूप भीती वाटायची व कोठून ही नोकरी पत्करली असे विचार मनात यायचे. मात्र आयुष्यात जर चांगले दिवस पाहायचे असतील तर होणारा त्रास व कष्ट सहन केलेच पाहिजेत असे त्यांचे मन स्वतःलाच प्रोत्साहन देत असे. आपण नक्की कोणीतरी मोठे होणार ही आकांक्षा उराशी बाळगून त्यांनी नोकरी आणि शाळा या दोन्ही गोष्टी मोठ्या जिद्दीने चालू ठेवल्या.

### २.३.११ वकील होण्याची महत्त्वाकांक्षा :

कॉलेजात असताना सुशीलकुमार शिंदे यांनी भरपूर वाचन केले. डॉ. फडकुले यांनी मराठी आणि डॉ. पुंडे यांनी राज्यशास्त्र या विषयात शिंदेना बहुमोल मार्गदर्शन केले. त्यामुळे त्यांची या विषयातील प्रगती अतिशय चांगली होती. शिंदे कोर्टात शिपायाची नोकरी करीत होते. हे फक्त कॉलेजमधील प्राचार्य आणि प्राध्यापकांना माहीत होते. कॉलेजात ही गोष्ट कोणत्याही विद्यार्थ्याला माहीत नव्हती. कोर्टात शिपायाचा गणवेश जरी परिधान करीत असले, तरी ते कॉलेजात टापटीप कपडे घालून येत असत. त्याच वेळी सोलापूरच्या कोर्टात 'माधव काजी' हा खटला चालू होणार होता. त्यामुळे पहिल्याच दिवशी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी पाहिले. त्यावेळी त्यांना थोडी लाज वाटली, वाईट वाटले. मात्र थोड्याच वेळात ते स्वतःच्याच मनाशी पुटपुटले की, मी काही चोरी वगैरे करीत नाही, लबाडी करीत नाही मग कशाची शरम बाळगायची कॉलेजला असताना अनेक कामे त्यांनी केली मात्र अभ्यासाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. कारण ज्या कोर्टात त्यांनी शिपाई म्हणून काम केले होते. त्याच कोर्टात त्यांना वकील म्हणून उभे रहायचे होते. वकील होण्याची हीच महत्त्वाकांक्षा ते उराशी बाळगून दिवस रात्र कष्ट करुनही अभ्यासात कोणत्याच प्रकारचा व्यत्यय ते येऊ देत नव्हते.

### २.३.१२ लॉ कॉलेजात प्रवेश :

१९६५ साली ते राज्यशास्त्र हा विषय घेऊन बी.ए. पास झाले. दयानंद कॉलेजात त्यांचा प्रथम क्रमांक आला होता. संगमेश्वर कॉलेजात बी.ए. ची पहिली दोन वर्षे केल्यानंतर त्यांनी तिसऱ्या वर्षी दयानंद कॉलेजात प्रवेश घेतला होता. वकील बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असणाऱ्या सुशीलकुमार शिंदे यांनी कोर्टातील नोकरीचा राजीनामा देऊन कायद्याच्या अभ्यासासाठी पुण्यातील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. त्याच दरम्यान ते आय.ए.एस. (इंडीयन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्विस) परीक्षेचाही अभ्यास करीत होते. पुण्यात आल्यावरही त्यांच्या स्वभावानुसार विद्यार्थी चळवळीमध्ये सहभाग घेतला. या चळवळीच्या निमित्ताने त्यांची शरद पवारांशी पहिली भेट झाली. त्याच दरम्यान भारत-पाकिस्तान युद्ध देखील चालू होते. पाकिस्तानच्या आक्रमणाचा निषेध करण्यासाठी त्यावेळचे पुणे विद्यापीठाचे कुलगुरु काकासाहेब गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्च्यामध्ये सुशीलकुमार शिंदे यांनी हिरीरीने सहभाग घेतला होता.

munotes.in

### २.३.१३ पोलीस खात्यात नोकरी :

लॉ, आय.ए.एस. चा अभ्यास करीत असताना व विद्यार्थी चळवळीमध्ये सहभाग घेत असताना, सुशीलकुमार शिंदे यांच्या आयुष्याला एक वेगळेच वळण प्राप्त झाले. त्यांचा सोलापूरचा एक मित्र सुभाष विळेकर त्यांना भेटण्यासाठी पुण्यात आला होता. त्याने सुशीलकुमार यांना वर्तमानपत्रात पोलीस खात्यातील सबइनस्पेक्टरच्या पदासाठी जाहिरात आल्याचे सांगितले आणि आय.ए.एस. चा अभ्यास चालूच आहे, तर या पदासाठीची मुलाखत देण्यास काय हरकत आहे असेही त्याने शिंदे यांना सांगितले, त्याच मित्राने त्यांचा अर्ज भरुन पाठविला. नंतर शिंदे यांना मुलाखतीसाठी पत्र आले. मुलाखतीसाठी आलेले पत्र हे सुदैव की, दुर्दैव हेच त्यांना समजत नव्हते. ते मुलाखतीसाठी मुंबईला गेले. आय.जी.पी. मजिदुल्लांनी त्यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत त्यांनी सुशीलकुमार यांना राज्यशास्त्र सोडून अर्थशास्त्रावरच अधिक प्रश्न विचारले. त्यावर ते मजिदुल्लांना म्हणाले की, मी राज्यशास्त्राचा विद्यार्थी असूनही तुम्ही मला अर्थशास्त्रावरचे प्रश्न का विचारता? या प्रश्नामुळे त्यांची निवड होणार नाही असे त्यांना वाटले; परंतु त्यांची निवड झाली. त्यानंतर मुंबईमध्येच तीन महिन्यांचे त्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले व

प्रशिक्षणाचा कालावधी संपल्यानंतर ६ डिसेंबर, १९६५ मध्ये त्यांना पोलीस खात्यात सबइन्स्पेक्टर म्हणून नोकरी मिळाली. त्यावेळी त्यांना साडेतीनशे रुपये पगार होता. राहण्यासाठी पोलीस क्वार्टरही देण्यात आले होते. पोलीस खात्यात नोकरी करीत असताना त्यांचा काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांशी संबंध येत होता. काहींबरोबर स्नेहाचे संबंध जुळाले होते. लेबर विंगचे काम पाहत असताना त्यांचा काँग्रेसचे कामगार कार्यकर्ते श्रीराम लेले यांच्याशी घनिष्ठ संबंध आला. त्याच्या घरी शिंदे यांचे नेहमी येणे-जाणे असायचे. त्याचवेळी लेलेंच्या घरी शरद पवारांशी पुन्हा एकदा भेट झाली. त्यानंतर शरद पवार व सुशीलकुमार शिंदे यांच्या मैत्रीचे संबंध अधिक दृढ होत गेले, एकदा अशाच एका राजकारण विषयक बैठकीत शरद पवार यांनी तू पार्लमेंटला उभा राहशील का? असे शिंदे यांना विचारले होते. मात्र त्यांना पोलीस खात्यातील नोकरी सोडून वकिली करायची होती.

### २.३.१४ पहिली विधानसभा निवडणूक :

करमाळा तालुका मतदार संघातून निवडून आलेले ताराप्पा सोनावणे हे वर्षभराने निधन पावले. त्यानंतर करमाळा तालुका मतदार संघात पोट निवडणूका आयोजित करण्यात आल्या. यावेळी मात्र काँग्रेस पक्षाने सुशीलकुमार शिंदे यांना तिकीट दिले. २३ एप्रिल १९७३ रोजी निवडणुका झाल्या. यामध्ये सुशीलकुमार शिंदे यानी नजिकच्या उमेदवाराचा २५ हजारापेक्षा अधिक मतांनी पराभव केला होता. निवडणुका होण्याच्या आधी दोन वर्षे व त्या आधीच्या निवडणुकांमध्येही सुशीलकुमार यांनी करमाळा मतदारसंघात अधिक काम केले होते. त्यामुळे त्यांना या निवडणुकीत भरघोस यश मिळाले होते. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस त्यांनी विधानसभेत आमदार म्हणून पहिले पाऊल टाकले. वसंतराव नाईक हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. मित्र शरद पवार मंत्रीमंडळात मंत्री होते.

### २.३.१५ राज्यमंत्रीपदी नेमणूक :

८ सप्टेंबर रोजी शिंदे त्यांच्या दादरच्या ऑफिसात एका खून खटल्याचे कागदपत्र पाहत बसले होते. त्यावेळी त्यांच्या ऑफिसात फोन नव्हता. घरी आल्यावर त्यांच्या आईने कुणी नाईक व पवार यांचा फोन येऊन गेल्याचे सांगितले. त्यावर त्यांना समजले की, मुख्यमंत्री वसंतराव नाईक व शरद पवार यांचे फोन येऊन गेले असतील. म्हणून त्यांनी नाईक यांच्या पी.ए. ला फोन करुन विचारले तर त्याने नाईक साहेबांनी उद्या बोलावले आहे हे सांगितले. त्यांचा फोन ठेवल्यानंतर यु.एन.ए. या वृत्तसंस्थेतून शिंदे यांचे मित्र आगाशे यांचा फोन आला व राज्यमंत्री पदी नेमणूक झाल्याबद्दल त्याने सुशीलकुमार यांचे अभिनंदन केले. त्यांच्यासाठी हे सारे अनपेक्षितच होते, ते तसेच रात्रीच्या वेळी शरद पवार यांच्या घरी गेले. रात्रीचे अडीच वाजले होते. पवार घरी नव्हते. ते प्रभाकर कुंटे यांच्या घरी गेले आहेत हे कळाल्यावर शिंदे कुंटे यांच्या घरी गेले. कुंटे यांनाही त्यावेळी राज्यमंत्री पद दिले होते. शिंदे यांनी मात्र मंत्रीमंडळात जाण्याची कल्पनाही केली नव्हती. किंबहुना तशी इच्छा ही नव्हती.

### २.३.१६ सारांश :

वरीलप्रमाणे 'कोठे होतो कोठे आलो' या लेखाच्या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करता येते. एके काळी शाळेत उनाडपणा करणारा विद्यार्थी, शालांत परीक्षेत नापास होणारा विद्यार्थी, एल.एल.बी. च्या पहिल्या वर्षाची परीक्षा नापास होणारा विद्यार्थी केवळ कष्ट आणि संघर्षाच्या जोरावर महाराष्ट्राचा मुखमंत्री पदी विराजमान होतो. लहान मुलांना सांभाळण्याचे काम केलेला हा

munotes.in

मुलगा पुढे अर्थखाते व संपूर्ण महाराष्ट्र सांभाळतो यातूनच लेखाच्या शिर्षकाची समर्पकता वाचकांपुढे येते.

## २.४ शब्दाचे मोल - चंद्रशेखर धर्माधिकारी

### २.४.१ परिचय :

चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा जन्म २० नोव्हेंबर, १९२७ रोजी मध्यप्रदेशातील रायपूर येथे झाला. चंद्रशेखर धर्माधिकारी हे मराठी लेखक, वकील, न्यायाधीश व भारतीय स्वातंत्र्यसैनिक आहेत. १९७२ साली त्यांची उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी अनेक प्रकारची पुस्तके लिहून मराठी साहित्य संपदेत भर घातली. 'अंतयात्रा', 'काळाची पाऊले', 'भारतीय संविधानाचे अधिष्ठान', 'मंझिल दूरच राहिली', 'माणूसनामा', 'मानवनिष्ठ अध्यात्म', 'शोध गांधीचा', 'समाजमन', 'सहप्रवास', 'सूर्योदयाची वाट पाहूया' ही त्यांची मराठी पुस्तके आहेत, तर 'न्यायमूर्ती का हलफनामा', 'लोकतंत्र एवं राहों के अन्वेषण' ही हिंदी पुस्तकेही झालेली आहेत. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी विविध संस्थांचे अध्यक्षपद भूषविले आहे. विविध सामाजिक व सांस्कृतिक चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. २००४ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### २.४.२ शब्दाचे मोल :

'शब्दाचे मोल' हा लेख चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या 'काळाची पाऊले' या पुस्तकातून घेतलेला आहे. लहानपणापासूनच चंद्रशेखर धर्माधिकारी यांना नाटकात काम करण्याची, वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची खूप आवड होती. त्यांचे वडील दादा धर्माधिकारी यांच्या प्रभावामुळे चंद्रशेखर यांना वक्तृत्वाची / भाषणाची गोडी लागली होती. वक्तृत्वाची सुरुवात करताना त्यांनी सर्वप्रथम वडिलांकडून भाषणे लिहून घेऊन भाषणे करण्यास सुरुवात केली. त्यानंतर हळूहळू स्वतःची टिपणे तयार करुन त्यांनी भाषणे केली. कालांतराने त्यांच्यातील वक्तृत्व कला खुलून बाहेर आली. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांनी कार्य केलेले ते चंद्रशेखर धर्माधिकारी एल्.एल्.बी. च्या परीक्षेत नापास झालेले होते. मात्र अपयशाने खचून न जाता त्यांनी वकिली क्षेत्रातच आपले कर्तृत्व गाजविले. 'शब्दाचे मोल' या लेखाच्या निमित्ताने त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रथमतः नापास होण्याचा प्रसंग वाचकांना सांगितला आहे.

### २.४.३ प्रस्तावना :

न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या 'काळाची पाऊले' या पुस्तकातून शब्दाचे मोल हा लेख घेतलेला आहे. या लेखामध्ये चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी त्यांच्या वक्तृत्व कलेचा विकास कशाप्रकारे होत गेला आहे हे स्पष्ट केले आहे. याखेरीज एल्.एल्.बी. च्या दुसऱ्या वर्षाला नापास होऊन खचून न जाता मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला. हे देखील या लेखात स्पष्ट करण्यात आले आहे.

### २.४.४ नाटकातील सहभाग :

लहानपणी नाटकामध्ये चंद्रशेखर धर्माधिकारी बऱ्यापैकी काम करीत असल्याचे सांगतात. त्या क्षेत्रात नक्कीच काहीतरी लौकिक मिळवू असे त्यांनी त्यांच्या शालेय जीवनात वाटू लागले होते. मात्र १९४२ च्या चले जाव च्या आंदोलनात सहभाग घेतला, तेव्हा त्यांना

munotes.in

शाळाच बंद पाडली होती. त्यामुळे त्यांना इतर कोणत्याही शाळेत प्रवेश मिळणे अवघड झाले होते. शाळेत असताना त्यांनी मामा वरेरकरांचे 'हाच मुलाचा बाप' या नाटकातील एक अंक, चिं.वि. जोशी यांच्या 'वायफळांचा मळा' या पुस्तकातील काही प्रसंग नाटकाच्या स्वरुपात सादर केले होते. नाटकात काम करण्याबरोबरच धर्माधिकारी हे नाटकातील स्वगतेही सादर करीथ असत. राम गणेश गडकरी यांच्या 'राजसंन्यास' या नाटकातील व विष्णूपंत औंधकर यांच्या 'बेबंदशाही' या नाटकातील संभाजींची स्वगते धर्माधिकारी अतिशय उत्तमरीतीने सादर करीत असत. यामुळे झालेल्या कौतुकाने आपली छाती दोन इंच फुगत असल्याचे चंद्रशेखर धर्माधिकारी सांगतात. परिणामी इतर विविध स्पर्धांमध्ये लहानपणी चंद्रशेखर धर्माधिकारी हे हिरिरीने सहभाग घेत असे. मात्र कालांतराने त्यांना हे उमगले की नाटकातील स्वगते सादर केल्यानंतर होणारे कौतुक हे त्यांचे नसून त्यांच्या वडिलांच्या मुलाचे म्हणजे 'दादांच्या चंदूचे' होते. असे असले तरी नाटकातील स्वगते सादर करता करता त्यांच्यातील वक्तृत्व कलेला चालना मिळत गेली. त्यामुळे पाठ केलेली स्वगते व सुसंस्कृत पाठांतराने वाणी स्वच्छ होऊन आपले वक्तृत्व विकसित होण्यास मदत झाली असे धर्माधिकारी सांगतात.

### २.४.५ विविध वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये सहभाग :

आयुष्यात केलेल्या पहिल्याच भाषणात 'प्रथम क्रमांकाचे' बक्षीस मिळाल्यामुळे विविध वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घेण्याची उमेद वाढली असे चंद्रशेखर धर्माधिकारी सांगतात. विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यांनी अनेक बक्षिसेही संपादन केली. सुरुवातीला दादांकडून भाषण लिहून घेतले जात असे. मात्र नंतर चंद्रशेखर धर्माधिकारी स्वतःच भाषण लिहू लागले. कालांतराने तर ते फक्त मुद्दे काढून त्यावर भाषण करु लागले. अंगी 'सभाधीटपणा' आला व चांगले वक्तृत्व आहे असे लोकांकडून कौतुकही होऊ लागले होते. त्यामुळे त्यांना अजुनच उत्साह व उमेद मिळत होती. कालांतराने वयाने मोठ्या असलेल्या स्पर्धकांसमोर वादविवाद स्पर्धेत भाग घेऊ लागले. वक्तृत्व स्पर्धांमध्ये त्यांना अनेक बक्षीसे मिळत गेली. असे असले तरी त्यांच्यामध्ये कधीही अहंकार निर्माण झाला नाही. कारण इतकी बक्षीसे मिळविण्याचे श्रेय ते ज्या वातावरणात वाढले, त्या वातावरणाला देतात. आजूबाजूच्या राजकीय वातावरणामुळे वक्तृत्वसाठीची बहुश्रुतता सहज त्यांच्या अंगी आली होती. "इतरांना आपल्यासारखा राजकीय वातावरणाचा सहवास न लाभल्यामुळे आपण वक्तृत्वात पारंगत झालो" असे ते म्हणतात. थोडक्यात 'वासरात लंगडी गाय शहाणी ठरली' या युक्तीचा ते उपयोग करतात.

### २.४.६ चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे पहिले भाषण :

वर्ध्याच्या शाळेत असताना चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी आपले पहिले भाषण दिले. इंग्रजीच्या पहिलीच्या वर्गात असताना 'अहिंसा' या अत्यंत कठीण व बोजड विषयावर धर्माधिकारी यांनी आपले पहिले भाषण केले होते. भाषणाची तयार करताना सर्वप्रथम दादांकडून म्हणजेच त्यांच्या वडिलांकडून त्यांनी भाषण लिहून घेतले. भाषणाची सुरुवात कशी करायची शेवट कसा करायचा हे देखील त्यांनी दादांकडूनच समजावून घेतले. संपूर्ण भाषण पाठ करुन भाषण कसे करावयाचे याचा सरावही चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी केला होता. आवाजातील चढ-उतार, कुठे थांबायचे, कुठे आवाज वाढवायचा, कुठे कमी करायचा याचा सरावही आरशासमोर उभे राहून केला होता. शेवटी स्पर्धेचा दिवस उजाडला.

चंद्रशेखर धर्माधिकारी यांना भाषणातील पहिले-वहिले बक्षिसही मिळाले. चंद्रशेखर धर्माधिकारी याठिकाणी असेही नमूद करतात की, त्यादिवशी खऱ्या अर्थाने त्यांनी भाषण मुळी

केलेच नव्हते. कारण त्या दिवशी केवळ पाठ केलेले भाषण ते बोलून आले होते. भाषणाच्या विषयातील सर्व मुद्दे त्यांना समजलेच होते असे नाही. पण परीक्षकांना हे मुद्दे समजले म्हणून त्यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. याठिकाणी ते विशेषतः नमूद करतात की, 'मी दादांचा मुलगा होतो याचाही भाग मला बक्षीस मिळण्यात असू शकतो किंवा इतरांना दादांसारखा भाषण लिहून देणारा पिता लाभला नाही, म्हणूनही मला बक्षीस मिळाले असेल.'

### २.४.७ वक्तृत्व भाषाशैलीवर प्रभुत्व :

वक्तृत्वशैलीतील प्रगल्भता ही देखील आपणास दादांमुळे प्राप्त झाली असे चंद्रशेखर धर्माधिकारी सांगतात. भाषणानंतर विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्याची कला म्हणजेच ती उत्तरे कधी द्यावीत याचे ज्ञान देखील त्यांना त्यांच्या वडिलांकडून प्राप्त झाले होते. या संदर्भात लेखक दोन उदाहरणे देतात. एकदा त्यांच्या शाळेत अहिंसेवर आधारित दादांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. भाषणानंतर एका विद्यार्थ्याने दादांना प्रश्न केला की, इतिहासात आजपर्यंत कोणालाही अहिंसेने स्वराज्य प्राप्त झाले नाही, तर ते हिंदुस्थानला देखील कसे प्राप्त होईल? यावर दादांनी उत्तर दिले की, 'आजपर्यंत इतिहासात दादा धर्माधिकारी झाला होता का?' म्हणूनच आज मी जन्माला आलो. म्हणजेच इतिहासात जे घडले नाही ते वर्तमानात घडू शकते. आजवर इतिहासात कोणालाही अहिंसेने स्वराज्य प्राप्त झाले नाही. मात्र तुमच्या पुरुषार्थाने ते शक्य होईल व इतिहासात त्याची नोंदही होईल. गांधीजींची अहिंसा ही भेकडांसाठी मुळीच नाही ती केवळ वीरांसाठी आहे. यावरुन भाषणानंतर विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे न डगमगता कशी द्यावित याचा अनुभव चंद्रशेखर यांना त्याठिकाणी आला. तसेच दुसऱ्यांदा त्यांच्याच शाळेत दादांचे गांधींच्या विचारांवरील भाषण आयोजित केले होते. भाषणांनतर कोणाला प्रश्न विचारायचे असतील, तर विचारा असे शाळेतील शिक्षकांनी आवाहन केले. मात्र प्रश्न कोणीच विचारत नव्हते. शेवटी लेखकाने स्वतः उभे राहून दादांना प्रश्न विचारला, "समजा, उद्या वर्धाच्या गांधी चौकात एखादा गुंड एखाद्या अबलेचा विनयभंग करीत असेल, अशा वेळी माझ्याजवळ असलेली तलवार उपसून मी त्याची गर्दन छाटून टाकली, तर गांधींच्या अहिंसेचे काय होईल?" असा प्रश्न विचारताच श्रोता वर्ग चकित झाला. मुलगा वडिलांना असा प्रश्न विचारतो? मात्र दादांनी त्यावर त्यांना अगदी शांतपणे उत्तर दिले की, तुझ्या आजुबाजूच्या सर्व स्त्रिया जर तुझ्या दृष्ट नजरेतून वाचल्या असतील तर तू गुंडांची गर्दन नक्कीच छाटून टाक. मात्र असे जर नसेल, तर त्या गुंडात आणि तुझ्यात केवळ डिग्रीचा फरक आहे. अनेक वेळा उघडपणे गुन्हा करणारे गुंड परवडतात. कारण त्यांच्यामध्ये गुन्हा उघडणे करण्याची हिंमत असते. मात्र छुपे गुंड हे समाजाच्या नकळत वाईट कृत्य करीत असतात. थोडक्यात, 'सामाजिक ब्रह्मचर्य हे वैयक्तिक बह्मचर्यापेक्षा अधिक मोलाचे असते.' वर सांगितलेल्या व यासारख्या अनेक प्रसंगातून भाषणानंतर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे कशी द्यावीत हे चंद्रशेखर धर्माधिकारी दादांकडून शिकले. यामुळे त्यांच्या वक्तृत्वशैलीत प्रगल्भता आली असे आपणास म्हणता येते.

### २.४.८ सारांश :

वरीलप्रमाणे चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या वक्तृत्वाचा विकास स्पष्ट करता येतो. लहानपणापासून घरात राजकीय वातावरण लाभल्यामुळे त्यांच्यामधील वक्तृत्व कौशल्याचा आपोआपच विकास होत गेला. वडिलांचे मार्गदर्शन, विविध वक्तृत्व स्पर्धांमधील सहभाग यामुळेही चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या वक्तृत्वाचा विकास होण्यास मदत झाली.

## २.५ प्रारंभ - यशवंतराव गडाख

### २.५.१ परिचय :

यशवंतराव गडाख यांचे पूर्ण नाव यशवंतराव कंकरराव गडाख असे आहे. त्यांचा जन्म १२ मे, १९४३ रोजी झाला. त्यांचे बालपण व शालेय शिक्षण सोनईत तसेच महाविद्यालयीन शिक्षण अहमदनगर येथे झाले. पुढे त्यांनी बी.ए., बी.एड.ची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. त्यांनी नेवासा पंचायत समितीचे सभापती म्हणून कार्य केले. तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षण व सार्वजनिक बांधकाम समितीचे अध्यक्षपदही भुषविले. ते १९८४ ते १९९३ पर्यंत संसद सदस्यही होते. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर या बँकेचे त्यांनी १९९१ ते २००५ या काळात संचालक व अध्यक्ष म्हणून कामगिरी पार पाडली. तसेच १९९७ ते २०१० पर्यंत विधान परिषदेचे सदस्य होते. ज्यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेत कार्य केले, तेव्हा त्यांनी अनेक उल्लेखनीय कार्ये केली होती. त्यामध्ये 'आमचे गाव आमची शाळा', 'कृत्रिम रेतन प्रकल्प', अहमदनगर येथे दलित साहित्य संमेलनाचे आयोजन आणि कवी, लेखक आणि कलावंत यांच्या सत्काराचे आयोजन या कार्याचा समावेश आहे. त्यांनी मुळा सहकारी कारखान्याची १९७३ मध्ये तर मुळा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची १९७९ मध्ये स्थापना केली. या संस्थेअंतर्गत अनेक शाळा, महाविद्यालये काढली. त्यांनी 'सहवास', 'अंतर्वेध' आणि 'अर्धविराम' अशी पुस्तके लिहिली व साहित्य क्षेत्रातही एक वैचारिक लेखक म्हणून आपला वेगळा ठसा उमटविला.

### २.५.२ प्रारंभ :

'प्रारंभ' हा लेख यशवंतराव गडाख यांच्या 'अर्धविराम' या आत्मचरित्रातून घेतला आहे. या लेखामध्ये यशवंतराव गडाख यांच्या शैक्षणिक व कौटुंबिक जीवनाचा उल्लेख आलेला आहे. यशवंतराव हे सर्वसाधारण एकत्रित शेतकरी कुटुंबातील होते. त्यामुळे त्यांना कौटुंबिक जीवनात खूप संघर्ष करावा लागला. संपत्तीच्या वाटपावरुन सतत भांडणे होत असत. या कौटुंबिक संघर्षाला तोंड देत ते आपले शिक्षणही घेत होते. त्यामुळे घरची शेतीची कामे आणि दगदग यामुळे अकरावीच्या परीक्षेत ते नापास झाले. या अपयशामुळे ते निराश न होता अधिक जोमाने काम करु लागले. परिणामी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्य अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपली ओळख निर्माण केली म्हणजेच "नापास झाल्यामुळे निराश झालो नाही. त्यामुळेच यशस्वी आयुष्य जगू शकलो" असे ते 'प्रारंभ' या लेखाद्वारे सांगतात.

### २.५.३ प्रस्तावना :

'प्रारंभ' या लेखामध्ये यशवंतराव गडाख यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी सांगितल्या आहेत. त्यामध्ये ते सांगतात की ते नापास झाल्यामुळेच निराश न होता एक यशस्वी आयुष्य जगू शकले. म्हणजेच त्यातून ते खंबीर उभे राहिले आणि त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली.

### २.५.४ शालेय जीवनातील अडचणी :

सोनई येथील 'जीवन शिक्षण मंदिर' या प्राथमिक शाळेत यशवंतरावांचा प्रवेश घेण्यात आला. शाळेची इमारत लांब, कौलारु, उतरत्या छपराची व पूर्व-पश्चिम अशी होती.

मुख्याध्यापकांचे कार्यालय, वर्ग आणि समोर मैदान होते. हे वातावरण त्यांच्यासाठी नवीन होते. ते या शाळेत असताना सतत आजारी पडायचे. आईला कोणी करणी केली की काय? असे सतत वाटायचे. त्यामुळे ती त्यांना देवऋषीकडे घेऊन जात असे. शाळेमध्ये आहेर नावाचे मारकुटे मास्तर होते. लेखकांच्या मनामध्ये त्यांच्याविषयी भिती निर्माण झाली होती. त्याचा परिणाम त्यांच्या मनावर इतका झाला होता की, ते आठवडाभर शाळेतच गेले नाही. जेव्हा हे त्यांच्या वडिलांना कळले तेव्हा त्यांचे वडील त्याबद्दल त्यांच्या शिक्षकांबरोबर बोलले. त्यानंतर लेखक पुन्हा नियमित शाळेत जाऊ लागले. शाळेत त्यांना अभ्यासाबरोबर शेतीचीही कामे शिकविली जात असे. वांगी, टोमॅटो अशा भाज्यांची लागवड कशी करायची हे शिकविले जात होते. त्यामुळे त्यांना शेतीच्या कामाची आवड निर्माण झाली होती.

### २.५.५ सातवीची परीक्षा :

सातवीची परीक्षा ही त्यावेळी प्रमाणपत्र परीक्षा समजली जात होती. ही परीक्षा राज्याच्या शिक्षण खात्याकडून घेतली जात असे. या परीक्षेस व्हर्नाक्युलर फायनल (व्ह.फा.) असे म्हणत. सोनई या ठिकाणी सातवीचे परीक्षा केंद्र नव्हते. त्यामुळे राहुरीला जावे लागत असे. पाच-सहा दिवस अगोदरच लेखक व गावातील मुलांनी बैलगाडीने सोनई सोडले व राहुरीत एका धर्मशाळेत त्यांची राहण्याची सोय केली होती. आपले सामान घेऊन धर्मशाळेकडे जात असताना गावातील काही टारगट मुले त्यांना "व्ह.फा. बावळट" म्हणून चिडवत होती. रोज सकाळी विद्यार्थ्यांनी भल्या पहाटे उठून मुळा नदीवर आंघोळीसाठी जाणे, तेथेच कपडे धुणे असा त्यांचा दिनक्रम होता. तसेच रोज सकाळी धर्मशाळेसमोरील रामभरोसे हॉटेलमधील जिलेबी-भजी व मिसळ खाऊन परीक्षेला जावे लागत व रात्रीचे जेवण राहुरी गावातील गावकरी विद्यार्थ्यांना देत असे. अशाप्रकारे लेखकाची सातवीची परीक्षा पार पडली.

### २.५.६ आदर्श शिक्षक :

लेखक सहावीत असताना त्यांची सहल शिर्डीला गेली होती. त्यावेळी त्यांच्याबरोबर राणे नावाच गुरुजी होते. सोनई ते राहुरी बैलगाडीने प्रवास व त्यापुढील प्रवास वाहनाने करुन ते शिर्डीस पोहोचले. मुलांकडील पैसे हरवू नये म्हणून राणे गुरुजींनी ते स्वतःजवळ ठेवून घेतले होते. त्यावेळी सातवीच्या वर्गाला दहावी बारावीच्या वर्गाप्रमाणे महत्त्व होते. त्यामुळे सातवीच्या वर्गाची तयारी शिक्षक सहावीपासूनच करत असे. दिवसभर ते विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे शिकवित असे; परंतु त्यांना तरीही समाधान वाटत नसल्यामुळे कोणत्याही प्रकारची अपेक्षा न धरता रात्री नऊपासून ते उशिरा अकरा-बारा वाजेपर्यंत मुलांना ते शिकवित असत आणि म्हणून विद्यार्थ्यांच्या मनामध्येदेखील शिक्षकांविषयी आदर होता. सगळे विद्यार्थीदेखील कंदील, दप्तर आणि सतरंजी-चादरीचा बिस्तारा घेऊन शाळेत येत असे तर त्यावेळचे शिक्षक असे प्रामाणिक आणि निष्ठावान होते.

### २.५.७ हायस्कूलचे जीवन :

लेखक सातवीची परीक्षा पास झाले. मात्र त्यावेळी सोनईमध्ये हायस्कूल नसल्याने त्यांना त्यांच्या मोठ्या बहिणीकडे नाशिकला पुढील शिक्षणासाठी पाठविण्याचा निर्णय झाला; परंतु त्याच वेळेस नगर येथील 'अहमदनगर एज्युकेशन सोसायटी' या संस्थेने हायस्कुल काढले. या हायस्कूलसाठी हरकाळे पाटील यांचा वाडा देण्यात आला. त्यामुळे नाशिकला न जाता 'अहमदनगर एज्युकेशन सोसायटीने' १९५६ मध्ये सुरु केलेल्या श्री. शैनेश्वर विद्यामंदिरात त्यांचा प्रवेश घेण्यात आला. लेखक या हायस्कूलच्या पहिल्या बँचचे विद्यार्थी होते. पंचवीस-तीस

मुले आणि तीन मुली असे या आठवीच्या पहिल्या वर्गाचे विद्यार्थी होते. हायस्कूलची नवीनच सुरुवात झाली असल्याने हायस्कुलमध्ये बँच नव्हते. त्यामुळे त्यांना जमिनीवर बसावे लागत. तसेच हायस्कूलमध्ये मोहोळ सर एकटेच शिकवित होते. त्यानंतर आठवड्यातून दोन दिवस म्हणजे शनिवार, रविवार कलवडे आणि खांडकेकर मास्तर येत असत. पुढे हळूहळू गो.म. देवस्थळी व जयंत मोरे अशी शिक्षक संख्या वाढत गेली. मोहोळ सरांनी लायब्ररी सुरु केली. या ठिकाणी यशवंतरावांनी नात माधव यांच्या कादंबऱ्या वाचल्या व त्यांच्यामध्ये वाचनाविषयी आवड निर्माण झाली. त्यामुळे घरी आल्यावर रात्री चिमणीच्या प्रकाशातही ते कादंबऱ्यांचे वाचन करु लागले. त्याचवेळी त्यांनी ना.सी. फडके यांची 'दौलत' ही कादंबरी वाचली; परंतु ते नाथमाधवांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये अधिक रममाण होत असे. या शनैश्वर विद्यामंदिरात त्यांचे अकरावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले.

### २.५.८ एकत्र कुटुंब पद्धती :

लेखकाचे बालपण व शालेय जीवन अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई या गावात गेले जे कौतुकी नदीच्या काठी वसलेले आहे. या गावातील एका वाड्यात गडाखांचे कुटुंब एकत्र कुटुंब पद्धतीने राहत होते. ज्यामध्ये दोन चुलत भावांची प्रत्येकी चार-चार कुटुंबे या वाड्यात राहत होती. एकत्र कुटुंब पद्धतीचे जसे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. ते लेखकाने लहानपणीच अनुभवले होते. कारण एकत्र कुटुंब असल्याने वाटणीवरुन सतत भांडणे होत होती. त्यामुळे परस्परांविषयीचे प्रेम आणि जिव्हाळा कमी झाला होता. तसेच शेतजमीन सर्वांच्या मालकीची असल्याने कोणीही कष्ट करायला तयार नव्हते. मळ्यातील जनावरांची देखील कुणीच काळजी घेत नसे. सगळेजण कामे एकमेकांवर ढकलत असल्याने त्यांच्या शेतजमीनी पडीक राहिल्या व सगळे फक्त पाटीलकीचा रुबाब मिरवत राहिले. कुटुंबातील स्त्रियांमध्येही सतत भांडण होत होती. त्यांचे वडील आणि चुलते यांच्यातही मळ्यातील वाटणीवरुन भांडणे होत असत. या गोष्टींचा लेखकाच्या बालमनावर फार वाईट परिणाम झाला होता.

### २.५.९ यशवंतराव गडाखांचा विवाह :

पाच बहिणींच्या पाठीवर यशवंतरावाचा जन्म झाला होता व ते दोन भावांमध्ये मोठे होते. त्यामुळे त्यांच्या आईवडिलांनी त्यांचे लवकरात लवकर लग्न करण्याची इच्छा होती. एकदा सहज म्हणून ते लांडेवाडीला गेले आणि मामाच्या एका मुलीशी त्यांचे लग्न घरच्यांनी ठरविले. त्यावेळी ते नववी-दहावीत असतील. त्यांना लग्न करण्याची इच्छा नव्हती. कारण त्यांना शिक्षण घ्यायचे होते. तेवढ्यात मामाच्या घरी काम करणाऱ्या गड्याने त्यांना सांगितले की, ती मुलगी चकणी आहे. त्यामुळे त्यांचा राग अनावर झाला व "मला हे लग्न मान्य नाही" असे सांगून ते मोकळे झाले. त्यावर त्यांचे वडिल देखील संतापले होते व या गोष्टीवर घरामध्ये पंधरा वीस दिवस वाद चालू होता. "मी घर सोडून जाईन" असे त्यांनी एक पत्र नाशिकच्या बहिणीला लिहिले तेव्हा तिने वडिलांना समजावून सांगितले. त्यानंतर ते लग्न टळले मात्र घरात लग्नाचा विषय हा चालूच राहिला. त्यानंतर दीड वर्षांनी लेखक अकरावीत असताना एकनाथ नाव्हाने राहुरी तालुक्यातील वळण गावचे स्थळ आणले आणि ते गुलाब पाटलांबरोबर जाऊन मुलगी पाहून आले. ती मुलगी त्यांना पसंत पडली व त्यांच्या लग्नाची तयारी सुरु झाली. बस्ता बांधण्यासाठी ते नगरला गेले असताना तेथे त्यांनी सुटसाठी भारीतले कापड घेतले आणि ते पतंगे टेलरकडे शिवायला टाकले. म्हणजे बैलगाडीतून वळणाला गेल्यावर नवऱ्या मुलाचा चांगला पाहुणचार झाला. मात्र लग्नाच्या दिवशी लग्न लागण्यापूर्वी त्यांना भूक लागली होती. तेव्हा त्यांना एका गाडग्यात पिठलं

आणि भाकरी आणून दिले. त्या गोष्टीचा त्यांना राग आला त्यात त्यांना रेडिओ ऐकण्याची आवड होती व लग्नात त्यांना तो दिला नाही म्हणून ते रुसले होते. पण, तरीही तो रेडिओ काही त्यांना मिळाला नाही. मात्र हुंडा म्हणून एक सायकल व पंधराशे रुपये मिळाले होते. अशाप्रकारे कॉलेजच्या पहिल्या वर्षात असताना यशवंतराव गडाख यांचा विवाह संपन्न झाला.

### २.५.१० सारांश :

अशाप्रकारे कौटुंबिक जीवनातील संघर्षावर मात करुन यशवंतराव गडाखांनी शिक्षण घेतले आणि सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील आपले वेगळे स्थान निर्माण केले. हे 'प्रारंभ' या लेखात चित्रित केलेले आहे हे आपल्या निदर्शनास येते.

## २.६ जडणघडण - वाय.सी. पवार

### २.६.१ परिचय :

वाय.सी. पवार यांचा जन्म धुळे जिल्ह्यातील निमगूळ या गावी २५ जुलै, १९४१ रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव यादवराव चिंधा पवार असे आहे. एका मागासवर्गीय कुटुंबात जन्म झाल्याने जातीभेदाची दाहकता त्यांनी अगदी लहानपणापासूनच अनुभवली. त्यामुळे वाय.सी. पवार यांनी उपेक्षितांच्या वाट्याला येणाऱ्या सर्व अडचणींना तोंड देत आपले शिक्षण पूर्ण केले. इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षात त्यांनी प्रवेश घेतला; परंतु इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्षाची परीक्षा ते अनुत्तीर्ण झाले, त्यानंतरही त्यांनी दोन वेळा प्रयत्न केले. मात्र त्यात त्यांना यश आले नाही. मग वाय.सी. पवार यांनी रेशनिंग इन्स्पेक्टर म्हणून त्यांची नियुक्ती झाली; परंतु ही नोकरी त्यांना काहि जास्त मानवली नाही. म्हणून त्यांनी काही दिवस लॅब असिस्टंटची नोकरीदेखील केली आणि त्यानंतर स्पर्धा परीक्षा दिली व या परीक्षेत उत्तीर्ण होऊन तहसिलदाराची नोकरी मिळविली. याच काळात पुन्हा स्पर्धा परीक्षा देऊन पोलीस खात्यात डी.वाय.एस.पी. म्हणून आपल्या कारकिर्दीस नव्याने सुरुवात केली. त्यांची नाशिक येथे नेमणूक झाली व खऱ्या अर्थाने त्यांचा अन्याय व गुन्हेगारीविरुद्धचा लढा सुरु झाला. नाशिकनंतर मुंबई येथे डी.सी.पी. म्हणून त्यांची नेमणूक झाली. तेथील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी त्यांना खूप संघर्ष करावा लागला. त्यांच्या या प्रदीर्घ प्रवासात त्यांना अनेक लोकांविरुद्ध लढा द्यावा लागला. अशाप्रकारे एका मागासवर्गीय कुटुंबातील सर्वसाधारण मुलगा मुंबई येथील डी.सी.पी. पदापर्यंत पोहोचला.

### २.६.२ जडणघडण :

वाय.सी. पवार यांनी 'मी - वाय.सी. पवार' या आत्मकथनात आपला संपूर्ण जीवन प्रवास मांडला आहे. या आत्मकथनातील जडणघडण हा एक लेख असून त्यामध्ये बालपणी त्यांची जडणघडण कशी होत गेली याचे चित्रण केले आहे. सर्वसाधारण कौटुंबिक परिस्थिती, मोठा परिवार, तसेच एक मागासवर्गीय म्हणून करावा लागणारा संघर्ष व शिक्षण चालू असताना करावी लागणारी धडपड म्हणजेच सातवी व इंजिनिअरिंगच्या वर्गात आलेले अपयश. या अपयशातून खचून न जाता ते पुढे शिकत राहिले व आपली वेगळी अशी ओळख निर्माण केली. याचे चित्रण 'जडणघडण' या लेखात आलेले आहे.

**२.६.३ प्रस्तावना :**

वाय.सी. पवारांनी मुंबईतील झोन ४ चे (दादर, माहिम, माटुंगा, धारावी, चेंबूर, ट्रॉम्बे) डी.एस.पी. म्हणून कार्य पार पाडले. एक यशस्वी आयुष्य जगण्याकरिता त्यांना खूप संघर्ष करावा लागला. अगदी लहानपणापासूनच त्यांनी भौगोलिक व सामाजिक समस्यावर मात करत आपल्या आयुष्यातील यशाची शिखर गाठले. त्यांच्या आयुष्यातील आठवणी त्यांनी 'मी वाय.सी. पवार' या आत्मचरित्रात मांडलेल्या आहेत.

'जडणघडण' या लेखात वाय.सी. पवार यांनी सांगितलेल्या आठवणी पुढील मुद्यांच्या आधारे सांगता येतील.

**२.६.४ वाय.सी. पवार यांचा कौटुंबिक परिचय :**

निमगुळा हे वाय.सी. पवार यांचे जन्मगाव आहे. हे गाव धुळे जिल्ह्यातील असून या गावची वस्ती सातशे-आठशे इतकीच होती. गावच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्व या तिन्ही दिशेला जळगाव जिल्ह्याच्या सीमा आहे व पश्चिमेस धुळे जिल्हा आहे. तसेच गावच्या दक्षिण दिशेस बोरी नदी असून ही नदी पावसाळ्यात अगदी दुथडी भरुन वाहत असे आणि जर प्रमाणापेक्षा जास्त पाणी आले तर मनुष्यच नाहि तर जनावरांचीदेखील दुरावस्था होत असे. कारण कुणालाही नदी ओलांडणे शक्य होत नसे. त्यामुळे रोजगारासाठी बाहेरगावी जाणाऱ्या लोकांना तर नदीच्या पलीकडे असणाऱ्या गाव किंवा वस्तीवरच मुक्काम करावा लागे. तसेच गावामध्ये चौथीपर्यंत शाळा असल्याने त्यानंतर शिक्षणासाठी मुलांना दुसऱ्या गावी जावे लागत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही अशा संकटांना तोंड द्यावे लागे. या गावातील लोकांना एका शेतीच्या तुकड्यातून दुसऱ्या तुकड्यात जाण्यासही भिती वाटत असे.

**२.६.५ वडिलांचा पिढीजात धंदा :**

धुळे जिल्ह्यातील निमगूळ या गावी हरिजन म्हणजे चांभार समाजात २५ जुलै, १९४१ रोजी वाय.सी. पवार यांचा जन्म झाला. वडीलांचे नाव चिंधा फकिरा पवार होते, तर आईचे नाव कालनबाई, वडील चौथीपर्यंत शिकले होते तर आई अडाणी होती. घरामध्ये श्यामराव, सुखदेव, शांताबाई, पंडित, बाबुराव, मधुकर, सुमन, रवी अशी एकूण नऊ भावंडे होती. भावंडामध्ये पाचव्या क्रमांकावर असणाऱ्या पवारांचे टोपण नाव बापू असे होते. पवार यांच्या वडिलांना गावाच्या उत्तरेस दहा बिघे जमीन सरकारकडून मिळाली होती, तर त्यांची स्वतःची तीन बिघे जमीन होती. त्यातील काही नापीक होती, तर काही जरा झाली होती. म्हणून सातव्या इयत्तेसाठी त्यांचा प्रवेश चाळीसगाव येथील 'आनंदीबाई बंकट हायस्कूल' मध्ये घेतला व तेथेच दिनबंधू आंबेडकर बोर्डिंगमध्ये राहण्याची सोय करण्यात आली. या बोर्डिंगमध्ये कधी-कधी मुलांना जेवायलाही मिळत नसे. चाळीसगाव हे घरापासून लांब असल्याने सहसा कुणालाही भेटता येत नसे किंवा घरचेही भेटायला येत नसे. या बोर्डिंग शेजारीच चांभार होता. तेथे राहणाऱ्या ताराचंदशी त्यांची मैत्री झाली. त्यामुळे पवार यांचा जास्त वेळ तेथेच जाऊ लागला. बोर्डिंगमध्ये ते फक्त जेवण्यासाठी, झोपण्यासाठी येत असे. सातवीत असताना त्यांना त्यांच्या आयुष्यातील पहिल्या क्रमांकाचे पहिले बक्षीस हे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत मिळाले होते; परंतु सातवीच्या परीक्षेत मात्र जेमतेम मार्कांनी ते पास झाले होते. बोर्डिंगमध्ये असताना त्यांना गोट्या खेळण्याचा नाद लागल्यामुळे आठव्या इयत्तेत नापास झाले.

### २.६.६ बोरविहीरमधील शालेय जीवन :

वाय.सी. पवार व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास झाले आणि त्यांचा इतर भांवडासमवेत राजेंद्र छात्रालयात प्रवेश घेण्याचा विचार होता; परंतु बोरविहीर येथे पवार सातवीत असतानाच हायस्कूल सुरु झाले असल्याने तेथे आठवीच्या वर्गात मुलांची आवश्यकता होती. हे गाव त्यांच्या गावापासून दहा मैलांच्या अंतरावर होते. पवारांनी आठवीच्या वर्गात प्रवेश घ्यावा या उद्देशाने तेथील लोक त्यांच्या वडिलांकडे आले. बोर्डिंगचा खर्च मागासवर्गीयांना मिळणाऱ्या स्कॉलरशिपवर भागविण्याच्या बोलीवर पवारांचा प्रवेश तेथे घेण्यात आला. तेथे आठवीत प्रवेश घेतल्यावर कधी-कधी तेथील धान्यांच्या टंचाईमुळे जेवणाची गैरसोय होई तेव्हा त्यांना गावातील लोकांच्या घरी जेवणासाठी जावे लागे. तेथे पवार आठवी उत्तीर्ण झाले व नववीच्या वर्गात प्रवेश घेण्यात आला. नववीच्या वर्गात त्यांचा प्रथम क्रमांक आला होता तरी देखील ज्या विद्यार्थ्यांचा दहावा-बारावा क्रमांक आला त्याचा प्रथम क्रमांक आल्याचे घोषित करण्यात आले. त्यावर पवारांच्या वडीलांनी शाळेत तक्रार केली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. त्यानंतर त्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेश घेतला.

### २.६.७ सातवीत नव्याने प्रवेश :

बोर्डिंगमध्ये असताना आठवीमध्ये वाय.सी. पवार नापास झाले. वडिलांची त्यांना शिकविण्याची इच्छा होती; परंतु सहावीच्या वर्गात असताना ज्या मुलाचा पहिला नंबर येत होता तो मुलगा आठवीत नापास होतो. त्यामुळे तो मुलगा पुढे शिकेल का? असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला होता. परिणामी त्यांचे वडील त्यांना गावी घेऊन गेले व त्यांना शेजारील गावातील मुसलमान शिंप्याकडून टेलरिंग शिकण्यास सांगितले. कमीत-कमी यामुळे त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटेल म्हणून त्यांच्या वडिलांनी हा मार्ग सुचविला. मात्र पवार गावी आल्यावर त्यांच्या आयुष्याला वेगळेच वळण लागले. कारण गावामध्ये सहावीपर्यंत शाळा होती व सातवीचा वर्ग सुरु करण्याचा प्रयत्न शाळेचे मुख्याध्यापक बापु गुरुजी करत होते. त्यासाठी ते मुले जमा करत होते. त्याच हेतुने ते पवारांच्या वडिलांकडे आले होते; परंतु त्यांच्या वडिलांचे असे मत होते की, सातवीच्या वर्गाचा त्याला काय उपयोग तो सातवी पास आहे म्हणून त्याला आठवीत प्रवेश घ्यावा लागेल. बापू गुरुजींच्या आग्रहाखातर त्यांच्या वडिलांनि त्यांना पुन्हा सातवीच्या वर्गात बसण्याची परवानगी दिली व त्यांचा पुन्हा सातवीच्या वर्गात प्रवेश घेण्यात आला. त्यावेळी त्यांच्या वर्गात फक्त तेरा मुले होती. सातवीच्या वर्गात प्रवेश घेतल्यावर बापू गुरुजींनी पवारांना स्कॉलरशिपच्या परीक्षेस बसविले. या परीक्षेत त्यांचा दुसरा क्रमांक आला. अशाप्रकारे बोर्डिंगमध्ये असताना आठवीच्या परीक्षेत नापास होणाऱ्या पवारांनी सातवीच्या वर्गात नव्याने प्रवेश घेतल्यावर जोमाने अभ्यास केला व ते सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाले. तसेच स्कॉलरशिपच्या परीक्षेतही दुसरा क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले.

### २.६.८ महाविद्यालयीन जीवन :

धुळे येथील साक्रीच्या मामलेदार कचेरीत पवारांचे मोठे बंधू सुकदेव उर्फ अण्णा कामाला होते. पवारांचीही दहावी तेथेच 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये झाली. त्यानंतर अण्णांची बदली धुळ्याच्या मामलेदार कचेरीत झाली. तेथील जे. आर. सी. ही अकरावी म्हणजे एस.एस.सी. साठी प्रवेश घेण्यात आला. त्यावेळी त्यांची बाबुराव व मधुकर ही भावंडेही धुळ्याला आली. घरापासून हायस्कूलचे अंतर तीन मैलांवर होते. त्यामुळे तेथे पायी चालत जावे लागे. रस्त्यात गरुड लायब्ररी होती. या लायब्ररीमध्ये त्यांना वाचनाचा छंद लागला. या ठिकाणी ते वर्तमानपत्रे, मासिके वाचत. तसेच वि.स.खांडेकर, ना.सी. फडके यांच्या कांदबऱ्याही वाचत. हायस्कूलवरुन

आल्यावर कपडे धुणे, स्वयंपाक करणे, शेणाने घर सारविणे अशी घरातील सर्व कामे चारही भावंडाना करावी लागत असे. अशा परिस्थितीत अभ्यास करत ते प्रथम श्रेणीत एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर 'श्री शिवाजी विद्या प्रसारक' संस्थेच्या आर्ट-सायन्स महाविद्यालयात इंजिनिअरिंगला जाण्याच्या हेतूने प्री-डिग्री सायन्सला प्रवेश घेतला. या वर्गात शिकत असताना एक विचित्र घटना घडली. त्यांच्या वर्गमित्रांचे एका मुलीवर प्रेम होते. या गोष्टीची माहिती त्यांच्याच वर्गातील पट्टेवाला याला होती. त्यामुळे पट्टेवाला त्यांच्या पत्राची ने-आण करु लागला; परंतु पवारांना कळले की मुलीकडून येणारी पत्रे ही वास्तवात पट्टेवालाच मुलीच्या नावाने लिहित होता. ही गोष्ट जेव्हा पवारांनी त्यांच्या मित्राच्या लक्षात आणून दिली तेव्हा त्याला मोठा धक्का बसला व त्याने स्वतःला स्टोव्हने पेटवून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु पवारांना अचानक जाग आल्याने घडणारा वाईट प्रसंग टळला. अशाप्रकारे प्री-डिग्रीचे वर्ष संपले पण या वर्गात त्यांना मात्र द्वितीय श्रेणी मिळाली. त्यानंतर धुळे येथे इंजिनिअरिंगला प्रवेश मिळविणे कठीण आहे असे त्यांना वाटले. त्यामुळे त्यांनी पुण्यातील एस.पी. कॉलेजमध्ये एफ.वाय.बी.एस.सी.ला प्रवेश घेतला.

### २.६.९ रेशनिंग इन्स्पेक्टरपदी नियुक्ती :

एफ.वाय.बी.एस.सी. ची परीक्षा दिल्यानंतर इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्गात प्रवेश घेतला. या परीक्षेत ते नापास झाले. दोन वेळा प्रयत्न करुनही त्यांना यश आले नाही; परंतु पंधरा दिवसातच त्यांना रेशनिंग इन्स्पेक्टरच्या नोकरीसाठी बोलाविण्यात आले. त्याठिकाणी सातशे मुलांच्या मुलाखती घेण्यात आल्या व त्यातून सहा उमेदवारांची निवड करण्यात आली. त्या सहा उमेदवारांपैकी एक वाय.सी. पवार हे होते. अशाप्रकारे रेशनिंग अधिकारी म्हणून कामावर हजर झाले.

### २.६.१० सारांश :

अशाप्रकारे वाय.सी.पवार यांचा 'मी वाय.सी.पवार' या आत्मचरित्रातून घेतलेल्या 'जडणघडण' या लेखांमध्ये त्यांनी आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. वाय.सी.पवार शालेय जीवनात आठवीत असताना नापास झाले होते. मात्र त्या अपयशाने खचून न जाता जोमाने अभ्यास करुन त्यांनी यशाची उंच शिखरे गाठली. म्हणजेच मनुष्याने अपयशाने खचून न जाता आपला मार्गक्रमण करत रहावा.

❖❖❖❖

# घटक -३

# इतिवृत्तलेखन

**घटक रचना :**

३.० प्रस्तावना
३.१ इतिवृत्त लेखनाचे दोन प्रकार
 ३.१.१ अहवालात्मक इतिवृत्त
 ३.१.२ वृत्तांत्मक इतिवृत्त
 ३.१.३ अहवालात्मक इतिवृत्त नमुना
 ३.१.४ वृत्तांत्मक इतिवृत्त नमुना
३.२ संदर्भ सूची

## ३.० प्रस्तावना

इतिवृत्त लेखन म्हणजे सभेत झालेल्या कामकाजाची, सभेत घेतलेल्या निर्णयाची लिखित स्वरुपातील नोंद. ही नोंद झालेल्या सभेची लिखित स्वरुपातील पुरावा असतो.

सहकारी, औद्योगिक सांस्कृतिक आणि शासकीय संस्थांमध्ये निरनिराळ्या कारणासाठी सभा किंवा संस्थांमधील प्रमुखाची बैठक घेतली जाते. त्या सभेत किंवा बैठकीतील सविस्तर माहिती. इतिवृत्त लेखनात केली जाते. थोडक्यात सभेतील सविस्तर माहिती मुद्देसूद लेखन इ. करणे म्हणजे इतिवृत्त लेखन.

इतिवृत्त नोंद करणाऱ्या संस्था

१) ग्रामपंचायती
२) पंचायत समिती
३) जिल्हा परिषद
४) विविध कार्यकारी सेवा संस्था
५) दुध व्यावसायिक संस्था
६) साखर कारखाने
७) सूत गिरणी
८) सार्वजनिक मंडळे
९) कृषी उत्पन्न बाजार समिती
१०) औद्योगिक क्षेत्रातील संस्था
११) रोटरी क्लब
१२) सार्वजनिक उत्सव मंडळे
१३) सेवाभावी संस्था
१४) सांस्कृतिक संस्था
१५) साहित्यिक संस्था

इतिवृत्त लेखन, शासकीय सहकारी आणि सांस्कृतिक संस्थामध्ये ही केले जाते. खाली नमूद केलेल्या प्रसंगाच्या निमित्ताने इतिवृत्त लेखन केले जाते.

१. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यासाठी
२. संस्थेत निर्माण झालेल्या समस्या दूर करण्यासाठी
३. विशिष्ट प्रश्नाच्या संदर्भात नियुक्त केलेल्या चौकशी समितीचे निष्कर्ष मांडण्यासाठी
४. नव्याने व्यवसाय, उद्योग वा उपक्रम सुरु करण्यासाठी त्या क्षेत्राच्या प्राथमिक पाहणीच्या निमित्ताने
५. संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी
६. एखादी परिषद वा चर्चासत्र यामध्ये झालेल्या ऊहापोहाचा तपशील सादर करण्यासाठी
७. संस्थेच्या कामाची प्रगती आणि भविष्यकाळातील प्रगतीचा वेध घेण्यासाठी

अशा रितीने विविध कारणांसाठी इतिवृत्ते लिहिली जातात. इतिवृत्त लेखनाचे स्वरुप उद्दिष्टानुसार भिन्न भिन्न प्रकारचे असते.

## ३.१ इतिवृत्त लेखनाचे दोन प्रकार

**१) अहवालात्मक इतिवृत्त**
**२) वृत्तात्मक इतिवृत्त**

### १) अहवालात्मक इतिवृत्त :

अहवालात्मक इतिवृत्त म्हणजे एखाद्या उद्देशाने, "विशिष्ट हेतूसाठी मुद्दा परिश्रमपूर्वक तज्ज्ञमार्गदर्शकांच्या सल्ल्याने एखाद्या समस्येवर एखादी माहिती संकलन सत्याचा शोध लावणे याला अहवालात्मक इतिवृत्त लेखन असे म्हणतात". या इतिवृत्तामध्ये अहवालात्मक पद्धती संबंधित माहिती दिलेली असते. यामध्ये सुद्धा दोन प्रकार पडतात.

**१) वस्तुनिष्ठ किंवा माहितीपर**
**२) चिकित्सक**

माहितीपर इतिवृत्तामध्ये विशिष्ट घटनेच्या संदर्भात किंवा निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या संदर्भात संकलित केलेल्या माहितीचे निवेदन असते.

तर चिकित्सक इतिवृत्तामध्ये संकलित माहितीच्या निवेदनाबरोबर त्या माहितीचे विश्लेषण आणि मूल्यमापन करुन निष्कर्ष काढलेले असतात. क्वचित त्या निष्कर्षाच्या आधारे काही शिफारशी वा उपाययोजनाही सूचविलेल्या असतात.

**अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरुप :**

- इतिवृत्तलेखन म्हणजे घटना, सर्वेक्षण, माहिती, निरीक्षण इत्यादींचे केलेले औपचारीक वस्तुनिष्ठ वर्णन ते विशिष्ट पद्धतीने मांडलेले असते.

- इतिवृत्ताचा वाचक हा संबंधित संस्थेचा सभासद, सदस्य, संचालक, कार्यकारी अधिकारी असतो.
- इतिवृत्तलेखनासाठी साधनसामग्री गोळा करावी लागते. ही साधनसामग्री विशिष्ट कार्यालयीन तांत्रिक पद्धतीनेच मिळवावी लागते. मिळविलेल्या सामग्रीचा आणि ती मिळविण्यासाठी योजिलेल्या प्रक्रियेचा निर्देश इतिवृत्त लेखनात असावा लागतो.
- मिळविलेल्या साधनसामुग्रीवरुन इतिवृत्त लेखकाने काही काढायचे असतातच.
- इतिवृत्त लेखन हे पूर्णतः वस्तुनिष्ठ, काटेकोर पद्धतीने केलेले असते.

**अहवालात्मक इतिवृत्ताचे लेखन करण्याची पद्धत :**

१. इतिवृत्ताचे शीर्षक
२. ज्या आदेशानुसार इतिवृत्तलेखन केले जात आहे. त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक
३. समितीची रचना स्पष्टपणे मांडावी. उदा. सभासदांची नावे, निमंत्रक
४. इतिवृत्त लेखनाची व्यापता व मर्यादा निश्चित कराव्यात.
५. मुख्य मजकूर लिहावा
६. माहितीचे विश्लेषण करावे
७. शिफारस मांडावी. उदा. तज्ज्ञ व्यक्ती किंवा नेमलेली समिती शिफारस करतात.
८. समारोपांमध्ये संबधित माहिती संकलन करताना ज्या व्यक्तीची मदत लाभली आहे, अशा व्यक्तीचे ऋणनिर्देश मानावेत.
९. समारोप
१०. इतिवृत्तलेखकाचे नाव सह्या दिनांक आणि स्थळ नमूद करावे
११. परिशिष्टमध्ये तक्ते, आलेख, नकाशे आकृत्या, कागदपत्रे यांचा उल्लेख करावा

**अहवालात्मक इतिवृत्त नमुना एक**

'गायत्रीची' लोणचे उत्पादन करणाऱ्या कंपनीने भविष्यात बाजारपेठेत आपल्या उत्पादित मालाला मागणी वाढावी यासाठी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेला अहवालात्मक इतिवृत्त

कोल्हापूर,
दि. १० मे २०१८

अध्यक्ष
'रुची' प्रा. लि. कंपनी,
महाद्वार रोड,
कोल्हापूर

महोदय,

दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत भविष्यात आपल्या रुची लोणच्याची मागणी वाढावी यासाठी अभ्यास करण्यासाठी डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. जयेश कांबळे, डॉ. सिंचना सुर्यवंशी आमच्या तिघांच्या समितीच्यावतीने विविध शहरातील बाजारपेठांचा सर्व्हे करुन नेमलेल्या समितीमधील आम्ही तिघेजण अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

munotes.in

१. औरंगाबाद, जळगाव, नागपूर, अमरावती या भागात डिलरची नियुक्ती करावी.
२. 'रुची लोणचे' उत्पादनाची जाहिरात प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया मार्फत करावी.
३. ग्राहकांची गरज लक्षात घेऊन, लोणचे पाकिट कमीत कमी २०० ग्रॅम व १०० ग्रॅमपासून पाच किलोपर्यंत पॅकिंग तयार करावेत.
४. विक्रेत्यांना जादा कमिशन कसे मिळेल याचा विचार करावा.
५. लोणच्याचे विविध प्रकार तयार करावेत.

आपले विश्वासू

दि. ५ नोव्हेंबर, २०११

| सही | सही | सही |
|---|---|---|
| डॉ. राजेंद्र कांबळे | डॉ. जयेश कांबळे | डॉ. सिंचना सुर्यवंशी |

**अहवालात्मक इतिवृत्त नमुना दोन**

निर्मल कपडे धुण्याच्या साबणाची ग्राहकाची मागणी कमी झाल्याची कारणे शोधून त्यावर उपाय शोधण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचे अहवालात्मक इतिवृत्त

ठाणे
१२ मे २०१८

प्रति,
मा. व्यवस्थापक,
जयप्रभा साबण उत्पादन,
प्रा.लि. कंपनी
ठाणे

महोदय,

आपल्या दि. १४ फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत झालेल्या ठरावानुसार आपल्या कंपनीच्या वतीने बाजारपेठेमध्ये जयप्रभा साबणाची मागणी कमी होण्याची कारणे शोधणे व साबणाची मागणी वाढावी यासाठी सर्व्हेकरुन अहवाल सादर करण्यासाठी डॉ. आनंद गांगण, डॉ. दिलीपकुमार कांबळे आम्हा दोघांची नियुक्त केली होती. दोन जणांच्या समितीचा अहवाल पुढीलप्रमाणे आम्ही नोंदवीत आहोत.

मागील तीन वर्षात निर्मल साबणाची ग्राहकांची मागणी कमी होण्याची कारणे.

१. जाहिरातीचा अभाव
२. इतर साबणाचा आकार लक्षात घेऊन आकरात बदल करावा.
३. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी योग्य सूट द्यावी.
४. विक्रेत्यांना कमीशन वाढवून द्यावे.
५. आकर्षक पॅकिंग तयार करावे.

munotes.in

कंपनीने वरीलप्रमाणे बदल केल्यास भविष्यात बाजारपेठेमध्ये मागणी वाढेल.

ठाणे

| सही | सही |
|---|---|
| डॉ. आनंद गांगण | डॉ. दिलीपकुमार कांबळे |

## २) वृत्तांतात्मक इतिवृत्ते :

या इतिवृत्त प्रकारामध्ये वृत्तांतात्मक इतिवृत्त म्हणजे घडलेल्या घटनेची वा केलेल्या कार्याची तपशीलवार जुळवू तयार केलेली माहिती होय. वृत्तांतात्मक इतिवृत्त हे संस्थेचे अधिकारी, संस्थेचे सदस्य, संस्थेशी संबंधित व्यक्त या कामकाजाची माहिती पुरविण्याच्या दृष्टीकोनाने इतिवृत्त तयार केलेले असते. या इतिवृत्तांतातून घटनेची सविस्तर माहिती क्रमशः दिलेली असते.

**वृत्तांतात्मक लेखनाचे विषय :**

१. संस्था संचालक मंडळाची सभा
२. विशिष्ट विषयाला अनुसरुन अधिकारी वर्गात झालेल्या चर्चेचे वृत्त
३. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्त
४. संस्थेतील एखाद्या घटनेचे वृत्त

**वृत्तांतात्मक इतिवृत्त लिहिण्याचा उद्देश**

१. संस्थेच्या सभासदांना माहिती देणे.
२. संस्थेच्या अधिकाऱ्यांना कामकाजाची माहिती सादर करणे
३. संस्थेच्या कार्याची / सभेदी नोंद ठेवणे
४. संस्थेच्या वाटचाली माहिती लिखित स्वरुपात नोंद करणे

**वृत्तांतात्मक इतिवृत्त लेखन करण्याची पद्धती**

१. संस्थेचे नाव
२. सभेचा प्रकार
३. सभेचे ठिकाण / वेळ / दिनांक
४. सभेच्या अध्यक्ष नियुक्ती / अध्यक्षांचे नाव
५. सभेचे उपस्थित असलेल्या इतर सभासदांची नावे
६. विषयावर निर्णय
७. विविध विषयावर झालेली चर्चा सविस्तर उदा. विषय कुणी मांडली, अनुमोदन कुणी दिले, एखादा ठराव कसा झाला, याची मुद्देवार माहिती.
८. एखाद्या ठरावासाठी मतदान घेतल्यास सविस्तर माहिती
९. सभेत घेतलेल्या निर्णयात विषय
१०. शेवटी उजव्या बाजूला अध्यक्षाची सही आणि डाव्या बाजूला सचिव / चिटणीस यांची सही तारीख

munotes.in

## वृत्तांतात्मक इतिवृत्त नमुना-एक

सेवाभावी युवा प्रतिष्ठान, अलिबाग या प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

सोमवार दि. १२ जून २०१८ दुपारी २.०० सेवाभावी युवा प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण सभागृहात संजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

सदस्या नावे

१. विदिशा कांबळे (अध्यक्ष)
२. सिंचना सुर्यवंशी (उपाध्यक्ष)
३. गौरव कांबळे (सदस्य)
४. सोहम पांडे (सदस्य)
५. सर्वांग पांडे (सदस्य)
६. रुचिता नाखी (सदस्य)
७. अनंत विश्वनाथ चंदनशिवे (सदस्य)
८. सांची भोळे (सदस्य)
९. अर्पणा पाटील (सदस्य)
१०. जगदिश म्हात्रे (सदस्य)
११. संदेश चौगुले (सदस्य)

(आणि उपस्थित सभासदांची यादी सोबत जोडली आहे)

**विषय १ :**

मागील सभेचा वृत्तांत वाचणे आणि कायम करणे

ठराव - मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करण्यात येत आहे.

सूचक - श्री. अपर्णा पाटील
अनुमोदक - गौरव कांबळे

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय २ -**

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरपाईसाठी १० लाख रुपये निधी जमा करावा.

सूचक : सांची भोळे
अनुमोदक : सोहम पांडे

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय - ३**

अलिबाग महोत्सवाचे आयोजन करणे.

सूचक : सर्वांग पांडे
अनुमोदक : डॉ. रुचिता नाखी

ठराव सर्वानुमते मंजूर

munotes.in

प्रतिष्ठानचे सदस्य जगदिश म्हात्रे यांनी अध्यक्षाचे व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपले

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | सही | सही |
| दिनांक | चिटणीस | अध्यक्ष |

## वृत्तांतात्मक इतिवृत्त नमुना-दोन

श्री सातेरी दुध संस्था कोकरे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर या दूधसंस्थाची वार्षिक साधारण सभा संपन्न झाली या सभेचा वृत्तांतात्मक इतिवृत्त पुढीलप्रमाणे.

'श्री सातेरी दूध संस्था, कोकरे' या संस्थेची वार्षिक साधारण सभा १० जून २०१८ रोजी, सकाळ ११ वाजता संस्थेचा सभागृहात घेण्यात आली. या सभेला संस्थेचे १५१ सभासद उपस्थितीत होते. तर संस्थेचे पुढील सदस्य हजर होते.

१. गोविंद कांबळे (अध्यक्ष)
२. निंगाप्पा दळवी (उपाध्यक्ष)
३. किरण गोवेकर (सदस्य)
४. रावजी किरमटे (सदस्य)
५. गोपाळ दळवी (सदस्य)
६. विदिशा कांबळे (सदस्य)

ठराव : १ मागील वृत्तांत वाचून संमत करण्यात आला.

सूचक - वसंत किरमटे
अनुमोदक - रावजी किरमटे

ठराव : २ मागील वर्षाच्या जमाखर्चास मंजूरी देण्यात आली

सूचक : रवळनाथ कांबळे
अनुमोदक : राजेश कांबळे

ठराव : ३ ऑडिट दुरुस्ती ठराव संमत झाला.

सूचक : गोपाळ दळवी
अनुमोदक : किरण गोवेकर

ठराव : ४ संस्था चालू वर्षातील नफ्यापैकी ४०% नफा उत्पादकांना वाटणे.

सूचक : विदिशा कांबळे
अनुमोदक : किरण गोवेकर

वरील ठराव होऊन सभेचे कामकाज संपले

| | | |
|---|---|---|
| तारीख | सही | सही |
| १०-६-२०१८ | सेक्रेटरी | अध्यक्ष |

munotes.in

## ३.२ संदर्भ सुची

१) व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
२) व्यावहारिक मराठी - भाग - २ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड.
३) व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार - प्रा. चंद्रहास जोशी
५) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.
६) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी
७) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.
८) व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे.

❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

# वर्तमानपत्रासाठी जाहिरात लेखन

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ जाहिरात म्हणजे काय ?
४.३ जाहिरात करण्याची माध्यमे
४.४ जाहिरातीचा मसुदा, मजकूर
४.५ मथळा
४.६ जाहिरातीचा नमुना
४.७ वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेले जाहिरातीचे नमुने
४.८ संदर्भ सूची

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला -

- जाहिरात लेखनाचा हेतू सांगता येईल.
- जाहिरात लेखनाचे तंत्र आत्मसात करता येईल.
- यशस्वी जाहिरात लेखनात कोणती वैशिष्ट्ये आढळतात हे सांगता येईल.
- जाहिरात कोणकोणत्या माध्यमातून केली जाते हे सांगता येईल.

## ४.१ प्रस्तावना

आपण नेहमी वर्तमानपत्रातून, दूरदर्शन, आकाशवाणी इंटरनेटवरुन जाहिरात पाहतो. जाहिरात हा आपल्या नेहमीच्या वाचण्यातील, पाहण्यातील आणि ऐकण्यातील विषय आहे. विविध प्रसारमाध्यमाच्या साहाय्याने प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती आपल्या परिचयाच्या झाल्या आहेत. सतत जाहिरात पाहिल्याने आणि ऐकल्याने त्याचा प्रभाव व्यक्तीवर होतो. सतत जाहिरात पाहून आणि ऐकून लहान मुलांनाही काही जाहिराती पाठ झालेल्या असतात. जाहिरातीचा मजकूर हा छोटा असतो. छोटी छोटी वाक्यरचना केल्याने, कधीकधी या वाक्यामध्ये क्रियापदाचा उपयोग केलेला नसतो. जाहिरात तयार करणे हे एक अवघड आणि जोखमीचे काम असते.

जाहिरातीची मांडणी करताना महत्त्वाच्या गोष्टीची दक्षता घ्यावी लागते. जाहिरातीचा मसुदा तयार करणारा एक तज्ज्ञांचा वर्ग अलिकडे अस्तित्वात आला आहे. मोठ्या नामांकित कंपन्या उद्योजक आपल्या मालाची, उत्पादित वस्तूची चांगल्याप्रकारे जाहिरात कशी करता

येईल. ग्राहकांवर प्रभाव कसा टाकता येईल. याकडे उत्पादन कंपन्या लक्ष देतात. त्यासाठी विविध कंपन्यांनी स्वतःचा स्वतंत्र विभाग सुरु केला आहे. जाहिरातीचा मसुदा तयार करणाऱ्या तज्ज्ञांची नेमणूक केली जाते. जाहिरातीचा व्यवसाय करणाऱ्या संस्था निर्माण झाल्या आहेत. या जाहिरात करणाऱ्या संस्थांमध्ये जाहिरातीचा मसुदा (मजकूर) तयार करणारा तज्ज्ञ व्यक्तीची निवड केली जाते. मुख मसुदा लेखक किंवा जाहिरात लेखक म्हणून त्यांना ओळखले जाते.

## ४.२ जाहिरात म्हणजे काय?

"उत्पादकाने किंवा विक्रेत्याने आपल्या उत्पादित मालाची विक्री व्हावी व मागणी वाढावी यासाठी केलेली प्रसिद्धी म्हणजे जाहिरात असे म्हणता येईल."

आपण उत्पादित केलेल्या मालाविषयी ग्राहकांच्या मनात आकर्षण निर्माण करुन त्यांना खरेदी करण्यास प्रवृत्त करणे हे जाहिरातीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. उत्पादित मालाला विक्रीच्या दृष्टीने उत्पादक आणि ग्राहक यामध्ये जोडणारा एक दुवा म्हणजे जाहिरात होय. ग्राहकाच्या मनावर जाहिरातीचा खरेदीचा संदेश पोहोचतो आणि ग्राहक ती वस्तू खरेदी करतो. आजच्या युगामध्ये समाजावर जाहिरातीचा परिणाम होताना दिसतो. सध्याचे युग हे जाहिरातीचे युग म्हणता येईल. 'बोलणाऱ्याची माती विकली जाते, न बोलणाऱ्याचा गहूसुद्धा विकला जात नाही.' अशी मराठी भाषेत म्हण आहे. जाहिरात ही एक कला असून योग्य जाहिरात करुन आपल्या उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी उत्पादकांमध्ये स्पर्धा लागलेली दिसून येते.

## ४.३ जाहिरात करण्याची माध्यमे

जाहिरात प्रसारित करण्याची वेगवेगळी माध्यमे आहेत. वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिक वार्षिकांक यासारख्या नियतकालिकांतून जाहिरात केली जाते म्हणजे प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया अशा दोन विभागातून जाहिरात होते. इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये आकाशवाणी, दूरदर्शन, वेगवेगळी चॅनेल, या व्यतिरिक्त इंटरनेट, मोबाईल मॅसेज, यावरुनही जाहिरात केली जाते. आपल्याला येथे वर्तमानपत्रातून आणि नियतकालिकामधून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मसूदा (मजकुर) याचा विचार करायचा आहे.

**जाहिरातीचा उद्देश :**

जाहिरात म्हणे 'ॲडव्हर्टाईजमेंट' हा शब्द मूळ 'ॲडव्हर्टेरी' या लॅटिन शब्दापासून तयार झालेला आहे. या लॅटिन शब्दाचा अर्थ '........ च्या' कडे मन वळविणे असा आहे. कोणत्याही माध्यमातून केलेल्या जाहिरातीचा तोच उद्देश असतो. आपल्या मालाकडे किंवा आपण देत असलेल्या सेवेकडे लोकांचे लक्ष वेधावे, हाच जाहिराती मागचा उद्देश असतो. जाहिरातीसाठीच्या संहिता लेखनाने पुढील गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत.

१) लक्ष वेधणे : लोकांना जाहिरात पाहावीशी वाटणे.
२) कुतूहलवश होणे : लोकांचे कुतूहल जागृत होऊन जाहिरात वाचावीशी वाटणे.
३) आकांक्षा निर्माण होणे : लोकांच्या मनात जाहिरात वाचून आकांक्षा निर्माण व्हायला हवी.
४) विश्वास प्रेरक होणे : लोकांच्या मनात जाहिरात वाचून विश्वास निर्माण व्हायला हवा.

५) कृती प्रवृत्त होणे : जाहिरात केलेली वस्तू खरेदी करावीशी वाटते.
६) आपल्या उत्पादनाबाबत, सेवाबद्दल किंवा कार्याबाबत माहिती देतो.
७) आपल्या उत्पादनाची अनुकुल प्रतिमा उभी करणे.
८) लोकमनाला व अभिरुचीला वळण देणे.

## ४.४ जाहिरातीचा मसुदा / मजकूर

जाहिरातीमध्ये लिखित स्वरुपाचा मजकूर आणि त्या जाहिरातील अनुसरुन चित्र, कंपनीचा ट्रेडमार्क यांचा समावेश वर्तमानपत्रातल जाहिरातीमध्ये असतो तर आकाशवाणी म्हणजे रेडियोवरुन प्रसारित होणाऱ्या ही श्राव्य स्वरुपाची असते. हे लक्षात घेऊन तसा मजकूर तयार केलेला असतो. जाहिरातीचे स्वरुप श्राव्य दृश्य स्वरुपाचे असते. म्हणून येथे सचित्र चित्र किंवा एखादे दृष्य तयार करुन जाहिरात तयार केली जाते. यासाठी तयार केला जाणारा मजकूर वेगळ्या स्वरुपाचा असतो. वर्तमानपत्र व नियतकालिके, रेडियो, दूरदर्शन या तीनही प्रसार माध्यमातील जाहिरातीचे मजकूर वेगळ्या स्वरुपात तयार करावे लागतात.

वर्तमानपत्र व नियतकालिकातील जाहिरात तयार करताना मजकुर प्रभावी असावा लागतो.

वर्तमानपत्र आणि नियतकालिकातील जाहिरात ही अधिक प्रभावशाली असते, कारण ती पुन्हा पुन्हा वाचली जाते. वर्तमानपत्रातील जाहिरात ही कुटूंबातील सर्वजण वाचत असतात. त्यामुळे उत्पादित कंपन्या आपली जाहिरात ही दूरदर्शन बरोबरच वर्तमानपत्रातूनही प्रसिद्ध करण्यावर भर देतात. या जाहिरातीचा मसुदा तयार करणे एक प्रकारचे कौशल्य असते. जाहिरातीमधील मजकूरक वाचून वाचक प्रभावित झाला पाहिजे. असा मजकुर तयार करणे एक प्रकारचे कौशल्य असते.

वर्तमानपत्र किंवा नियतकालिकातील जाहिरातीचा मजकूरातील महत्त्वाचे घटक.
१) मथळा (हेडलाईन)
२) पूरक मथळा (सब-हेडलाईन)
३) संहिता (टेक्स्ट)
४) जाहिरातदाराची मुद्रा (सिग्नेचर)
५) घोषवाक्य (स्लोगन / बेसलाईन)

## ४.५ मथळा

मथळा हा जाहिरातील महत्त्वाचा भाग असतो. वाचकाचे जाहिरातीकडे लक्ष वेधून घेण्याचे किंवा त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करण्याचे काम मथळ्याच्या वाक्यरचनेतून करायचे असते. एखादी उत्पादित वस्तू जर वाचकाला हवी असेल तर वाचक जाहिरातीमधील मजकूर वाचतो. मथळा मधील वाक्यरचनेतून ग्राहकाच्या दृष्टीने काही आस्वासने त्यांच्या नजरेत भरणारा फायदा नमूद झाला असेल तरच होतो. उदा. वॉशिंग मशीनची जाहिरात.

munotes.in

तासाचे काम काही मिनिटात, असा मथळा गृहिणींना त्यातील आश्वासनामुळे आकर्षक वाटतो. 'अभ्यास कर... हे सांगायचे दिवस गेले! हा मथळा विषयानुसार अभ्यासाची सी.डी., होम रिव्हाईज या कंपनीची आहे. त्यांच्या जाहिरातीमध्ये अभ्यास कर... हे सांगायचे दिवस गेले. आता मी आवडीने अभ्यास करते. अशी जाहिरात केली आहे.'

जाहिरातीमधील मथळा हा कधी पदबधाच्या रुपाने दिसेल तर कधी वाक्यरुपाने दिसेल. तुमचं स्वप्नातील घर... आम्ही साकार करतो.

ही बांधकाम व्यवसाय घर बांधून देणारी कंपनी किंवा डी.एस.के. घराला घरपण देणारी माणसं अशी वाक्यरचना केली जाते. जाहिरातीमधील ही वाक्य प्रश्नात्मक, उद्गारात्मक, विधानात्मक, आदेशात्मक स्वरुपाची असतात.

१) प्रश्नात्मक - काय तुम्ही चिंताग्रस्त आहेत..? (ज्योतिष्याची जाहिरात)
२) उद्गारात्मक - आई, ग वैतागले, मी या केसांना... (केशवर्धक तेलाची जाहिरात)
३) विधानात्मक - तुमच्या बाबतीतही घडू शकते (विमा कंपनीची जाहिरात)
४) आदेशात्मक - एक पुस्तक विकत, एक पुस्तक मोफत (ग्रंथ प्रकाशन संस्थेची जाहिरात)

**जाहिरातसंहिता लेखनाची वैशिष्ट्ये :**

१) जाहिरातीचे लेखन करताना जाहिरातीची भाषा सरळ, साधी, सोपी व स्पष्ट असावी, ती ग्राहकाच्या बुद्धीला ताण देणारी नसावी.
२) जाहिरातीची भाषा विश्वासार्हता निर्माण करणारी असावी
३) जाहिरात थोडक्यात आणि परिणामकारक असावी.
४) भाषा वेधक, वाचनीय व अर्थपूर्ण असावी तसेच वाक्य रचनेमध्ये लयबद्धता व सुसंवादी असावी.

## ४.६ जाहिरातीचा नमुना

**जाहिरातीचा नमुना - १**

प्रश्न १ बिस्किट कंपनीची जाहिरात तयार करा.




munotes.in

**जाहिरातीचा नमुना - २**

प्रश्न २ साडीच्या दुकानाची जाहिरात करा.

**सेल ! सेल! सेल!**


**मंजरी साडी सेंटर**

५०% दरात सर्व प्रकारच्या साड्या उपलब्ध

रेल्वे स्टेशन ठाणे (प.)जवळ, ठाणे,
मंजरी साडी सेंटर राजाराम कॉम्प्लेक्स

## ४.७ वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेले जाहिरातीचे नमुने









## ४.८ संदर्भ सुची


१. व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापुर
२. व्यावहारिक मराठी - संपादक डॉ. साहेब खदारे, निर्मल प्रकाशन, नांदेड
३. व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावडे, स्नेहवर्धन प्रकाशन
४. व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे, पुणे


❖❖❖❖

# घटक -५

# उताऱ्यावरील प्रश्न

**घटक रचना :**

५.० प्रस्तावना
५.१ उताऱ्यावरील प्रश्नाचे स्वरुप
५.२ उतारा आणि प्रश्न नमुना १
५.३ उताऱ्यावरील प्रश्न नमुना २
५.४ उताऱ्यावरील प्रश्न नमुना ३
५.५ उताऱ्यावरील प्रश्न नमुना ४
५.६ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ५
५.७ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ६
५.८ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ७
५.९ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ८
५.१० उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ९
५.११ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना १०
५.१२ संदर्भग्रंथ

## ५.० प्रस्तावना

एखाद्या साहित्यकृतीचे वाचन करताना, वाचन कसे करावे, एखाद्या उताऱ्याचा नेमका अर्थ कसा समजून घेता येईल. या उद्देशाने विद्यार्थ्यांना उताऱ्यावरील प्रश्न हा घटक अभ्यासाला लावण्यात आला आहे. त्यामुळे उताऱ्याचे वाचन कसे करावे. त्याचा आस्वाद कसा घ्यावा हे विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.

## ५.१ उताऱ्यावरील प्रश्न स्वरुप

उताऱ्यावरील प्रश्न या मध्ये साहित्यातील कोणताही एक गद्य उतारा दिला जातो. हा उतारा एक विचार किंवा माहिती देणरा असतो. त्या उताऱ्यावर आधारित प्रश्न दिले जातात. उतारा वाचून, समजून घेऊन त्याचे योग्य आकलन करुन त्यावर विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे लिहिणे अपेक्षित असतात.

munotes.in

## ५.२ उतारा आणि प्रश्न नमुना १

**उतारा क्र. १**

सध्याचा सरकारी वनमहोत्सव सुरु होण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी - १९०८ साली रविंद्रनाथांनी वृक्षारोपणाची ही मोहीम सुरु केली आणि त्यांच्या शब्दांतच सांगायचे, तर ही 'मरु-विजया' ची म्हणजे वाळवंटावरच्या विजयाची मोहीमच होती. ही मोहीम त्यांनी किती यशस्वी करुन दाखवली याची साक्ष पटवीत आज शांतिनिकेतनात शेकडो झाडे उभी आहेत. रवींद्रनाथांच्या या वृक्षप्रेमात त्यांचे चिरंजीव रथींद्रनाथ यांची नुसती साथच नव्हती. तर वने-उपवने उभी करण्याच्या शास्त्रातले ते एक फार नामांकित तज्ज्ञ होते. वृक्षवेलींच्या सगळ्या खोडी, आवडीनिवडी, लहरी रथीबाबूंना बरोबर ठाऊक होता. "साऱ्या भारतीय वृक्षांच मी इथं कायमच संमेलन भरवून ठेवीन." अशी प्रतिज्ञा केल्यासारखे त्यांनी शांतिनिकेतनाचे तपोवन उभे केले आहे. इतकेच नव्हे तर, फुलझाडांना लागणाऱ्या कुंड्या देखील स्वतः त्यांचे 'डिझाइन' करुन आकार देऊन, स्वतः भट्टीत घालून इतक्या विविध आणि सुंदर आकारात घडवल्या आहेत की, एखाद्या बंगल्याच्या मालकाला आपल्या बंगल्याचा अभिमान वाटावा तसा त्या रोपाना आपल्यासाठी घडवलेल्या त्या कुंड्यांचा वाटत असेल. 'उत्तरायण' बंगल्यांच्या परिसरात त्यांनी निर्माण केलेल्या बागेतून - अशोकवनातून निरनिराळ्या वृक्षांच्या बीधिकांतून हिंडताना माणूस नकळत अंतर्मुख होतो.

**प्रश्न :**

१) रथींद्रनाथानी उभ्या केलेल्या तपोवनाची कोणती वैशिष्ट्ये लेखकाने सांगितली आहेत ?

२) वृक्षारोपणाच्या मोहिमेचा कोणता अर्थ रवींद्रनाथांनी सांगितला आहे ?

३) उत्तरायण बंगल्याच्या बागेतील कुंड्याचे वैशिष्ट्य कोणते होते ?

४) १९०८ साली रवीद्रनाथांनी वृक्षरोपणाची कोणती मोहिम सुरु केली ?

## ५.३ उताऱ्यावरील प्रश्न नमुना २

**उतारा क्र. २**

चेहरा कसाही असो, रंगरुप कसही असो, माणूस अंतर्थामातून हसला की तो सुंदर दिसतो. अशा सुंदर चेहऱ्याच्या थेटी परवा. 'उमेद' परिवारात झाल्या. अक्षरक्षः खांद्यावर पेलत नव्हती अशी मलं, त्यांच्या पालकांनी, त्यांच्या शिक्षकांनी स्टेजवर आणून चढवली अन् शक्तिहीन बोटे जुळवण्याच्या आटोकाट प्रयत्न करुन त्यांनी गणेशाला प्रार्थना केली. शारीरिक आणि मानसिक विकलांग मनांना उमेदीचा आधार देणारे सगळे कार्यकर्ते पन्नाशी गाठलेले होते. एकमेकांची सुखदु:खे जाणून घेत गेली. चौदा वर्षे महाराष्ट्रातल्या शाळांना, पालकांना गुंफून घेत ही संस्था काम करते आहे.

ज्या आत्म्यांना अव्यंग आधार देताना परमेश्वराचेही हात शिणतात, तेथे तोही काही पालकांचा हात हाती होतो न म्हणतो, 'या जन्मी, माझं हे काम तुम्ही कराल का ?' हे काम करणं वाटतं तेवढ सोप नाही. प्रत्यक्षात रणांगणात उतराव लागत, जिद्दीनं हे मूल सांभाळताना स्वतःच्या आयुष्याची पुरचुंडी दूरही ठेवावी लागते. हौसमौज नावाची चीज उरत नाही. एकच

ध्यास! एकच श्वास! जिद्दीने आपल्या बौद्धिक विकलांग मुलाला स्वतःचा चेहरा देणं! त्याला झेपणारा आनंद त्याला घेऊ देणं. असे आजही चेहरे त्या परिवारात भेटले.

**प्रश्न :**

१) 'उमेद परिवार' ही संस्था कोणते काम करत होती ?
२) लेखकांच्या मते माणूस केव्हा सुंदर दिसतो ?
३) विकलांग मुलांचे पालक कोणते काम करत असतात ?
४) उमेद ही कोणत्या मुलांसाठी स्थापन केली होती ?

## ५.४ उताऱ्यावरील प्रश्न नमुना ३

**उतारा क्र. ३**

"एके दिवशी लहानपणी आम्ही अंगणात खेळत होतो. तुळशीचे अंगण भले मोठे लांब व रुंद होते. तुळशीच्या अंगणात खेळत होतो. तुळशीचे अंगण भले मोठे लांब व रुंद होते. तुळशीच्या अंगणात एक उंचच उंच बेहेळ्याचे झाड होते. एकाएकी टप असा आवाज झाला. मी व माझा धाकटा भाऊ कसला आवाज झाला, ते पाहू लागलो. काहीतरी पडले होते खास. आम्ही सर्वत्र शोधू लागलो. शोधता शोधता झाडावरुन पडलेले एक पाखराचे लहानसे पिल्लू आढळले. त्याची छाती धडधडत होती. फारच उंचावरुन ते पडले होते. त्याची फारच दुर्दशा झाली होती. लोळा-गोळा झाला होता. अजून त्याला नीट पंख फुटले नव्हते. डोळे सुद्धा ते नीट उघडीत नव्हते. लोहाराचा भाता जसा हलत असतो, त्याप्रमाणे त्याचे सारे अंग एकसारखे हलत होते, खालीवर होत होते. त्याला जरा हात लावलाच ते आपली सगळी मान पुढं करी व ची ची असे केविलवाणे ओरडे. या पिलाला ना घरात उचलून न्यावयाचे ठरविले. त्याला एका फडक्यात घेऊन आम्ही घरात गेलो. मी व माझा लहान भाऊ दोघे होतो. मी कापूस घालून त्यावर त्या पिलास ठेवले. आम्ही ही लहान होतो. आम्ही तरी काय करणार ? बाल बुद्धीला जे जे सुचेल, ते ते करु लागलो. त्या पिलाला दाणापाणी देऊ लागलो. तांदळाच्या बारीक कण्या आणून त्याच्या चोचीत घालू लागलो व झारीने त्याच्या चोचीत पाण्याचे थेंब घालू लागलो. त्या पिलाला खात येत होते, की नाही त्या आमच्या काळजीनेच, आमच्या चोचीत पाणी घातल्यानेच, दाणे घातल्यानेच तर ते मरणार नाहीना याचा आम्ही विचारच केला नाही."

**प्रश्न :**

१) श्यामने व त्याच्या भावाने पाखराच्या पिल्लाची काळजी कशा प्रकारे घेतली ?
२) वरील उताऱ्यास योग्य शिर्षक द्या.
३) वरील उताऱ्यातून श्यामचा कोणत्या गुणाचे दर्शन घडते.
४) खेळत असताना झाडावरुन काय पडल्याचा आवाज श्यामला येतो ?

## ५.५ उताऱ्यावरील प्रश्न नमुना ४

**उतारा क्र. ४**

आम्ही भेंड्या लावण्याचा भरात होतो. इतक्यात काही मुले 'श्याम, अरे श्याम अशी हाक मारत आली. एकजण म्हणाला, 'श्याम, कोणतरी तुला शोधीत आहे. आमचा श्याम कोठे आहे, अशी चौकशी करीत आहे' इतक्यात माझे वडील माझा शोध करीत माझ्याजवळ येऊन ठेपलेही.'

मी विचारले, 'भाऊ, इकडे कशाला आलात? आता आमची घंटा होईल. मी घरी भेटलो असतो.' 'वडिलांचा तो कसातरी गबाळ्यासारखा केलेला पोषाख पाहून मला लाज वाटत होती. इंग्रजी शिकणाऱ्या मुलांत मी वावरत होतो. कशाचे मला महत्त्व कळू लागले नव्हते तरी झकपक पोषाखाचे कळू लागले होते. सहा कोस चालून आलेल्या पित्याचे प्रेम मला दिसले नाही. मी आंधळा झालो होतो. शिक्षणाने ह्रदयाचा विकास होण्याऐवजी संकोचच होत होता. शिक्षणाने अंतर्दृष्टी येण्याऐवजी अधिकच बहिदृष्टी मी होऊ लागलो होतो. वस्तूच्या अंतरंगात जाण्यास शिक्षणाने तयार होण्याऐवजी वस्तूच्या बाह्य रुपरंगावरच भुलू लागलो होतो. जे शिक्षण मनुष्याला इतरांच्या ह्रदयात नेत नाही, इतरांच्या ह्रदयमंदिरातील सत्यदृष्टी दाखवीत नाही, ते शिक्षण नव्हे. शिक्षणाने मला प्रत्येक वस्तू, प्रत्येक व्यक्ती म्हणजे ज्ञानमंदिर वाटले पाहिजे. ते जोपर्यंत होत नाही, अंधूकही होत नाही, तोपर्यंत घेतलेले शिक्षण व्यर्थ समजावे. ह्रदयाचा विकास ही एक अतिमहत्त्वाची, जीवनात सुंदरता व कोमलता आणणारी वस्तू आहे.'

**प्रश्न :**

१) वरील उताऱ्यात श्यामला कोण भेटायला येते?
२) लेखकाच्या मते शिक्षणाने व्यक्ती काय वाटली पाहिजे?
३) श्यामने आपल्या वडीलांचे मन कशाप्रकारे दुखावले?
४) लेखकाच्या मते शिक्षण हे कशाप्रकारचे असावे?

## ५.६ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ५

**उतारा क्र. ५**

बागेत काही झाडे अशी असतात की, ज्यांना माळी कधीच पाणी घालत नाही, त्यांची निगाही राखीत नाही तरीही ती झाडे वाढतात. आम्ही देशभक्तांची मुले असेच 'कॅक्टस' सारखे वाढलो व शिकलो. वडील १९२० सालापासूनच महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले होते. म्हणून आमच्या सोबत इतर तथाकथित प्रतिष्ठित वर्ग सतत म्हणत असे "न बापका डर, न माँ का डर, बेटा बना व्हॉलेन्टियर", कारण आईही १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात व त्यानंतरच्या १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात जेलमध्ये गेली होती. आमच्या शिक्षणाचे सातत्य टिकणे तसे कठीण होते. सुरुवातीला नागपूर येथील चिटणीस पार्कजवळील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत तरटाच्या चटईवर बसूनच एक वर्ष शिकलो. नंतर आम्ही वर्धा येथे १९३५ साली आलो. त्यावेळी बजाजवाडीत राहात होतो. बजाजवाडी हे चालते बोलते तीर्थक्षेत्र होते. भारतीय राष्ट्रीय जीवनात जी जी दिव्य तत्वे होती, जे जे

कल्याणकारी भाव होते, जे जे पावित्र्ययुक्त माधुर्य होते, त्या सर्वांचे ते पुण्यक्षेत्र होते. महात्मा गांधीजींच्या वास्तव्याने अभिमंत्रित झालेले ते ठिकाण होते वर्धा. येथे आल्यावर नगरपालिकेच्या टिळक प्राथमिक शाळेत दुसऱ्या वर्गात प्रवेश घेतला. तेथील एक शिक्षक लहानू गुरुजी, त्यांच्या शिकवण्यावर विश्वास होतो. त्यामुळे ते 'आमचे' गुरुजी होते. संस्कार करावे लागत नसतात, तर शाळेचे वातावरण व शिक्षकाचे आचार विचार यातून आपोआप ते होतात, यावर त्यांचा विश्वास होतो. ते सर्वांना खूप आवडत, आपल्यापैकी वाटत त्यांच्याबद्दल इतका आदर होता की मी न्यायमूर्ती पदाची शपथ घेतल्यानंतर सर्वप्रथम त्यांनाच साष्टांग नमस्कार करायला गेलो होतो. त्या काळात वर्धा येथे आम्हां मित्रांचा एक क्लब होता. आम्ही सारी मुले जाती, वर्ग पाळत नव्हतो. एकमेकांचे सोबती होतो, सवंगडी होतो. त्या क्लबचे नाव होते 'घनचक्कर समाज' आमचा एकूण व्यवहार व वृत्ती यांमुळे माझे वडील दादा धर्माधिकारी यांनीच ते नाव सुचविले होते. एकदा आम्ही महात्मा गांधीजींकडे ते नाव सांगायला गेलो. ते हसले व म्हणाले "खरा घनचक्कर तर मीच आहे" कारण 'घन' म्हणजे 'ठोस' व 'चक्कर' म्हणजे 'गतिशील' असा त्या शब्दाचा अर्थ आहे. खेळ सुरु करण्यापूर्वी आम्ही अर्धा ते एक तास सूतकताई करीत असू. सूतकताई हे उत्पादक शारीरिक परिश्रमांचे प्रतीक मानले जात असे. त्यानंतर खेळायचे व रात्री स्वतः च्या सायकलवर कंदील, पाटी-पेन्सिल घेऊन 'म्हसाला' या खेड्यात प्रौढांसाठी अक्षरदानाचे वर्ग चालवयाला जायचे. मी त्यात शिक्षकाची भूमिका वठवीत होतो. त्यामुळे आपणही कुणाचे तरी शिक्षक आहोत याचे समाधान लाभत होते.

(अधिक माहिती आणि सरावासाठी प्रश्न उत्तर)

**प्रश्न :**

१) लेखकाचे वडील व आई कोणत्या आंदोलनात सहभागी झाले होते ?

➢ लेखकाचे वडील १९२० पासून गांधीजींनी सुरु केलेल्या स्वतंत्र्य आंदोलनात सहभागी झाले व लेखकाची आई १९४१ वैयक्तिक सत्याग्रहात व त्यानंतरच्या १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात जेलमध्ये गेल्या होत्या.

२) लेखक कोणत्या शाळेत होते ?

➢ एक वर्ष लेखक नागपूरच्या नगरपालिकेच्या शाळेत शिकले नंतर वर्धा येथील नगरपालिकेच्या टिळक प्राथमिक शाळेत दुसऱ्या वर्गात शिकले.

३) वर्धा येथील लेखकांच्या मित्रांच्या क्लबचे नाव काय होते व ते कुणी सुचविले होते ?

➢ वर्धा येथील लेखकाच्या मित्रांच्या क्लबचे नाव घनचक्कर समाज होते व ते नाव लेखकाच्या वडीलांनी सुचविले होते.

४) सूतकताई हे झाल्यावर लेखक कुठे व काय करायला जायचे ?

➢ सूतकताई हे झाल्यावर लेखक म्हसाळा या खेड्यात प्रौढांसाठी अक्षरज्ञानाचे वर्ग चालवायला जायचे

## ५.७ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ६

**उतारा क्र. ६**

पुलंचे व्यक्तिमत्त्व हे मोठे गंमतीदार आहे; गुंतागुंतीचेही आहे, त्यांना जुन्यातल्या चांगल्याची ओढ आहे. आधुनिकतेचेही आकर्षण आहे. नवीन विचाराशी ते तादात्म्य पावतात. त्यांची जिज्ञासा दुर्दम्य आहे; वाचन चौफेर आहे, काही तरी झपाटणारे वाचनात आले की, आसपासच्या लोकांना फोन करुन किंवा पत्रे लिहून त्यात सहभागी करुन घेण्याचा उत्साह आहे. 'माणूस' या गोष्टीत त्यांना अतोनात रस आहे. भरडला जाणाऱ्याबद्दल अस्सल कळवळा आहे. त्यांचे स्वतःचे रागलोभ माणसासारखेच आहेत. पण ते असतानाही त्यांचे साहित्यिक भान कधी सुटलेले दिसत नाही. नेमाड्यांचे पुलंशी फारसे कधी जुळले नाही. पण ती तेढ 'कोसला' च्या रसग्रहणाच्या आड येत नाही. ते 'कोसला' ची प्रशंसा करु लागले की, त्यांचे तोंड बंद करणे कठीण असते. पु.शि. रेगे व्यक्ती म्हणून त्यांना कधी आवडले नाहीत. पण पुशिंच्या काव्यावर त्यांचे नितान्त प्रेम होते.

**प्रश्न :**

१) पुलंचे व्यक्तिमत्त्व कसे आहे ?
   - पुलंचे व्यक्तिमत्त्व हे मोठे गंमतीदार आहे; गुंतागुंतीचेही आहे.

२) पुलंना सर्वात कोणत्या गोष्टीत विशेष रस वाटे ?
   - पुलंना 'माणूस' या गोष्टीत विशेष रस वाटे.

३) लेखकाला कोणती व्यक्ति कधीच आवडली नाही ?
   - लेखकाला पु.शि. रेगे व्यक्ति कधीच आवडली नाही.

४) पुलंजवळ कोणते साहित्यिक भान होते ?
   - व्यक्ती आणि तिचे साहित्य यामध्ये पुलं गफलत करत नसत. एखाद्या लेखकाशी असलेले मतभेद पुलं त्याच्या साहित्यकृतीच्या आस्वादाच्या आड येऊ देत नसत.

## ५.८ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ७

**उतारा क्र. ७**

चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झाला. हा काव्यसंग्रह नंतर अनेक विद्यापीठांतून अभ्यासक्रमालाही लावला होता. त्यासाठी अनेक कॉलेजांमधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी बोलावला जायचं. मला गंमत वाटायची आणि कौतुकही. कारण मास्तर स्वतः कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. अनेकांची पत्रही यायची मास्तरांना मास्तर खूप आनंदात असायचे. एखादी नवी कविता लिहून झाली की मग विचारायलाच नको. त्यांच्या अनेक कवितांची पहिली श्रोता मीच असायची. कविता लिहून झाली की ते मला वाचून दाखवायचे. त्यांनी कविता लिहिल्याचा मलाही आनंद होत असे, पण तो व्यक्त कसा करायचा हे

मला समजत नसे किंवा कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे. अनेकदा मी माझ्या संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उदयाचा विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द माझ्या कानांवर पडायचे, पण त्यातला भाव मात्र मला समजायचाच नाही. एवढं मात्र नक्की की ते लिहित असताना घरातल्या कोणत्याच कटकटी मी त्यांच्यापर्यंत न्यायची नाही. आणि माझं मन म्हणायचं, 'कृष्णाबाई, तुला काही कळतयं का त्यातलं? एक तर तू अडाणी बाई, तुला काय समजणार आहे त्यातलं? बावळटासारखं काहीतरी बोलून उगाच हसं करुन घेशील' आणि खरचं, मला ते उगाचच 'छान आहे', 'चांगली आहे' असं वरवरचं बोलायलाही आवडायचं नाही आणि पटायचंही नाही. त्यापेक्षा गप्प राहिलेलं बरं, अस म्हणून मी माझं काम शांतपणे करत बसायची. मास्तरही माझ्या उत्तराची अपेक्षा करीत नसत. वेगवेगळ्या कॉलेजमध्ये व्याख्यानं देऊन आल्यावर ते आणखीनच खूश असायचे. काहीबाही तिथल्या आठवणी सांगायचे, पण मी अडाणी त्यावर काय बोलणार? 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील कवितांवर अनेकांनी पुस्तकंही लिहिली. हा संग्रह १९६६ ला प्रकाशित झाला आणि मास्तरांच नाव साहित्यिकांमध्ये मानाने घेतलं जाऊ लागलं. अनेक मोठी मोठी मंडळी आमच्या घरी यायची. घरी आल्यावर त्याचा पाहुणचार करण्यापुरतीच मी बाहेर यायची. चहापाणी, जेवणखाणं, सगळं आवडीनं करायची, पण विशेष बोलत नसे जेवढ्यास तेवढं. कारण तेच मनातला न्यूनगंड. त्यामुळे बाहेर समारंभांना तर कधीच जात नसे. 'माझे विद्यापीठ' ला एकूण अकरा पुरस्कार मिलाले. पण एकही समारंभाला मी गेले नाही. नाही म्हणायला ह्यांना 'जनस्थान' पुरस्कार मिळाला तेव्हा मात्र नाशिकला गेले होते. कारण तात्यासोहबांनी मला सून म्हटलं होतं. त्या पुरस्काराच्या वेळी दीपप्रज्वलनही माझ्या हस्ते झालं होत. बाकी समारंभांना जाताना मला संकोचच वाटायचा. शांताबाई शेळके नेहमी म्हणायच्या, "वैनी किती ते लाजायच? आम्हाला नाही बाई आवडत. जरा बाहेर येऊन बसा ना!" पण मी बसले तरी गप्पच बसायची.

- कृष्णाबाई सुर्वे

**प्रश्न :**

१) मास्तरांचा दुसरा काव्य संग्रह कुठे आल्यावर प्रसिद्ध झाला व त्याचे नाव काय होते?

- ➢ मास्तरांचा दुसरा काव्य संग्रह चिंचपोकळीला आल्यावर प्रसिद्ध झाला व त्याचे नाव 'माझे विद्यापीठ'.

२) लेखिकेला कोणत्या गोष्टीचे कौतुक व गंमत वाटायची?

- ➢ मास्तर स्वतःच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांच्या कविता तेरावी, चौदावीच्या मुलांना अभ्यासात होत्या या गोष्टीचे लेखिकेला कौतुक व गंमत वाटायची.

३) माझे विद्यापीठ या काव्यसंग्रहाला किती पुरस्कार मिळाले?

- ➢ माझे विद्यापीठ या काव्यसंग्रहाला एकूण अकरा पुरस्कार मिळाले.

४) लेखिका कोणत्या समारंभाला गेली होती व तिथे तिच्या हस्ते काय करण्यात आले?

- ➢ लेखिका नाशिकला जनस्थान पुरस्कार समारंभाला गेली होती व त्या समारंभाचे दिपप्रज्वलन तिच्या हस्ते करण्यात आले.

## ५.९ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ८

**उतारा क्र. ८**

मैत्रीमध्ये सहवासाला काही महत्त्व असतेच. जुन्या लोणच्यासारखी जुनी मैत्री मुरत जाते. एकमेकांचे स्वरुप एकमेकांना बरेचसे कळलेले असते. त्यामुळे अशा मित्रासमोर किंवा मैत्रिणीसमोर आपली विशिष्ट प्रतिमा उभी करण्याची गरज राहत नाही. आपण जसे आहोत तसे, निखळपणे, निर्भरपणे आपण तिथे प्रकट होतो. या साध्या स्वाभाविक संबंधातून आपल्याला एक स्थैर्य लाभते. भोवतालच्या फसव्या, अस्थिर, धूर्त, मतलबी जगात मैत्रिची अशी स्वाभाविक सहज स्थाने म्हणजे आपला एक मोठा आधार असतो. तिथे पायाखालची जमीन ही जमीनच असते. मयसभेप्रमाणे जमीन समजून पाय टाकावा, तर तो पाण्यात खोल जावा आणि पाणी समजून पाऊल टाकायला जावे, तो टणक, खडबडीत जमीन लागावी असे या मैत्रीत घडत नाही. म्हणून मैत्रीचे असे एखादे तरी ठिकाण माणसाला हवेच.

**प्रश्न :**

१) मैत्रीमध्ये कोणत्या गोष्टीला महत्त्व असते ?

- मैत्रीमध्ये सहवासाला महत्त्व असते.

२) मैत्रीतून स्थैर्य का लाभते ?

- मैत्रीमध्ये एकमेकांच्या सहवासाला विशेष महत्त्व असते. त्यामुळे मैत्रीत असलेल्या दोन व्यक्ती एकमेकांना चांगल्या ओळखत असतात. मित्र आपल्या मित्रासमोर जसा असतो, तसा सादर होतो. त्यामुळे मित्रामित्रांमधले संबंध स्वाभाविक असतात. त्यामुळे त्या दोघांमधील संबंधाना स्थैर्य लाभते.

३) मैत्री हा आधार केव्हा ठरतो ?

- माणसांच्या भोवतालचे जग हे लबाड, फसवे, अस्थिर आहे. अशा या मतलबी जगात स्वाभाविकरित्या प्रकट होणारी सच्ची मैत्री हा एक मोठा आधार असतो.

४) मैत्रीचे एखादे तरी ठिकाण असावे असे तुम्हाला का वाटते ?

- या जगात अनेक फसव्या गोष्टी असतात. धूर्त, मतलबी माणसे भेटतात. अशा प्रसंगी सावरण्यासाठी मैत्रीचा चांगला उपयोग होतो. म्हणून मला वाटत मैत्रीचे एखादे तरी ठिकाण असावे.

## ५.१० उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना ९

**उतारा क्र. ९**

जपानी लोक बोलण्यात अतिशय मृदू, वागण्यात अत्यंत नम्र आणि कृती करण्यात सर्वात तत्पर असतात. हे लोक आपापल्या उद्योगात, व्यापारात, कारखान्यात काम करताना पाहिले तर करारीपणा, चिवटपणा आणि उद्योगप्रियता या त्यांच्या गुणांची आपल्यावर अधिक छाप पडते. ते अत्यंत कडक शिस्तीचे आणि नियमितपणाचे भोक्ते आहेत. अमेरिकन आणि जर्मन तज्ज्ञांनी व्यवस्थापनाचे जे तत्त्व मांडले आहे. ते सर्व गुंडाळून ठेवून जपान्यांनी स्वतःचे

अर्थशास्त्र आणि त्याला अनुरुप असे स्वतःचे व्यवस्थापनशास्त्र तयार केले ते परखडपणे आचरणात आणले आणि जगाला औद्योगिक चमत्कार करुन दाखवले अलीकडेच जपानने फिल्मशिवाय फोटो काढणारा कॅमेरा तयार केला आहे. छायाचित्रणातील हा अत्यंत महत्त्वाचा शोध असून, कॅमेऱ्यासाठी फिल्म तयार करणाऱ्या उद्योगात त्यामुळे प्रचंड उलथापालथ होईल. 'माविका' असे या नव्या कॅमेऱ्याचे नाव असून, सोनी या जगप्रसिद्ध इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने तो शोधून काढला आहे. याच कंपनीने पहिला ट्रान्झिस्टर तयार केला होता आणि खिशात ठेवण्यासारखा टी.व्ही. याच सोनी कंपनीने तयार केला आहे.

**प्रश्न :**

१) जपानी लोकांच्या कोणकोणत्या गुणांचा उल्लेख उताऱ्यात केला आहे?

- जपानी लोक बोलण्यात अतिशय मृदू, वागण्यात अत्यंत नम्र आणि कृती करण्यात सर्वांत तत्पर असतात. त्यांच्याकडे करारीपणा, चिवटपणा आणि उद्योगप्रियता हे गुण आहेत ते आपल्या कामात कडक शिस्त व नियमितपणा राखतात

२) जपानी लोकांनी औद्योगिक चमत्कार साधण्यासाठी काय केले?

- जपानी लोकांनी जगात वापरले जाणारे व्यवस्थापनशास्त्र दूर ठेवले, स्वतःचे अर्थशास्त्र व स्वतःचे व्यवस्थापनशास्त्र तयार करुन जगाला अनेक औद्योगिक चमत्कार करुन दाखवले.

३) फिल्मशिवाय फोटो काढणार कॅमेरा कोणत्या कंपनीने तयार केला व त्याचे नाव काय?

- फिल्मशिवाय फोटो काढणारा कॅमेरा सोनी या कंपनीने तयार केला व माविका त्या कॅमेऱ्याचे नाव.

४) सोनी कंपनीच्या कोणत्या तीन निर्मितीचा उल्लेख या उताऱ्यात केला आहे?

- सोनी या जगप्रसिद्ध इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या पहिल्या ट्रान्झिस्टर, खिशात ठेवण्याजोगा टी.व्ही. आणि फिल्मशिवाय फोटा काढणारा 'माविका' कॅमेरा या तीन निर्मितीचा उल्लेख या उताऱ्यात आला आहे.

## ५.११ उताऱ्यावरील प्रश्न आणि उत्तर नमुना १०

**उतारा क्र. १०**

गलोल आणि गसणीच्या बंदुकीच्या मध्ये एक तिरकमठ्याचाही काळ येऊन गेला होता. आणि त्या काळाकडे मागे वळून बघताना मला खूप आनंद होतो. कारण जरी मी तिरकमठ्याने कोणत्याही पक्ष्याला किंवा प्राण्याला 'ट्रान्सफिक्स' करु शकलो नाही. तरी त्याच काळात निसर्गाच्या बँकेत मी माझं क्रेडिट खातं उघडलं - काही किरकोळ बचतींसह याच काळात मी जे जंगल लोअर शोषून घेतलं ते मात्र माझ्यासाठी आनंदाचा कधीही न संपणारा खजिना होता. जंगल लोअर म्हणजे जंगलाचं ज्ञान, शास्त्र मी 'शोषणे' शब्द वापरतोय. 'शिकणे' नव्हे; कारण जंगलशास्त्र हे काही पाठ्यपुस्तकं वाचून शिकण्याचं शास्त्र नव्हे, पण ते एका वेळी थोडंथोडं शोषलं जाऊ शकत. ही शोषणाची क्रिया अनंत काळापर्यंत चालू राहू शकते; कारण निसर्गग्रंथाला आरंभही नाही वा अंतही नाही! आयुष्याच्या कोणत्याही कालखंडात तुम्हांला पाहिजे ते पान

उघडा, तुम्हाला ज्ञानलालसा असेल, तर तुमच्यासाठी ते फार रसाळ ठरेल. त्याची पान कितीही वेळ, डोकं खाली घालून वाचा, त्यातलं नावीन्य संपणार नाही. कारण निसर्गाला अंतिमता नाही.

**प्रश्न :**

१) लेखक काय करु शकला नाही ?

- लेखक कोणत्याही पक्ष्याला किंवा प्राण्याला 'ट्रान्सफिक्स' करु शकला नाही.

२) लेखकाला जंगलात कोणता खजिना सापडला ?

- लेखकाला जंगलात जंगलाचे ज्ञान व जंगलाचे शास्त्र सापडले.

३) जंगल लोअर म्हणजे काय ?

- जंगल लोअर म्हणजे जंगलाचे ज्ञान व जंगलाचे शास्त्र होय.

४) निसर्गग्रंथाची कोणती वैशिष्ट्ये लेखकाने सांगितली आहेत ?

- लेखक सांगतो की, निसर्गाला अंत नाही. त्यामुळे निसर्गग्रंथाला सुरुवातही नाही व शेवटही नाही. जंगलशास्त्र हे पाठ्यपुस्तक वाचून शिकण्याचे शास्त्र नव्हे. ते प्रत्येकाने स्वतःच समजून घ्यायचे असते.

## ५.१२ संदर्भ सुची


१. व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे, पुणे
२. व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकारलि
३. सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तांतलकार - प्रा. चंद्रहास जोशी
४. व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापुर


❖❖❖❖

munotes.in

# घटक -६

# सारांश लेखन

**घटक रचना :**

६.० प्रस्तावना
६.१ सारांश लेखन म्हणजे काय ?
६.२ सारांश लेखनाचे स्वरुप
६.३ सारांश लेखनाचे भाषातंत्र व रचना कौशल्य
६.४ संदर्भ ग्रंथ सूची

## ६.० प्रस्तावना

आपण जेव्हा एखादे भाषण किंवा चर्चा ऐकतो तेव्हा सर्व भाग जशाच्या तशा लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो तसा लक्षात राहत नाही. त्यातील काही भाग लक्षात राहिला तरी प्रमुख मुद्देच विसरुन जाण्याचा संभव अधिक असतो व तो भाग ज्या उद्देशाने लक्षात ठेवण्याचा प्रयत्न केला तो उद्देशच मुळी बाजूला राहतो, तेव्हा असे होऊ नये व त्यातील प्रमुख बाबी तरी लक्षात रहाव्यात म्हणून त्या मजकुरातील प्रमुख मुद्याला धरुन असलेले अंशात्मक सार लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. ते अंशात्मक सारसंकलन म्हणजे सारांश लेखन करणे होय.

## ६.१ सारांश लेखन म्हणजे काय?

सारांश लेखन एक लेखन कौशल्य आहे. कधी कधी विद्यार्थ्यांना सारांश, संक्षेप, तात्पर्य व आशय या वरवर समानार्थी वाटणाऱ्या शब्दांतील भेद स्पष्ट रीतीने न कळल्यामुळे त्यांचा त्याबाबत गोंधळ होण्याचा संभव असतो.

कोणत्याही साहित्य कृतीतील मग ती गद्यात्मक असो किंवा पद्यात्मक असो. तात्पर्य सांगावयाचे झाल्यास ते एका वाक्यातही सांगता येईल. तसेच त्या कलाकृतीचा संक्षेप करताना त्यातील अनावश्यक विस्तार टाळून तिची थोडक्यात पुनर्गुफण केली की तो संक्षेप होऊ शकेल. किंवा त्या कलाकृतीतील मध्यवर्ती कल्पना खुलवून फूलवून आपल्या शब्दांत मांडली की तिचा आशय व्यक्त होऊ शकेल; कलाकृतीतील प्रमुख कल्पना किंवा विचारांशी संबंधित अशा मुद्यांचे थोडक्यात पण स्पष्टरीतीने केलेले सारसंकलन म्हणजेच सारांश लेखन होऊ शकते.

साहित्यातील लेखकाचे बहुधा एका वाक्यात एकच मुद्दा मांडतो; परंतु वाचकाला त्या मुद्यातील प्रमुख विचाराचे किंवा कल्पनेचे सुलभ रीतीने आकलन व्हावे म्हणून मुख्य विचाराचे किंवा कल्पनेचे सुलभ रीतीने आकलन व्हावे म्हणून मुख्य विचाराच्या प्रतिपादनासाठी मात्र इतर

अनेक पूरक विचारकल्पना, उदाहरणे, प्रमाणे, अलंकार, वाक्यप्रचार, म्हणी इ. देऊन तो चांगल्या प्रकारे फुलवितो, तेव्हा सारांश लेखन करताना विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम त्या उताऱ्यातील गौण बाबींचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन त्यातील मुख्य विचार लक्षात घेतले पाहिजेत.

## ६.२ सारांश लेखनाचे स्वरुप

सारांश लेखन हा लेखन प्रकार आजच्या धावपळीच्या युगात गरजेचा बनला आहे. फोनवरील संवादापासून वृत्तपत्रांतील बातम्यांपर्यंत थोडक्यात बोलणे / लिहिणे / वाचणे क्रमप्राप्त झाले आहे. एखाद्या ऑफिसात साहेबांना भेटायला गेलात तर तेथे देखील त्याच्या टेबलावर 'Be Brief' अशी छोटीशी पाटी तुम्हाला दिसेल. कोर्टात न्यायाधीशापुढे त्या त्या खटल्यातील कामकाजाचे / तपशीलाचे सार तयार करुन ठेवलेले असते. मोठमोठ्या परिषदांच्या संशोधन पत्रिकांतही त्यांच्याकडे आलेले शोधनिबंध संपूर्ण छापण्याऐवजी त्याचा गोषवारा (abstract) छापलेला दिसतो. कमी शब्दांत नेमका आशय व माहिती सारांश लेखनात दिली जाते.

परीक्षेमध्ये सारांश लेखनासाठी एखादा उतारा दिलेला असतो. त्याचे सार थोडक्यात सांगणे अपेक्षित असते. दिलेल्या मूळ उताऱ्यातील विचार संक्षेपाने आपल्या भाषेत लिहून दाखविणे म्हणजे सारांश लेखन. त्यासाठी मूळ उताऱ्यातील विचार आधी सामग्र्याने समजून घेउन नंतर ते अगदी मोजक्या शब्दांत आणि तेही स्वतःच्या शब्दांत सांगता येणे, हे सारांश लेखनाचे वैशिष्ट्य. दिलेल्या मूळ उताऱ्यातील शब्दसंख्येच्या, सामान्यतः एक तृतीयांश एवढ्या प्रमाणात, त्याचा सारांश लिहावा, अशी अपेक्षा असते. मूळ उताऱ्यात शंभर शब्द असल्यास त्याचा सारांश स्थलपणे पस्तीस ते चाळीस शब्दांत करावा. अर्थात, हे प्रमाण काटेकोर असे नाही. चार-पाच शब्द कमी वा अधिक चालू शकतात. अर्थात, सारांशात मूळ समग्र उताऱ्याचे सार यायला हवे. तसेच मूळ उताऱ्यातील मुद्द्यांचे महत्त्व सारांशात कायम ठेवावे. सारांश लेखनातून त्या उताऱ्याचा आशय व्यक्त केला जातो.

## ६.३ सारांश लेखनाचे भाषातंत्र व रचना कौशल्य

सारांश लेखन एक कला आहे. सारांश लेखन विद्यार्थ्याने स्वतःच्याच भाषेत करावयाचे असते तसेच ते सरळ निवेदनात्मक पद्धतीने न करता परोक्ष निवेदन पद्धती नेच केले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक वाक्याचा पूर्वापार संबंध व विचारांचा मूळ क्रम यांकडे विद्यार्थ्यांनी लक्ष देणे आवश्यक असते. नाहीतर मूळ उताऱ्यातील वाक्यांचा परस्परांशी संबंध वेगळा व सारांशलेखनातील वाक्यांचा संबंध वेगळा तसेच मूळ उताऱ्यातील विचारांचा क्रम वेगळा व सारांश लेखनातील विचारांचा क्रम वेगळा ठेवला तर त्या लिखाणात एक प्रकारचा खंडितपणा येऊन ते असंबद्ध होईल त्यामुळे मूळ उताऱ्यातील प्रमुख विचाराचे सारसंकलन यथार्थपणे होणार नाही.

सारांश लेखन करताना मूळ विचारांचेच थोडक्यात पण मुद्देसूद सारसंकलन करावयाचे असल्यामुळे ते स्पष्ट व सुबोध होणे आवश्यक असते. सारांश वाचूनच वाचकाला मूळ उताऱ्यातील विचारांचे दर्शन व्हावयास पाहिजे म्हणून सारांश लेखनातील भाषा सोपी, सुबोध व अर्थवाही स्वरुपाची असावी. त्यात वापरलेले शब्द सोपे, सुटसुटीत व अर्थपूर्ण असावेत.

munotes.in

सारांश लेखन हे मूळ उताऱ्यातील विचाराचे सारसंकलन असल्यामुळे सारांश लेखनाच्या सुरुवातीलाच उताऱ्यातील विषयाची कल्पना येईल असे त्याला समर्पक शीर्षक द्यावे. नंतर त्यातील गौण व प्रमुख बाबींचे वर्गीकरण करुन मुख्य विचारांचे दिग्दर्शन करणारे पहिले वाक्य लिहावे व त्यानंतर मुख्य विचाराला पोषक असलेले पूरक विचार मांडावे, परंतु त्यात पाल्हाळीकपणा न आणता त्यातील उपयुक्त ठरेल तेवढाच भाग द्यावा तसेच मुख्य विचाराचे वाक्य व पूरक विचारांची वाक्ये यातील परस्पर संबंध व क्रम कायम ठेवावा. तथापि एखाद्या ठिकाणी जर क्रम बदलल्यामुळे सारांश लेखन स्पष्ट व रेखीव स्वरुपाचे होऊन त्यातील आशय लक्षात येण्याच्या दृष्टीने बनवलेला क्रम उपयुक्त ठरत असेल. तर प्रसंगी विचारांचा क्रम बदलविण्यास हरकत नाही. तसेच मूळ उताऱ्यातील अलंकार, उदाहरणे, म्हणी व प्रमेये इत्यादींच्या अर्थस्पष्टीकरणासाठी उपयोग होऊ शकत असेल, तर तो अल्प प्रमाणात करावा. त्यासाठी जास्त शब्दांचा वापर करणे योग्य ठरणार नाही आणि शेवटी तात्पर्य सांगून सारांश लेखन संपवावे. सारांश लेखन ही कला वाचनाने आणि आकलनाने समजून येते. त्यासाठी शब्द सामर्थ्याची नितांत गरज असते.

संपूर्ण सारांश लेखन अत्यंत काटेकोर, सुबोध व स्पष्ट शब्दांत असावे तसेच ते मूळ उताऱ्याच्या एक-तृतीयांश इतके असावे.

**सारांश लेखन : नमुना १**

समाजातील प्रत्येक माणसाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे. असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही. असे म्हणावयाला पाहिजे. सुंदर शिल्पकृती पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती चित्र पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंतांची जरुरी आहे. कलावंतांच्या पावलांनी सामाज चालत असतो. कलावंतांच्या डोळ्यांनी समाज पाहात असतो आणि कलावंतांच्या बुद्धीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षाच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतानाच द्यावयाला पाहिजे. कलावंतांची कला ही समाजासाठी आहे, आणि कलावंतावाचून समाज हा सर्वस्वी असहाय आहे.

**सारांश :**

**कला, कलावंत व समाज : यांचे नाते**

प्रत्येकाला आनंद देणे एवढेच कलेचे ध्येय मानणे. निसर्गाच्या जीवनचक्राचा अर्थच न कळणे होय. कलेच्या दर्शनाने आनंद तर मिळतोच, पण आपली जीवनशक्ती संपन्न होऊन बुद्धी व भावनाही विकसित होतात. यासाठी समाजाला कला व कलावंत यांची गरज असते. मानवी संस्कृतीच्या विकासात कलावंतांचा वाटा मोठा आहे, कला, कलावंत व समाज यांचे नाते अन्योन्य संबंध असतो.

कला अवतीर्ण झाली म्हणजे तिचे स्वातंत्र्य नष्ट होते व तिच्या सौंदर्यावर पार्थिवतेचे संस्कार घडतात. कलाविकास हेच कलावंताचे साध्य व अवघी चराचर सृष्टी ही त्यांची साधनसंपदा. जगातील सुष्ट-दुष्ट, क्षुद्र-गंभीर, भव्य-भिषण भावांची मातब्बरी त्याला साधनांपेक्षा अधिक नाही. चित्रकार जसा बेगुमानपणे बऱ्यावाईट रंगांचा उपयोग करतो. तसाच त्या भावांचा उपयोग करण्याचा त्यालाही अधिकार आहे. त्याने निर्मिलेली प्रतिसृष्टी सौंदर्यपूर्ण असली म्हणजे कोणत्या साधनांचा विनियोग त्याने कशा रीतीने केला हे पाहण्याचे कारण नाही. खुद्द सृष्टीच जिथे त्रिगुणात्मक आहे. तिथे त्याचीच कृती तेवढी सत्त्वगुणप्रधान असावी असा आग्रह धरुन कसे चालेल? खरा कलावंत कोणत्याच प्रकारची वाईट कृती निर्माण करु शकत नाही. त्याची सौंदर्यनिष्ठा इतकी उज्ज्वल व उदात्त असते. कलेचा उपयोग व्यावहारिक उपयुक्ततेकडे केल्यास तिच्यातील सौंदर्य नष्ट होते. चित्रकार जसा बऱ्यावाईट रंगांचा वापर करुन सौंदर्यपूर्ण कलाकृती निर्माण करतो. तसाच कलावंतही विविध भावांच्या साहाय्याने त्रिगुणात्मक प्रतिसृष्टी निर्माण करतो.

**नमुना क्र. २**

"समाजातील विविध मानवी मनाच्या महत्त्वाकांक्षेच्या नौका कोणत्या दिशेने हाकलावयास पाहिजेत, हे दाखविण्यासाठी मासिक पुस्तकांतील लेख म्हणजे जणू काही होकायंत्रच होत, असे म्हटल्यास हरकत नाही. जुन्या व नव्या वाङ्मयाचे परीक्षण याच उद्देशाने मासिक पुस्तकातून करण्यात येते. मासिक पुस्तकावर हे राष्ट्रशरीराची परीक्षा करणारे व त्याला पथ्य सांगणारे धन्वंतरी होत. वाङ्मयाकरिता इतस्ततः पडलेल्या अनेक विद्यासामग्रीतून कोणती मूर्ती निर्माण करणे प्रस्तुत काळाला योग्य आहे हे सांगणारे मार्मिक शिल्पचिकित्सक, मासिक पुस्तककार आहेत. कोणते नाटक करावयाचे हे एकदा सूत्रदाराने ठरवून टाकल्यावर ज्याप्रमाणे कंपनीतील नटवर्ग आपापली भूमिका घेऊन ते नाटक प्रेक्षणीय व रम्य करण्याचा प्रयत्न करीत असतो. तद्वतच लेखक वर्गाची स्थिती होते. मासिक पुस्तककार हे वाङ्मयरुपी नाटकात भिन्नभिन्न भूमिका घेणाऱ्या लेखक वर्गाचे सूत्रधार आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. हा जो स्वर लावील व जो ताल धरील, त्या स्वरात व त्या तालातच सर्व लेखकवर्ग गाऊ व नाचू लागतो. मासिक पुस्तककार युद्धात उद्युक्त असलेल्या अफाट सैन्यांचे सेनापती आहेत."

**सारांश लेखन :**

मासिकातील लेख म्हणजे समाजातील विविध मानवी मनाच्या महत्त्वकांक्षेला दिशा दाखविणारे होकायंत्र व मासिक पुस्तककार अर्थात संपादक हा राष्ट्र शरीराची परीक्षा करुन पथ्य सांगणारा धन्वंतरी होय. देश कालपरिस्थितीनुरुन सैन्यातील सेनापती यांच्यासारखी मासिक पुस्तककाराची भूमिका असून नाटकातील नट किंवा सैन्यातील सैनिकासारखी लेखकांची भूमिका असते. तो सुचविला त्या स्वरुपाचे लेखन वर्गाकडून होत असते. लेखक आपल्या लेखातून विविध मानवी मनोवृत्तीचे दर्शन घडवित असतो.

**नमुना क्र. ३**

पतिव्रता पतीचे नाव घेत नाही त्याप्रमाणे कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार टाळतो. पण दोन्ही पक्षी आपण अपवाद कल्पू शकू. क्वचित प्रसंग आपले मत मांडण्यास हरकत नाही. पण आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडन करण्याचा मोह टाळावा. मतप्रतिपादनात आपले मत मांडणे आणि दुसऱ्याचे खोडणे असे दोन भाग कल्पिले जातात. पण ते कल्पनेचे आहेत, खरे नाही. दिवा लावणे व अंधार झाडून टाकणे ही जशी दोन कामे तसलेच हे दोन भाग. आधी दोन भागच खोटे,

त्यातही पुन्हा आपला भर बहुतेच दुसऱ्याचे मत खोडण्यावरच जास्त असोत. दुसऱ्याचे मत खोडले की तेवढ्याने आपले मत सिद्ध झालेच असे होत नाही आणि आपले मत सरळ मांडले म्हणजे दुसऱ्याचे मत खोडण्याची जरुर राहत नाही. भूमितीमध्ये युक्लिडने कोठेच खाडाखोड न करता थोडक्यात सरळ सिद्धांत मांडले आहेत. त्या सिद्धान्तांची आज दुनियेवर सत्ता चालते. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यात त्या मताविषयीचे सूक्ष्म प्रेमच असते. भक्तिमार्गात जसा प्रेमाने तसा द्वेषानेही ईश्वर मिळतो असे सांगतात. बिभीषण प्रेमाने तरला तर रावण द्वेषाने तरला अशी भाषा संत बोलतात, त्यातला अर्थ हाच आहे. मिल्टनने 'पॅरडाईज लॉस्ट' मध्ये सैतानाच्या अंगी सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष दाखवूनन त्याच्याविषयी वाचकांची सहानुभूती उत्पन्न केली आहे. सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष वाटतो त्याच्या मनात सूक्ष्मरुपाने सात्त्विकता वसत आहे. तसेच तामसपणाचा जोरजोराने निषेध करीत बसणाऱ्या माणसात आतून तामसपणा चिकटलेला आहेच, यात शंका नाही.

**सारांश :**

**मतप्रदर्शन म्हणत परमतखंडन नव्हे**

कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार करीत नाही, क्वचित अपवादाच्या प्रसंगी तो मतप्रदर्शन करील पण तसे करताना तो परमतखंडन करणार नाही. मतप्रदर्शनात परमतखंडन आवश्यकच असते असे नाही. स्वमत मांडल्यावर परमत खंडनाची आवश्यकताच राहत नाही. युक्लिडने परमतखंडन केलेले नाही. आपण ज्या मताचा विरोध करतो. त्याबद्दल आपल्या मनात सूक्ष्म प्रेमच असते. रावण द्वेषाने तरला. मिल्टनचा सैतान सात्त्विकतेच्या तात्त्विक विरोधाने सहानुभूति मिळवतो. सात्त्विकतेचा द्वेष करणाऱ्याच्या मनात ती सूक्ष्मरुपाने असते. त्याप्रमाणे तामसपणाचा निषेध करणाऱ्याला तो आतून चिकटलेला असतो.

**नमुना क्र. ४**

सध्याचा मनू असा आहे की, हा समानत्वाचा घोष ज्याच्या त्याच्या तोंडी चालू रहावा. असे झाल्यामुळे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेले असणे, दुबळे असणे, कर्तृत्त्वशून्य असणे हा हक्क बनू पाहत आहे. आपल्या अंगातील सामर्थ्याची वाढ करुन घेण्याला संधी पाहिजे, हा घोष तारतम्याने न्याय्य ठरतो. पण आपण कसेही असलो तरी रामत्वाच्या मुद्यावर इतरांच्या बरोबरीने जीवितातील सुखसोयी व अधिकार आपल्याला लाभले पाहिजेत. असा हक्क जगातील लोक सांगू लागले आहेत. म्हणजे कर्तृत्त्व एकाचे, शहाणपण, क्लृप्ती, प्रतिभा ही एकाची आणि ज्याच्या अंगी या गोष्टींचा मागमूसही उत्पन्न व्हावयास अजून बराच अवधी आहे तो या सामर्थ्याच्या कर्तृत्त्वातून निष्पन्न होणारे सर्व लाभ आणि भोग त्याच्या बरोबरीने भोगू इच्छितो. समत्त्वाचा हा अर्थ जगात रुढ होऊ पहात आहे आणि त्यातूनच जगात अनेक वाद सध्या चालू होत आहेत.

अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि काही अंशी आशिया येथील निरनिराळ्या वादांकडे थोडे बारकाईने पहावे. म्हणजे भौतिकशास्त्रांनी सक्रिय बनवलेली भूतदया मनाशी बाळगून, समर्थ लोकांनी आपण होऊन केलेल्या घोषणा त्यांच्या अंगलट येत आहेत असे दिसून येईल. निग्रो लोकांची गुलामगिरीची स्थिती पाहून लिंकनचा त्वेष उत्पन्न व्हावा आणि गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकण्यासाठी त्याने स्वकीयांशीसुद्धा जोराचा लढा करावा. हे पाहून मन अगदी प्रसन्न होते. लक्षावधी लोक पशुकोटीतून आपल्या मूळ मानवकोटीत येऊन बसलेले पाहून आपल्या अंगातील मानवता खरोखर आनंदित होते. पण सध्या अमेरिकेत चाललेला लढा

पाहिला म्हणजे 'गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे' या घोषणेला 'समत्व आणि बंधुभाव' या घोषणेचे वैभव प्राप्त झाले पाहिजे असा दावा निग्रो लोक सांगत आहे असे दिसेल आणि या दाव्यातूनच अमेरिकन जीविताला कुरतडणारे अनेक जटिल प्रश्न उत्पन्न होत आहेत.

**सारांश :**

**समानत्वाच्या घोषणेचा जाच**

हल्लीच्या समानत्वाच्या घोषणांमुळे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेपणा हा हक्क समजून त्याच्या भांडवलावर समत्वाच्या मुद्यावर इतरांच्या बरोबरीने सुखसोयी व अधिकारांची मागणी होत आहे. स्वतःचे काहीच कर्तृत्त्व नसता दुसऱ्यांच्या कर्तृत्त्वात वाटा मागणे या समत्त्वाच्या नवीन अर्थामुळे अनेक वाद निर्माण झाले आहेत. भूतदयेच्या पोटी समर्थ लोकांनी स्वतःच केलेल्या घोषणा त्यांच्या अंगलट येत आहेत. हे निरनिराळ्या देशांमधील वादांवरुन लक्षात येईल. लिंकनने मानवतेच्या प्रेमापायी गुलामगिरी नष्ट केली. पण आता निग्रोच्या समत्व आणि बंधुभाव यांच्या मागणीने अमेरिकन जीवनात अनेक प्रश्न उत्पन्न होत आहेत.

एका व्यवसायातल्या मंडळींनी एकत्र जमावं, विचारविनिमय करावा ही गोष्ट काही अयोग्य आहे. सं सरकारचं मत नाही. कारण कारखानदार आणि व्यापाऱ्यांच्या महासंघाच्या मेळाव्याला स्वतः पंतप्रधानच अध्यक्ष म्हणून हजर राहतात.

**नमुना क्र. ५**

आपल्या राज्यात व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात अद्याप का होऊ शकत नाही आणि तो वापर करावयाचा झाल्यास मराठी भाषा ही अर्थव्यवहारात आणि वाणिज्य क्षेत्रात कितपत सुलभतेने वापरता येईल ह्या प्रश्नासंबंधी अजूनही विवेचन करण्याची वेळ आपल्यावर येते. जगात औद्योगिकदृष्ट्या जे समृद्ध आणि प्रगत झालेले देश आहेत त्या देशांमध्ये त्या त्या लोकांची मातृभाषा अभिमानाने आणि सुलभतेने औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात वापरली जाते. आणि त्यामुळे साहजिकच विश्वविद्यालयीन क्षेत्रात वाणिज्य आणि औद्योगिक विद्याशाखांमधून त्या त्या देशातील मातृभाषेचा सुलभतेने आणि आवर्जून वापर केला जातो. पश्चिम जर्मनी आणि जपानमधील औद्योगिक व्यवहाराची पाहणी करण्याकरिता गेलेल्या एका संशोधकाला तेथील अधिकाऱ्यांशी आणि कामगारांशी इंग्रजीतून बोलणे अशक्य आहे, असे आढळून आले. कारण तेथील बहुतेकांना इंग्रजी फारसे येत नव्हते आणि त्यांचा सर्व व्यवहार जपानी भाषेतून होत होता. हा दाखला देण्याचे कारण इतकेच की राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उद्योग आणि व्यापार वाढवावयाचा असल्यास इंग्रजी भाषेचा वापर अपरिहार्य आहे आणि याउलट मराठी भाषा ही एक अडचण होऊन बसेल अशी जी एक समजूत आहे ती चुकीची आहे.

उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रात - म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारात आणि त्यामुळे आपोआपच पर्यायाने विश्वविद्यालयीन वाणिज्य अध्यापनात - मराठी माध्यमाचा वापर करता येणे शक्य आहे का याचे उत्तर 'होय' असेच ठामपणे देता येण्यासारखे आहे. केवळ मराठी भाषेचा आपणास अभिमान आहे म्हणून 'होय' असे उत्तर आहे असे नव्हे. जिथे जिथे प्रयत्नपूर्वक आर्थिक व्यवहारात आणि विश्वविद्यालयीन वाणिज्य शाखेत मराठीचा आजपर्यंत ज्यांनी वापर केला, त्यांना आपली मराठी भाषा ही त्या दृष्टीने वापर आणि विकास करण्यास अतिशय समृद्ध आहे असे आढळून आले.

**सारांश :**

**उद्योगक्षेत्रात मराठीचा वापर**

राज्यात व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत मराठीचा वापर का होत नाही आणि केल्यास सुलभतेने होईल का याची अद्यापही चर्चा करावी लागते. प्रगत देशांत व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रात मातृभाषेचा अभिमानाने व सुलभतेने वापर होतो. साहजिकच त्यांच्या विद्यापीठांतूनही ती आवर्जुन वापरतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्यापार वाढीसाठी इंग्रजी अपरिहार्य आहे आणि मराठी अडचणीची आहे ही समजूत चुकीची आहे. हे जपानमध्ये व्यापार व्यवहारात जपानीचाच वापर होतो यावरुन कळेल. प्रत्यक्ष व्यवहारात व साहजिकच विश्वविद्यालयीन वाणिज्य अध्यापनात मराठीचा वापर शक्य आहे. कारण अनुभव असे सांगतो की मराठीच्या अंगी असे सामर्थ्य आहे.

**नमुना क्र. ६**

महाराष्ट्र राज्यातील जी नियतकालिके- म्हणजे दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके वगैरे - युद्धापूर्वीच्या काळात भरभराटीत होती, ती युद्ध काळात तशीच राहिली नाहीत आणि युद्धोत्तर काळात तर पुष्कळच उलथापालथी होत आहेत. पहिलाच वाचकवर्ग पुढे राहिलेला नाही. नव्या वाचक वर्गाच्या आकांक्षा निराळ्या, अभिरुची निराळी, त्याच्या ज्ञानाचे स्वरुपही निराळेच. त्या सर्वाचा विचार करुन जी वृत्तपत्रे आपले धोरण आखतील, त्यांनाच यश मिळण्याचा संभव परक्या ब्रिटिश सत्तेशी संग्राम हा एकच विषय गेल्या स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदी पुढाऱ्यांपुढे प्रामुख्याने होता. त्या पुढाऱ्यांनी सरकारी अन्यायाचे निर्दालन व जनतेची जागृती करण्यासाठी जसे व्याख्यानाचे दौरे काढले, तसेच वृत्तपत्रांत लेखही लिहिले. बहुतेक देशभक्त संपादक होते. आणि बहुतेक संपादक देशभक्त होते. संपादकीय व्यवसाय हा तेव्हा धंदा नव्हता- धर्म होता; ध्येयाची साधना होती. सत्तीचे वाण होता. हजारो रुपयांचे जामीन भरुन, वारंवार खडतर तुरुंगवास सोसून पण जनतेची दुःखे वेशीवर टांगण्याचे धारिष्ट्य करणारे कैक संपादक हिंदुस्थानात निपजले. महाराष्ट्रातही निपजले, श्रीमान् अरविंद बोस यांचे 'वन्दे मातरंम', मोतीलाल घोष यांचे 'अमृतबझार पत्रिका', कै. लाला लजपतराय यांचे 'पीपल' पालबाबूंचे 'न्यू इंडिया' किंवा लो. टिळकांचा 'केसरी' व प्रो. शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' ही नुसती नावे आठवली म्हणजे वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा आहे की धर्म आहे हे कोडे सहज उलगडण्यासारखे आहे. 'यंग इंडिया' ने तर गांधीजींच्या स्वातंत्र्य-संग्रामाचे वारे स्वदेशात व परदेशात किती खेळवले हे इतिहास प्रसिद्धच आहे. ज्याला गडगंज संपत्ती कमवावयाची आहे.

**नमुना क्र. ७**

व्याकरण हा लेखनातील महत्त्वाचा भाग आहे. अतिपरिचयाचा आहे असे म्हटले तरीही चालेल. व्याकरण हा शब्द उच्चारला आणि ज्याच्या कपाळाला आठ्या पडल्या नाहीत किंवा डोके ठणकायला लागले नाही असा माणूस विरळा, व्याकरणाचे काटेरी कुंपण ओलांडल्याशिवाय साहित्याचा नंदनवनात प्रवेश करता येत नाही, निदान परभाषांतल्या साहित्याचा रसास्वाद हे दिव्य पार पाडल्यावाचून घेता येणार नाही अशी मान्यता आहे. 'ब्रह्मपदी' नाचण्यासाठी लोखंडाचे चणे खावे लागतात. भाषाप्रभुत्वासाठी खायचे लोखंडाचे चणे म्हणजे व्याकरण असेही पुष्कळांना वाटे, ते चावणे आणि पचवणे ही गोष्ट बहुतेक लोकांना इतकी कठीण वाटते की, त्यापेक्षा 'नको ती नवी' भाषा असे म्हणण्याइतकी या विषयाची धास्ती ते घेतात.

व्याकरणा शिवाय परभाषा येणार नाही ही समजूत तर आहेच, पण स्वभाषेवरील प्रभुत्वालाही 'शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे' याचे नियम आलेच पाहिजेत असेही मानणारे असंख्य लोक आहेत. आपण बोलतो त्या भाषेच्या स्वरुपापेक्षा आणि माहितीपेक्षा व्याकरण हे काही विशेष वेगळे आहे, असे मानले जाते. जोडे घालून देवळात जाता येणार नाही, त्याचप्रमाणे बोलायची भाषा साहित्यात वापरुन चालणार नाही, असा एक जवळ जवळ सर्वसामान्य समज आहे. म्हणजे आपणाकडे रुढ असणाऱ्या 'व्याकरण' या शब्दाचा अर्थ 'लिहिण्याचा भाषेचे नियम' असा करायला हवा. 'शुद्ध कसे बोलावे' हा विषय या व्याकरणाच्या कक्षेत येऊ शकत नाही.

ही लिहिण्याची भाषा बोलभाषेपेक्षा अनेक प्रकारे वेगळी असू शकेल. व्यवहारात वापरले न जाणारे शब्द तिच्यात असतील आणि व्यवहारात मान्यता मिळालेल्या अनेक शब्दांना तिच्यात मज्जाव असेल, तिच्यातली कित्येक रुप व्यवहारात आणि संदर्भात वापरल्या जाणाऱ्या रुपांपेक्षा वेगळी असतील, तिच्यातली वाक्यरचना आणि प्रयोग आपल्या बोलण्यात आढळणात नाहीत, आणि सरतेशेवटी ज्या लिपीचा उपयोग करुन ही भाषा लिहिली जाते त्या लिपीने दर्शविले जाणारे काही ध्वनी बोलण्यात नसतील तर बोलण्यात रुढ असलेल्या काही ध्वनींना त्या लिपीत स्वतंत्र चिन्हे नसतील. व्याकरणाबद्दल सामान्य माणसाला जो दरारा वाटतो तो बोलभाषा आणि लेखभाषा यांच्यातल्या अंतरामुळेच.

**नमुना क्र. ८**

इंग्रजांच्या जुलमी राजकारभारातून देश मुक्त करणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग होता तरी तो अंतिम कधीच नव्हता. स्वातंत्र्य हवे असते ते कोणासाठी? कशासाठी? या स्वातंत्र्याचा प्रकाश कुठेकुठे पसरणार होता? ज्यांच्या आयुष्यात अंधाराशिवाय काही उगवलेच नाही, त्यांच्यासाठी ही ज्योत लागणार होती का? इंग्रजांच्या, पेशव्यांच्या आणि त्यांच्याही आधीच्या अनेक राज्यसत्तांच्या वेळी, जे आणि जशा स्वरुपात होते; त्याच रुपात ते असूनही, बदल घडण्याची शक्यता कशी स्वीकारणार? ज्या धर्मश्रद्धांनी, चालीरीतींनी, रुढीरिवाजांनी, कर्मकांडांनी दैव-नियतिवादांनी, जन्म-पुनर्जन्मांनी व तथाकथित महाकवींनी मानव हतबल. पराभूत आणि मातीमोल केला होता. त्या उपलब्ध घटितांबद्दल ह्या नव्या स्वातंत्र्याची भूमिका काय करणार होती? त्यातला उच्चाराचा भाग, आचाराचा भाग आणि फलश्रुती यांचे प्रमाण तरी कसे ठरणार होते? आहे त्या अवस्थेत हे स्वीकारुन, जागतिक क्षेत्रात मानवी प्रतिष्ठा उंचावणे शक्यच नव्हते. म्हणूनच ह्या गोष्टींवर श्रद्धा ठेवणारे, निष्ठा दाखविणारे, बुद्धिमंत, विचारवंत आणि राज्यकर्ते व त्यांचे अंतस्थ हेतू पारखून तपासून घेण्याची स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच खरीखुरी गरज निर्माण झाली आणि क्रांतीचे विचार रुजू लागले.

देशाला स्वातंत्र्याची गरज असते सर्वांगिण उन्नतीसाठी. सामाजिक परिवर्तनासाठी हा लढा लढविला गेला. त्याची हमी दिली गेली. माणसाचा मूलभूत हक्क म्हणून स्वातंत्र्य हवे असते. जन्मजात अधिकार लाभण्यासाठी आणि ते उपभोगण्यासाठी ते मिळवायचे असते. समाजातील सर्व घटकांना आणि स्तरांना एकसंघ अंतर्गत सुसंघटनेचा आणि भक्कम इहवादाचा पाया, समान पातळीवर प्राप्त करुन देण्याचे कार्य स्वातंत्र्याने पार पाडायचे असते. आणि हे जर होत नसेल, घडत नसेल, तर स्वातंत्र्य आणि परचक्र ह्या गोष्टी भिन्न मानण्याचेही कारण नाही.

## नमुना नं. १

लतावृक्ष्यांनी आणि पशुपक्षांनी बहरुन गेलेल्या निसर्गदेवतेच्या कुशीत पडलेल माझ ते चिमुकल गाव चंपानगर! चकोर, चातक, कोकिळा भारद्वाज आणि सारंग अशा असंख्य पक्षिराजांच्या मधुर कलकलाटानं भल्या पहाटे जाग होणार गायीच्या हुंबरठ्याबरोबर सकाळी रोजच्या कामाला लागणार. दोन प्रहराच्या रणरणत्या वेळी कादंवाच्या गर्द गार छायेत निवांतपण विसावणार. घटांच्या तालबद्ध आवाजासह गायी बरोबर संध्याकाळी धुळीचे लोळ उडवीत परतणार आणि रात्री गंगा मातेच्या किनाऱ्यावरुन येणाऱ्या मंद शितल वायू लहरी अंगावर पांघरुन एखाद्या निरागस अर्भका सारखे शांत झोपी जाणार या चंपानगरीत माझ ते रम्य बालपण गेल! हो अक्षरक्षा गेलंच धनुष्यातून एकदा सुटलेल्या बाणासारखं ते कधीच पुन्हा माझ्याकडं परतून काही आलं नाही.

पण त्याच्या नुसत्या स्मृतीनंच गंगामातेच क्षितिजार्पंत पसरलेलं विस्तीर्ण पात्र माझ्या डोळ्यासमोर उभं आहे. पांढरट निळ्या पाण्याच ते क्षितिजापर्यंत पसरलेल अफाट साम्राज्य त्यातल्या पाण्याच्या बिंदू बिंदूला माझा दाट परिचय आहे. याच गंगामातेच्या काही पसरलेल्या ओलसर वाळूच्या मऊ मऊ पाठीवर धावताना माझी निर्भड चिमुकली पावलं उमटली आहेत. या इथल्या अवखळ वायू लहरी मी अंगावर लपेटीत असलेलं माझ उत्तरीय अनेक वेळा खट्याळपणान उडवू लावलं आहे. आणि म्हणूनच चंपानगरीच्या आठवणी बरोबरच मी बालपणी पाहिलेली या कडेपासून त्या कडेपर्यंत पसरलेली गंगामाता माझ्या डोळ्यासमोर उभी राहते.

बालपण हे नेहमीच रथासारख वाटत आलं आहे. मुक्त आणि अनिर्बंध कल्पनांचे घोडे जोडलेला एक स्थैर रथ असावा अस दुरवर दिसणारं गंगेच पाणी बरोबर कुठंतरी निळ्याभोर आकाशाला टेकत आहे का? हे पाहण्यासाठी तो रथ तिच्या अगणित लाटावरुन फेरफटका मारुन क्षणात क्षितिजापर्यंतची धाव करुन येई.

**सारांश :**

लतावृक्षांनी आणि पशुपक्ष्यांनी असं बहरुण गेलेल्या देवतांच्या कुशीत असलेल चंपानगर हे गाव असंख्य पशुपक्षी तिचे आहेत. गर्द गार छायेत निवांतपण विसावणार थरांच्या तालबद्ध आवाजासह, गायी बरोबर धुळीचे लोळ उडवीत परतणार आणि रात्री वायूलहरी अंगावर पांघरुन एखाद्या निरागस अर्थकासारख शांत झोपी जाणारं माझ बालपण गेल. गंगामातेच्या काठी पसरलेल्या ओलसर वाळूच्या मऊ मऊ पाठीवर धावताना माझी निर्भिड चिमुकली पावलं उमटली आहेत. चंपानगरीच्या आठवणी बरोबर पाहिलेली या कडेपासून त्या कडेपर्यंत पसरलेली गंगा माता माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. बालपण हे नेहमीच रथासारख वाटत आल आहे.

**प्रश्न :**

१) बालपणाला कोणती उपमा दिली आहे?
२) लेखिकेच्या मते चंपानगर गाव कस आहे?
३) या उताऱ्यामध्ये कोणत्या नदीचा उल्लेख आलेला आहे?
४) लेखिकेच्या डोळ्यासमोर काय राहत?

## नमुना नं. १०

सर्वांगीण विचार म्हणजे सर्जनशील विचार करण्याची क्षमता किंवा मर्यादे पलिकडे विचार करण्याची क्षमता. ही संज्ञा सर्वप्रथम एडवर्ड बोनो या तज्ज्ञाने १९६७ मध्य वापरात आणली. सर्जनशीलता किंवा नाविण्याच्या दृष्टीने विचार या पद्धतीत केला जातो.

व्यवसायामध्ये समस्येवर मात करण्यासाठी किंवा अशक्यप्राय बाबी साध्य करण्यासाठी वेगळ्या दृष्टीने विचार करुन किंवा तुमच्या स्फुर्ती किंवा कल्पनेने समस्या सोडविण्यासाठी ह्या संकल्पनेचा उपयोग होतो.

सर्जनशील विचारामध्ये स्पष्टपणा सोडून देणे. पारंपारिक विचार पद्धतीचा त्याग करणे आणि मनातील अगोदरच्या कल्पनांचा विचार काढून टाकणे इ. समावेश होतो. जाहिरात विपणन माध्यमे, डिझाईन इ. क्षेत्रात करिअर करण्यासाठी सर्जनशीलतेची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. नवीन कल्पना शोधणे म्हणजे सर्जनशीलता होय.

सर्वसाधारण बाबीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. विचारशक्ती प्रगल्भ होते. जुन्या संकल्पना सोडून नवीन संकल्पनांचा स्वीकार करणे म्हणजे सर्जनशीलता होय. सर्जनशीलता ही लंबरुप विचारशक्ती व पारंपारिक विचार शक्तीपेक्षा वेगळी आहे. लंबरुप विचार शक्तीमध्ये टप्प्याटप्याने पुढे जातात. सर्जनशीलता लंबरुप विचारशक्तीला पर्याय होवू शकत नाही. कारण सर्जनशीलतामध्ये दोन्हीचा समावेश असतो. सर्जनशीलता नवनिर्मिती करणारी असते.

लंबरुप विचारशक्ती निवडक बाबींचाच विचार करते. एडवर्ड बोनो यांच्या मते सर्जनशीलता मनाची सवय आणि मनाचा दृष्टीकोन होय. अशी विचार करण्याची पद्धती म्हणजे सर्जनशीलता.

**सारांश :**

सर्वांगीण विचार करणे म्हणजे सर्जनशीलता किंवा विचार करण्याची क्षमता किंवा मर्यादेपलिकडे विचार करणे होय. ही संज्ञा सर्वप्रथम एडवर्ड बोनो या तज्ज्ञाने सन १९६७ साली वापरात आणली.

कोणत्याही समस्येवर मात करण्यासाठी अशक्य बाबी साध्य करण्यासाठी स्फुर्तीने कल्पकतेने, कल्पनेने समस्या सोडवण्यासाठी सर्जनशीलता महत्त्वपूर्ण आहे. जाहिरात, विपणन, माध्यमे आणि डिझाईन इ. क्षेत्रात करीअर करण्यासाठी ही सर्जनशीलतेची भूमिका महत्त्वाची आहे.

**प्रश्न :**

१) सर्जनशीलता म्हणजे काय ?
२) सर्जनशीलताचा वापर कोणत्या क्षेत्रात करिअरसाठी जास्त होतो ?
३) सर्जनशीलतेचा विचार कोणत्या तज्ज्ञाने मांडला ?
४) सर्जनशीलता ही संज्ञा कोणत्या साली अस्तित्वात आली ?

munotes.in

## नमुना नं. ११

भारताचा बहुतेक भाग हा अजुनही अशिक्षित, निरक्षर, गरिब, शिक्षणापासून वंचित आहे. भारताच्या बहुतेक राज्यामध्ये कित्येक स्त्रिया आपल्याला मुलगा झाल्यावरच आपले जीवन परिपूर्ण झाले असे मानतात. कित्येक स्त्रिया मुली होण्यापेक्षा मुलच नको असेही मानतात. या बाबतीत समाजात असंख्य गैरसमज आढळून येतात. याला वरील कारण कारणीभूत आहेत. या गैसमजुती गरिबी, अशिक्षतता, हुंडा वगैरे कारणामुळे निर्माण होतात. मुलगा व मुलगी यांच्या मध्ये असलेल्या भेदभावामुळे स्त्रिया सुद्धा आपल्याला मुलगी नकोच या मताच्या बनत चाललेल्या आहेत.

त्यांना असे वाटते की जे आपल्या वाट्याला आले तसे आपल्या मुलीच्या वाट्याला न येवो. असा स्त्रिया विचार करतात.

सोनोग्राफी खरेतर बालकांचे रोग किंवा इतर काही दोष आहेत का हे पाहण्यासाठी विकसित केली परंतू या पद्धतीचा वापर बालकाचे लिंग ओळखण्यासाठी केला जावू लागला. आणि त्या स्त्रियांना जास्त मुली असतील अशा स्त्रिया मुलगा आहे किंवा नाही हे पाहू लागल्या. गर्भपात करुन घेऊ लागल्या व या पद्धतीचा गैरवापर सुरु झाला.

समाजात मुलीचे नगण्य स्थान व सोनोग्राफीचा वापर वाढल्याने दर १००० पुरुषामागे ९४५ स्त्रियांचे प्रमाण १९९१ साली होते. ते २००१ साली ९२७ इतके झाले. केरळ मध्ये मात्र स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे.

भारतामध्ये गर्भपाताची संख्या प्रतिवर्षी २०,००० इतकी झाली आहे. यावर उपाय म्हणून अनेक योजनांची निर्मिती झाली तसेच १३ फेब्रुवारी २००३ रोजी प्रसुतिपूर्ण लिंग निदान चाचणी कायदा अमलात आणला. हा कायदा सोनोग्राफीचा गैरवापर टाळण्यासाठी केला गेला. या कायद्यानुसार या कायद्याचे उलंघन करणाऱ्यास ३ वर्षे कारावास व १०,००० रु. पर्यंत दंड. कोणी या कामासाठी मदत करेल त्यालाही ३ वर्षे तुरुंगवास व ५०,००० दंड. महाराष्ट्रामध्ये भृणहत्या बंदी कायदा संमत झाला आहे.

**सारांश :**

समाजातील मुली आणि मुले यामधील गैरसमजुती दुर करण्यासाठी समाजामधील दारिद्र्य, हुंडा, अशिक्षितता रुढी परंपरा ह्या दूर करव्या लागतील. कारण या कारणामुळे महिला मुलीला टाळतात. आणि सोनोग्राफी सारखे तंत्र ह्याचा वापर मुलींचे प्रमाण घटण्यास कारणीभुत ठरते. याचा वापर बाळाला रोग किंवा दोष पाहण्यासाठी अंमलात, विकसित केला आहे पण त्याचा वापर लिंग ओळखण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे मुलींना जन्माअगोदरच मारुन टाकतात. त्यामुळे १००० पुरुषामागे ९४५ स्त्रिया १९९१ होत्या. ते प्रमाण २००१ मध्ये ९२७ असे झाले.

यावर उपाय म्हणून २००३ रोजी प्रसुतीपूर्व लिंग निदान चाचणी कायदा केला. तसेच भृणहत्या बंदी कायदा. लिंगनिदान चाचणी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास ३ वर्षे कारावास १०,००० पर्यंत दंड

munotes.in

**प्रश्न :**

१) मुलीचे प्रमाण घटण्यामागे कोणती कारणे आहेत ?
२) सोनोग्राफीचा मुख्य उद्देश कोणता ?
३) लिंगनिदान कायदा कोणत्या साली केला गेला ?
४) प्रसुतिपूर्व लिंगनिदान कायद्याचे उल्लंघन कोणती शिक्षा भोगावी लागते ?

## नमुना नं. १२

आक्कान अनेक वेळा सांगितलेली तिळाची गोष्ट मला आठवायची अधूनमधून. आक्काच्या बोलण्यातच नव्हे तर त्यांच्या व्यवहारातही तीळ यायचा ती तिळाला चिकटून बसायची आणि मी सुटका करुन घेण्याचा प्रयत्न करायचो. एकदा मी माझ्या मुलाला भारी किंमतीची पँट आणली तेव्हा ती म्हणाली कशाला भारी घ्यायची एवढी ? माझी गावाकडची नातवंड बघ किती साधी राहतात. त्यांचा बाप तुझ्यासारखा मिळवता नाही ना.

आक्काचं हे बोलणं बरच काही सांगून शिकवून जायचं. मी भावाच्या मुलांचाही विचार करायचो अधूनमधून पण सातत्यानं विचार करण्यास मला माझा अर्थसंकल्पही मान्यता देत नव्हता. एकदा मित्र आले होते. जेवणाचा बेत केला होता त्यांच्यासाठी दीड किलो मटण आणलं. हातातली कॅरीबॅग बघुन आक्कान विचारल, किती आणलंस मटण ! मि म्हणालो दीड किलो.

यावर तिचा लगेच प्रश्न एवढं मटण खावून आतड काय सोन्याच होत ? जास्त खाल्यावर पचायला कठीण जात.

अक्काचा प्रश्न खटकायचा मला ती काहीच करु देत नाही ? मुलाला कपडे आणू देत नाही मटण खावू देत नाही. आंब्याच्या हंगामात ही आंबे किती घ्यायचे हे तिच ठरवत असे. पोराला चॉकलेट किती रुपयाचं घेतल हेही विचारते. अनेकवेळा मला राग यायचा.

यावर ती म्हणाली, तुझ्या लहानपणी आपणं दोघं रोजगाराला गेलो आणि दिवसभर राबलो तर फक्त चार पाच रुपये मिळायचे. इथ तुझा पोरगा तर दहा रुपयांच्या चॉकलेटच्या एकच घास करतो तुला मागचं दिवस कसं नाही आठवत.

**सारांश :**

आक्का तिच्या भावाला तिळाची गोष्ट सांगायची. तिला तिळाची सारखी आठवण यायची. तसे ती व्यवहारातही तिळाचा वापर करते. भाऊ किंमतीची पॅन्ट घेवून येतो, तेव्हा आक्का म्हणते कि एवढ्या किंमतीची पॅन्ट कशाला आणली आणि तेव्हा ति गावाकडील माझी नातवंड बघ कशी साधी राहतात सांगते कारण त्यांचा बाप जास्त मिळवता नाही ना. आक्काच बोलण खूप काही सांगून आणि शिकवून जायचं. अक्काचा प्रश्न अनेकदा खटकायचा मला ती काहीच आणू देत नसे.

सांगायची तुझ्या लहानपणी आपण दोघ रोजगाराला गेलो. दिवसभर राबलो तर फक्त चार पाच रुपये मिळायचे तुला मागच दिवस कस नाही आठवत.

## नमुना नं. १३

हा स्वराचा राजहंस कुठल्या बेशुद्धीचे गाणे गात राहिलाय? डोलणारा मोठाच भाग्यवान! डोलणाराही हटत नाही आणि गाणाराही हटत नाही. अशी मैफील रंगलीय आणि उभा महाराष्ट्र, देशोदेशीछे रसिक त्या बेशुद्धीच्या गाण्याची तंद्री मोडण्यासाठी, तंद्री मोडलेली डोलण्यासाठी जिवाचे कान करुन प्रतिक्षा करताहेत. कुठल्याही क्षणाला ती बेशुद्धीची तंद्री मोडेल, आमचे बालगंधर्व पुन्हा आमच्यात त्या भागमग्न चेहऱ्याने पुन्हा येतील. आजही ते आमच्यातच आहेत, पण एखाद्या विसरभोळ्या कलावंतासारखे बेशुद्धीच्या गाण्याचे सुर आळवीत पडून आहेत. खडा मारायचाच झाला तर हे वाक्य जसं ते पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या रंगांनी भावनात्मक करीत, बघितलेले सांगतात, मोठ्या आत्मीयतेने सांगतात. अहो हे बघितलेले लोक केवळ सांगतात असं नव्हे ते प्रत्यक्ष त्या काळचा तो रंगमंचांचा सुवर्णकाळ डोळ्यासमोर उभा करतात. ते पटकन बोलून जातात हे एकच वाक्य... हे एक वाक्य बालगंधर्वानी बोलत राहावं, काय या वाक्याला मजा देतात ते, अहाहा! मला वाटतं ही बेशुद्धीची मैफल त्याच तंद्रीत ते रंगवताहेत. छे छे रंगवताहेत नव्हे, मैफल अशी दाटगच्च भरलीय, धुपाचा वास दरवळतोय, प्रत्येक गाण्याची आलाप सगळ्या जगातल्या उत्तमोत्तम परिमतांनी भरुन गेलीय. त्या मैफीलीत स्वराच्या धारा ओसंडताहेत. अंगे भिजली स्वरधारांनी जो कुणी भाग्यवान रसिक त्यांच्या बेशुद्धीच्या डोळ्यांसमोर बसलेला असेल तो असा त्या स्वरांनी भिजून गेला असेल. बालगंधर्व त्याला विचारीत असतील का? पण या कलावंताच्या तो स्वभावच नव्हे. किती डोलणार. हा प्रश्नच त्यांच्या मनात येणार नाही. कधीच ही शंकासुद्धा डोकावणार नाही. किती डोलणार? छे! डोला किती ते! गाणे ऐका! पोट भरुन डोळा देवा! आणि मला वाटते आज प्रत्यक्ष त्यांच्या या मैफीलीचा रसिक पाहुणा तो देवच असावा.

कोणा एका कवीने म्हटले आहे की, घड्याळाची जी टिक् टिक् चालते ती भविष्य काळाच्या खडकाला बसत असलेले छिन्नीचे बारीक बारीक घावच होत. ही छिन्नी अखंड चालू असते आणि भविष्यकाळाचा हा हा म्हणता भूतकाळ बनून जातो. आपण भूत, वर्तमान आणि भविष्य अशी तीन काळाची नावे सांगतो. पण या तिन्हीपैकी मधल्या काळाची रेषा म्हणजे व्याप्ती अत्यंत निरुंद असते. भूतकाळाचे परटोक कोणी ही पाहिलेले नाही आणि भविष्य काळाचे परटोकही कोणाला दिसेल असे वाटत नाही. पण पुढून धावत येऊन भविष्यकाळ भूतात विलीन होत असतो आणि हे विलीनकरण व्हावयास जेवढा थोडासा वेळ लागतो. तेवढ्यालाच वर्तमान काळ हे नाव आहे. एखाद्या प्रचंड धबधब्याचे चित्र डोळ्यांपुढे आणावे. पर्वताच्या विस्तीर्ण पठारावर पसरलेला आणि फेसाळणारा पाण्याचा प्रवाह डोंगरावरुन खाली कोसळतो आणि मग खालच्या खडकांतून तो धावत सुटला. म्हणजे तो भूत होतो, पण त्याला कोसळायला जेवढा थोडासा अवधी लागतो, तेवढाच वर्तमान बनतो. अशी लक्षावधी वर्षे मागे गेलेली असल्यामुळे त्यात काय आहे, हे पाहण्याची इच्छा मानवला आपोआपच होते आणि त्याहीपेक्षा त्यात ठेवून घेण्यासारखे काय आहे, हे पाहून घेण्याची इच्छा तर केवळ अनावरच असते.

**सारांश :**

कायदा पाळा गतीचा...

वर्तमान, भूत आणि भविष्य हे मानवी जीवनातील तीन प्रमुख काळ होत. काळ इतक्या वेगानं धावत असतो की, भविष्यकाळ पुढून येऊन भूतात केव्हा विलीन होतो, हे समजतही नाही. या विलीनीकरणास जेवढा थोडा वेळ लागतो त्यालाच वर्तमानकाळ म्हणतात. त्याची व्याप्ती ही अतिशय अरुंद असते. भविष्य आणि भूताची टोक दिसत नसल्याने त्या अज्ञानात डोकावण्याची

व विशेषतः भूतकाळातील कोणत्या गोष्टी वर्तमानात ठेवून घेण्यासारख्या आहेत ? हे जाणण्याची मानवी मनाला अनिवार इच्छा असते.

**नमुना क्र. १४**

लोकमान्य आणि महात्माजी यांच्याविषयी वाटणाऱ्या अलोट भक्तीचे कारण त्यांच्या निष्कलंक चारित्र्यात व अपरंपार त्यागात आहे. भारतीय जनता हे काम पावित्र्याचे थर्मामीटर लावून सर्वांस बघते. त्यागाचे थर्मामीटर लावून सर्वांस बघते. या दोन्ही कसोटीत जो उतरला, त्याचे वेड तिला लागते. त्या महापुरुषाला ती डोक्यावर घेऊन नाचेल.

लोकांच्या मनावर हे दोन गुण ठसविण्यासाठी या भारत वर्षात अपरंपार त्याग भरलेला आहे. पावित्र्याची शंका येताच राम सीतेचा त्याग करतो. आपल्या पावित्र्याचा भंग होईल. या भीतीने रजपूत रमनी जीवनाच्या होळ्या पेटवीत. पतिमरणानंतर आपल्याला तनमनधनाने पवित्र राहता येईल की नाही. या शंकेने स्त्रिया पतिबरोबर हसत हसत चितेवर चढत व ज्वालांना मिठी मारीत...! ती ज्वालांना मिठी नसून पावित्र्याला मिठी होती! सूरदासीचे कमळासारखे कमनीय डोळे पाहून एका स्त्रीच्या मनात वासना निर्माण झाली. हे सूरदासांना कळताच त्यांनी आपले डोळे कापून काढले!

राम राजा होता. त्याचे उदाहरण जनता डोळ्यासमोर ठेवणार. यथा राजा तथा प्रजा ही म्हणच आहे. म्हणूनच राजावर अपार जबाबदारी आहे. भारत वर्षातील पुढाऱ्यांनी हे राजाचे उदाहरण कधी विसरता कामा नये. रामाने पराकाष्ठा गाठली ध्येयाच्या पावित्र्यासाठी लोकांची पावित्र्यावरची श्रद्धा अविचल राहावी म्हणून असा त्याग जनता राहील व पाहीलही. तेव्हाच त्या पावित्र्याची महती थोडी थोडी बहुजन समाजाला कळेल एरव्ही नव्हे.

**सारांश :**

पावित्र्याची मंहती

त्याग आणि चारित्र्य या कसोटीवर मोठेपणा पारखला जातो. महात्माजी आणि लोकमान्य टिळकांच्या मोठेपणाचं रहस्य मुख्यतः हेच होय. लोकांच्या मनात हे गुण ठसविण्यासाठी प्राचीन ग्रंथामध्ये त्यांचा उदोउदो केला आहे. रामसीतेचा त्याग रजपूत रमणी किंवा सूरदास यांच्या चारित्र्यावरुन पावित्र्याची महती कळते. असा त्याग जेव्हा जनता पाहील तेव्हाच पावित्र्याची महती जनतेला पटेल व तिची पावित्र्यावरील श्रद्धा ढळणार नाही.

**नमुना क्र. १५**

माणसानं ओठाशी नेलेला अमृताचा प्याला नियतीला अनेकदा पाहवत नाही. एखाद्या चेटकीणीसारखी ती अचानक प्रकट होते. आणि क्षणार्धात त्याला भोवतालच्या धुळीत उडवून देते. विश्वाच्या त्या विराट चक्रात मानवाचे स्थान काय ?

या जगात दुःख मनुष्याच्या पाचवीला पुजलेले आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात ते निरनिराळी रुप घेऊन येत. स्वप्नभंग हा माणसाचा कायमचा सोबती आहे. पण माणसाचे मोठेपण आपल्या वाट्याला आलेलं सारं दुःख साधून नवीन स्वप्न पाहण्यात आहे. हालहाल पचवून अमृताचा शोध घेण्यात आहे. भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून, पचवून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही. मानवाचं मन केवळ भूतकाळाच्या साखळदंडानी करकचून बांधून ठेवता

येत नाही त्याला भविष्याच्या गरुड पंखाचे वरदानही लाभलेले आहे. एखादं स्वप्न पाहणे, ते फुलविणे ते सत्यसृष्टीत उतरावे म्हणून धडपडावे त्या धडपडीला आनंद लुटणे आणि दुर्देवाने ते स्वप्न भंग पावले तरी त्याच्या तुकड्यावरुन रक्ताळलेल्या पायांती दुसऱ्या स्वप्नामागे धावणे हा मानवी मनाचा धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो त्यामुळे.

**सारांश :**

मानवी मनाचा धर्म मनुष्याचे स्थान या विश्वाचा विराट पसाऱ्यात अगदीच नगण्य आहे. माणूस हा रंड घेऊन जन्माला येतो आणि रड ठेवूनच जातो. म्हणजेच जीवनात अपरिहार्य असलेली ही दुःख सहन करुन नवनवीन स्वप्न पाहण्यात मनुष्याचं मोठेपण आहे. किंबहुना स्वप्न पाहणं, ती फुलवणं, सत्याची पुर्तता होण्याचा आटोकाट प्रयत्न करणं, त्या धडपडीला आनंद चाखणं यातच जीवनातला आनंद सामावलेला आहे. त्यामुळेच जीवनाला अर्थ प्राप्त होतो.

**नमुना क्र. १६**

पाली हिलच्या पॉश वस्तीत डॉक्टर शामनी पूर्वीच फ्लॅट घेऊन ठेवला होता. तो त्यांनी निलमसाठी उघडून ठेवला. त्यात उच्च प्रतीचे फर्निचर होतं. फ्लॅटचा हॉल तर एअर कंडीशन्स केलेला होता. हॉलच्या छताला प्रकाशाची झुंबर लटकत होती. डायनिंगरुम, बेडरुम सारी जय्यत तयारी होती. फ्लॅटचं डेकोरेशन छान केलेलं होतं.

निलमनं तो फ्लॅट पाहिला न ती चकित झाली. त्या फ्लॅटमध्ये आणि बसंतराजच्या पेडर रोडच्या फ्लॅटमध्ये बरच साम्य होतं. फक्त त्या फ्लॅटमध्ये बसंतराजची प्रेमळ पित्याची माया मिळाली होती. आता येथे प्रेम मिळणारं होत.

बेडरुममध्ये दोन आरसे होते. ते समोरासमोर होते. एका आरशासमोर उभं राहिलं की दुसऱ्या आरशात प्रतिबिंब दिसायचं. एकच प्रतिबिंब दोन्ही आरशात हालचाल करायचं. मग स्तब्ध व्हायचं. एकमेकांकड टक लावून बघत बसायचं. एका आरशासमोर निलम उभी होती. तिच्या अंगावर तिचा आवडता पंजाबी ड्रेस होता. अंगावर ओढणी नव्हती. ती आपल्या चेहऱ्याचा मेकप पाहत होती. रसदार द्राक्षासारखे तिचे ओठ, त्यावर लिपस्टिकची लाली पसरली होती. तळहात आणि पाय मेहंदीनं रंगलेले होते. त्यात मेंदीची नक्षी गुंतबळ करुन गुंफली होती. पायात पैंजण होती. पाऊल टाकताना त्यांचा नाद उठत होता. त्या आवाजावर ती कबुतराच्या थाटात पावलं टाकत होती. ती रुपगर्विता होती.तशीच मदनिका होती. त्या फ्लॅटमध्ये तिच्या श्वासानं सुगंध उधळत होता. डॉक्टरानी सारा निजामी थाट त्या फ्लॅटमध्ये उधळला होता. त्यांचा दबलेला शृंगार, दबलेली आसक्ती त्या फ्लॅटमध्ये उधळली होती. जे नंदिनीकडून मिळत नव्हतं ते निलमकडून मिळणार होते. नंदिनीचं सोज्वळ रुप त्यांना भावडं वाटत होतं. त्यात खमंगपणा नव्हता. नंदिनी सुंदर होती. शरीरानं पुष्ट होती. पण तिच्यात सेक्स अपिल नव्हतं, आव्हान नव्हतं. याऊलट निलम होती. तिच्यात तुफान होत. वादळ होतं. त्यात ती जवान होती. मुल न झाल्यानं तिच्या शरीराला शेष होता.

प्रस्तुत उताऱ्यात पाली हिलच्या वस्तीतील फ्लॅटचे वर्णन करुन डॉ. शामनी आपली लैंगिक तृप्ती पूर्ण करण्यासाठी आणलेल्या निलम आणि नंदिनी दोघांची तुलना केली आहे. त्यातील निलम ही जवान व तिचा डौलदार बांधा होता. नंदिनी ही त्यांची बायको असली तरी तिच्यात सेक्स अपिल नव्हता त्यामुळे डॉ. शामनी आपली इच्छापुर्ती निलमकडे व्यक्त केली.

## नमुना क्र. १७

दुसऱ्या दिवशी पहिल्याच एसटीने मास्तराचा थोरला मुलगा यशवंत तालक्याच्या गावी जाण्यास निघाला. नदीवरचा पुल ओलांडून तसंच पुढं दीड-दोन मैल गेलं की अरगोळ लागे. तिथे तालक्याहून येणारी रात्रीची शेवटची एसटी वस्तीला लागे. तीच मग दुसरे दिवशी सकाळी सातला सुटे. ती गाठण्यासाठी यशवंत सटक्यानं पावलं उचलीत होता. चालता-चालता मनात भिरभिरतेल तिघारनी राती धरुन नेलंय काय झालं आसंल कचेरीत? मारलं आसलं? तिघांना काल राती धरुन न्हेल्यावर माघारी हलकल्लोळ उसळलेला... बायामान्सांच्या डोळ्यातलं पाणी खळाय् न्हवतं, का कुणाच्या डोळ्याला डोळा लागाय् न्हवता... राती केल्यालं जेवाणबी कुणी बायाय् नव्हतं. सारीच चितागतीत... त्यामुळे भगाटायलाच यशवंताला पिटाळलेलं होतं... संगट सात-आठ भाकऱ्याचं कडाप नि त्यावर भरपेट तेल न कांदा घालून तव्यात परतलेली सुक्की डाळ... माज्या हांट्याच्यानी, राच्चं उपाशी अनोशी चिलटाच्या खोलीत पाडलं आसंल साऱ्यास्नी! म्हणतं आईनं जेवणाचं गटरं बांधल होतं आणि पयली गाडी चुकंल सुट लौकरच म्हणून घरातनं उस्कटललं होतं...

अर्ध्या तासातच वाट सरली आणि अरगोळ आलं. तेव्हा उगवतीला झेंडु फुलल्यागत झालं होतं -सारं लालम् लाल... शाळेपुढील पटांगणात झेंडावंदनाच्या काठीजवळ एसटी थांबलेली. आठ-दहा सिटा येऊन बसलेल्या. काही पटकं नि सासरी नांदाय चाललेली माघारीनही दिसलेली, तिच्यासंगट कानुल्याची दुरडी घेऊन बोलवायला आलेल्या मुराळीही दिसत होता... ड्रायव्हर-कंडक्टर कुठ दिसत नव्हते; तेव्हा ते समोरच्या रेणुका टी हाऊस या वावभर रुंदीच्या बोर्डाचं ओझं डोईवर घेऊन उभ्या असलेल्या कैंबळगती छपराच्या हॉटेलात चहा-भजी हाणायला गेले असावेत, असा विचार करुन यशवंत एका रिकाम्या सीटवर बसला आणि खिशातून चंची काढून पान जमवु लागला...

**सारांश :**

प्रस्तुत उताऱ्यात मास्तराचा थोरला मुलगा यशवंत हा परतीच्या पहिल्या एस.टी साठी असलेली त्याची धडपड याचे वर्णन केले आहे. त्याला घरातून दिलेल्या डब्ब्यात भाकऱ्यांच कडाप व त्यावर भरपेट तेल घालून परतलेला कांदा असे वर्णन आहे. लेखकाने आजुबाजुची वातावरण निर्मितीसुद्धा केली आहे.

## नमुना क्र. १८

या साऱ्या प्रकरणात भरमुअण्णाची हार झाली होती... कायद्याच्या आधार घेऊन मास्तरने बाजी उलटविली होती. पोलिसांच्या घशात पाच-सहा हजार ओतून ही काहीच उपयोग झाला नव्हता. इतकं सारं रामायण घडूनही परत पूर्वीसारखी मुळ पदावर स्थिती झाली होती... पुर्वीसारखीच रुक्की बापाच्या घरात खित्तपत पडली होती आणि ज्याच्यामुळे हे सारं घडलं, त्या शिरप्याला याची काहीच झळ लागलेली नव्हती... अन मास्तरनं आता या अशा आपल्या तांगड्या आपल्याच गळ्यात घातल्या मुळे मधल्या मध्ये आपलीच नामुष्की व्हायची पाळी आली होती.

यामुळे भरमुअण्णा पिसाळून गेला होता... या मास्तराचं काय करु नि काय नको, असं त्याला झालं होतं... मास्तरला कशाप्रकारे सतवता येईल, याचा विचार करण्यातच एक-दोन दिवस उडाले...

एके दिवशी तो गडीमाणसे घेऊन तावातावाने गेला आणि मास्तराच्या माळावरल्या गोठ्यातील साऱ्या ढोरांची दावी कापून त्यांना बाहेर पिटाळून लावलं. गोठ्याभोवती मारलेल्या दोन-तीन हजाराच्या पत्र्याचा व आतल्या हजारभरच्या लाकडा-शेणकुट्यासह सर्व छपरांचा ताबा अण्णानं घेतला. अण्णाच्या चुलतभावाच्या नेमगोंडाच्या मालकीच्या त्या माळावर मास्तरंन ते छप्पर बांधलेल... गेली वीस वर्षे ते छप्पर तेथे होतं. कुणाचा काही वाद नाही. काही नाही, पण त्या प्रकरणाच्या चिडीनं अण्णानं मास्तरला तेथून हुसकावुन ते सारं आच्युती आपल्या पदरात पाडुन घेतलं... अण्णाची मास्तराबरोबर घासाघासी सुरु झाल्यावर सारी भावकीही अण्णाच्याच बाजुने; त्यामुळे अण्णाच्या या कृत्याला नेमगोंडाची मुक संमत्तीच असल्याप्रमाणे झाली होती.

**सारांश :**

भुरअण्णा आणि मास्तर यांच्यातील वैमनस्यामुळे हे वाद पोलिसांपर्यंत पोहोचले होते. आणि हार मात्र भुरअण्णाची झाली होती. भूरअण्णाची रुक्कीला बापाच्या दारातच रहावं लागलं होतं. त्यामुळे भुरअण्णा खूप संतापला होता. तो पिसाळला होता. मास्तराच्या गोठ्यातील दोरांची दावे कापुन त्यांना सळो की पळो करुन टाकले. आणि आपल्या चुलत भावाच्या मालकीची जागेत मास्तरांन बांधलेल्या घर जमिनीचा ताबा त्याने घेतला.

## नमुना क्र. १९

गावात डॉ. लीला आगाशे ही पस्तीशी उलटलेली बाई एकटीच राहात होती. सटवाईला अजुन व्हाल्ला गावला नव्हता. प्रॅक्टिस तशी बरी होती, त्यामुळे पैशाचा ओघ सततच वाहत होता. स्त्रियांच्या नैसर्गिक स्वभावानुसार बाईने दागदागिनेही बरेचसे केले होते आणि एकटेपणाची आग शमविण्यासाठी ती कुणाकुणाला सोबतही घेत असे. बाबगौंडचा बऱ्याच दिवसांपासून तिच्यावर डोळा होताच. एका रात्री तो डॉ. लीलाच्या घरात घुसला. तिला ठार करायचे व तिचे सारे दागदागिने, पैसा-अडका वगैरे घेऊन पसार व्हायचे! आता तिला ठारच करायचे म्हटल्यावर तिच्या जिवंत शरीराची मजा तर लुटावी म्हणून त्यांने तोंडाला मुस्कं आवळल्यागत बांधून तेही कर्म उरकले... दगडाखाली पाल सापडावी तशी ती तडफडू लागली होती. नंतर त्याने तिच्या मानेवर आपली बलदंड बोटं शेवून ती तडफडही कायमची बंद करुन टाकली होती. आणि मग तो घर शोधायला उठून उभा राहिला होता. कुठे-कुठे दागिने आहेत? कुठे-कुठे रोकड आहे.

या गुन्ह्यानंतर तो फरारीच झाला होता... एका मळ्यात पोलिसांनी त्याला घेरलंही होत; पण गोफणीतून त्यांच्यावर दगडांचा मारा करीत पुनःश्च तो हिकपाल झाला होता. काही दिवसांनी म्युनिसिपालिटीच्या मगदूम गटाला... फरारी असलेल्या बाबगौंडाची उमेदवरी जाहीर करुन कॉंग्रेसवाल्यानी त्याला निवडूनही आणले. जनतावाले आपल्याकडील ब्राह्मण समाजातील नगराध्यक्ष म्हणून निवडून आणण्याच्या खटपटीला लागले; पण ब्राह्मणापेक्षा जैन बरा, अशा विचाराने बाबगौंडाच निवडला गेला.

**सारांश :**

प्रस्तुत उताऱ्यात डॉ. लीला आगाशे हिच्यावरील झालेल्या हत्येची नमूद केली आहे. ती एकटी असल्यामुळे झोपण्यास कोणाला तरी बोलवत असे. तिच्याकडील असलेल्या सौंदर्याचा लंकारावर बाबगौंड या इसमाचा डोळा असल्यामुळे त्याने तिचा एक दिवशी गैरफायदा घेतलाच व तिला कायमचेच नाहीसे करुन टाकले. तो पोलिसांवर दगडफेक करुन फरारही झाला आणि काही दिवसांतच तो कॉंग्रेस पक्षातून उमेदवारी जाहिर करुन निवडूनही आला.

## ६.४ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी
२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.
३) व्यावहारिक मराठी - डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे.
४) व्यावहारिक मराठी - ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.
५) व्यावहारिक मराठी - भाग - २ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड.
६) व्यावहारिक मराठी - संपादक स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार - प्रा. चंद्रहास जोशी
८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे


❖❖❖❖

munotes.in

# घटक -७

# निंबध लेखन

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रास्ताविक
७.२ निंबधाची व्याख्या
७.३ निंबधाचे प्रकार
    ७.३.१ विचारप्रधान निंबंध (वैचारिक निंबध)
    ७.३.२ वर्णनात्मक निंबध
    ७.३.३ कल्पनाप्रधान निबंध
    ७.३.४ चरित्रात्मक निंबध
    ७.३.५ आत्मकथनात्मक निंबध
    ७.३.६ लघुनिंबध
७.४ निंबध लेखकासाठी काही मार्गदर्शक सूचना
७.५ निंबधाचे प्रकार
    ७.५.१ ग्रंथ हे गुरु
    ७.५.२ ललित साहित्याकडून माझी अपेक्षा
    ७.५.३ वाचनाने घडतो मानव
    ७.५.४ आरोग्य धनसंपदा
    ७.५.५ सुशिक्षित बेरोजगाराचे आत्मकथन
    ७.५.६ विज्ञान आणि मानव
    ७.५.७ स्त्रीशक्ती
    ७.५.८ प्रदूषण : एक समस्या
    ७.५.९ प्लॅस्टिकचे साम्राज्य
    ७.५.१० संदर्भ ग्रंथ

## ७.० उद्दिष्ट्ये

निंबध हा महत्त्वाचा लेखनप्रकार आहे. शाळेत असताना साधारणपणे तिसऱ्या किंवा चौथ्या वर्गापासन शाळेतील शिक्षकांनी तुम्हाला 'निंबध' लिहायला सांगितला असणार. पुढील विषयावर दहा ते पंधरा ओळींचा निंबध लिहा. 'माझे शिक्षक' किंवा 'माझी आई' असा प्रश्न तुम्हाला परीक्षेत लिहायला आला होता. तेव्हा आपण निंबध कसा असतो; 'निंबध' कशाला म्हणतात याचा शोध घेऊन मराठी भाषेच्या काही चांगल्या निंबधांचा अभ्यास करणार आहोत. उत्तम निंबधाचे विशेषही नजरेखालून घालणार आहोत.

या घटकाचे अध्ययन केल्यावर तुम्हाला –

- निंबंधाची व्याख्या करता येईल.
- निबंध हा वाङ्मय प्रकार काय आणि कसा आहे ते स्पष्ट करता येईल.
- या वाङ्मय प्रकाराचे घटक नोंदविता येतील.
- चांगला निंबध आणि त्या निबंधाची वैशिष्ट्ये सांगता येतील.
- प्रसार माध्यमांची भूमिका काय हे समजून घेता येईल.

## ७.१ प्रास्ताविक

निंबध लेखनातून लेखकाच्या लेखन कौशल्य व ज्ञान यांची माहिती लेखकाच्या निंबधातून होते. शालेय शिक्षण घेत असताना तुम्ही अनेक वेळा 'निंबध' लिहिलेला असूनही 'निंबध' हा एक वाङ्मय प्रकार आहे ह्याची जाणीव तुम्हाला झालेली नसणार. 'माझी शाळा', 'आमचा गाव', 'माझा आवडता लेखक', 'महात्मा गांधी' किंवा 'माझा आवडता नेता जवाहरलाल नेहरु' किंवा 'पावसाळ्यातील एक दिवस', 'मी केलेली सहल' अशा विषयावर असले, जे लेखन तुम्ही केले होते त्याला 'निंबध' असे नाव तुम्ही दिलेले असले तरी 'निंबध' या वाङ्मय प्रकारात हे लेखन बसते का याचाही विचार तुम्ही केलेला नसणार. एक गोष्ट मात्र तुम्हाला निश्चित ठाऊक आहे. ती म्हणजे 'निंबध' हा 'गद्य' लेखनाचा प्रकार आहे. 'निंबध' म्हणजे जशी 'कविता' नव्हे तसेच 'निंबध' म्हणजे 'कथा' किंवा 'कादंबरी' किंवा 'नाटक' ही नव्हे. निबंध म्हणजे निंबध!

'निंबध' म्हणजे कविता, कथा, कादंबरी किंवा नाटक नसून, एखाद्या विषयासंबंधी आपल्याला जी माहिती असणे ते सांगणे म्हणजे निंबध! अगदी बरोबर. तुम्ही जो निंबध आतापर्यंत लिहिलेला होता तो म्हणजे 'शाळे' संबंधीची माहिती, 'गावा' संबंधीची, 'थोर' नेत्यासंबंधीची माहिती, 'पावसाळ्यातील एका दिवसा' संबंधीची माहिती याच स्वरुपाचा होता. आणि त्याला 'निंबध' म्हणतात हे ज्ञान तुम्हाला तुमच्या नकळत झालेले होते. तुम्ही 'निंबध' म्हणजे काय प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे, "एखाद्या विषयासंबंधीची केलेले स्पष्टीकरणात्मक, विवरणात्मक लेखन म्हणजे निंबध" किंवा "एखाद्या विषयासंबंधी केलेले माहितीपूर्ण विवेचन म्हणजे निंबध" हीच निंबधाची व्याख्या म्हणता येईल. या व्याख्येतच 'निंबध' गद्यलेखन असले, तरी ते 'कथा' किंवा 'नाटक' का नसते हे सूचित होते. निंबधात माहिती, विवरण, स्पष्टीकरण, विवेचन असते. परंतु कथेप्रमाणे किंवा नाटकाप्रमाणे 'अनुभवाची' निर्मिती, कथन किंवा नाट्यीकरण नसते. त्यात 'पात्रे' नसतात. तर एखाद्या गोष्टींसबंधी, वस्तूसंबंधी सरळ विधाने केलेली असतात. किंवा एखाद्या विषयासंबंधी विचार मांडलेले असतात. उदाहरणार्थ 'थोर नेता महात्मा गांधीजी' असा निंबध तुम्ही जेव्हा लिहिला होता तेव्हा महात्मा गांधीजी संबंधीची माहिती देऊन ते तुम्हांस थोर का वाटतात ते तुम्ही स्पष्ट केले होते. किंवा 'थोर नेता' कसा असतो याविषयीचे विचार मांडले होते. 'निंबधाचे दुसरे वैशिष्ट्यही या व्याख्येतच सापडते. ते म्हणजे - एखाद्या विषयासंबंधी मांडलेले विचार. संबंध निबंध हा 'एखाद्या विषयावर' असतो, विविध विषयावर 'एक' निबंध असू शकत नाही! हे वैशिष्ट्य 'निंबध' या शब्दातच आहे. 'निंबध' या संस्कृत शब्दाचा अर्थच मुळी 'जिच्यामध्ये विषय गोवला असा आहे अशी रचना' असा आहे.

## ७.३ निंबधाचे प्रकार

एखाद्या विषयाची विविध अंगे सांगून व त्यावरील भिन्न भिन्न मतांचे खंडन-मंडन करुन त्यातून काही निष्कर्ष काढणे याला निंबध रचना असे म्हणतात.

एखाद्या विषयाची विविध अंगे आपण जेव्हा सांगत असतो तेव्हा त्यात परस्पर संबंध असतो, ती सुसंगत असतात. त्यात एक प्रकारची तर्कशुद्धता असते. ती आपण जेव्हा सांगत असतो तेव्हा किंवा आपली मते मांडत असतो तेव्हा आपली मते लोकांना पटावीत यासाठी आपण काही उदाहरणे देतो. आपल्या स्पष्टीकरणाला वा विवरणास आधार देतो. ही मते आपण मांडतो व आपल्याला इतिहासाचे जे ज्ञान असते त्याच्या आधारे किंवा आपल्याला स्वतःच्या अनुभवांच्या आधारे किंवा आपण जगाचे जे निरीक्षण केलेले असते त्याच्या आधारे, ही मते म्हणजे आपले विचार असतात. या सर्व गोष्टी एकत्र घेऊन 'निंबधा'ची आणखी एक व्याख्या केली जाते ती अशी -

तर्कशुद्ध रीतीने केलेली, बुद्धीला आवाहन करणारी, सर्व सिद्धान्त साधार व सप्रमाण मांडणारी, इतिहास, अनुभव व अवलोकन यांच्या पायावर उभारलेली विचारप्रधान रचना म्हणजे निंबध. या व्याख्येमध्ये आलेला एक विशेष अत्यंत महत्त्वाचा आहे. तो म्हणजे 'विचार प्रधान' रचना. आपण शालेय पातळीवर जे निबंध लिहिलेले असतात त्यात माहिती असते, इतरांची मते असतात. पण आपले ज्ञान, अनुभव आणि आकलन, अवलोकन यांच्याद्वारे तयार झालेले विचार त्यात फारसे असत नाहीत. पण तरीही आपण लिहिलेला असतो तोही 'निबंध' असतो.

प्रारंभीच्या काळात निबंध हा वाङ्मयप्रकार मनोरंजनाशी कधीच निगडित नव्हता. मतप्रचार, चर्चा, मतप्रतिपादन, गुणग्रहण आणि प्रबोधन हे निबंधाचे विविध उद्देश होते. मात्र आज मनोरंजनपर माहिती हा सुद्धा निबंधलेखनाचा एक उद्देश झाला आहे. म्हणून निबंधाच्या स्वरुपावरुन निबंधाचे खालील प्रकारात वर्गीकरण करता येईल.

### ७.३.१ विचारप्रधान निंबंध (वैचारिक निंबध) :

या प्रकारच्या निबंधामध्ये विचाराला प्राधान्य असते. आणि हा विचार मांडताना विवेचनही करावे लागते म्हणून विचारप्रधान निबंध हा विवेचनात्मक असतो. त्याला चिंतनात्मक निबंध असेही म्हणतात. या प्रकारात विचार महत्त्वाचा असतो. वर्णनकथन किंवा कल्पना यांना महत्त्व नसते. विचार म्हटला की, दोन बाजू आल्या. त्यातील एक बाजू लेखक मांडतो. उदा. अणुशक्ती शाप की वरदान? आता यातील एका बाजूचे समर्थन लेखक करील आले विचार लोकांना पटवून देण्यासाठी त्याची मांडणी सुसंगतवार करावी लागेल व ती तर्क आणि शास्त्राला धरुनच व्हावयास हवी. याशिवाय आपलीच बाजू बरोबर आहे हे पटवून देण्यासाठी त्याला अनेक दाखले किंवा उदाहरणे देणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर हे आपलेच एकट्याचे म्हणणे नसून अनेक विचारवंतांचे विचारही अशाच प्रकारचे आहे हे पटवून देण्यासाठी त्यांची वचने, सुभाषिते, म्हणी यांचाही आधार घ्यावा.

या प्रकारच्या निबंधात केवळ आपलीच बाजू मांडून चालत नाही तर विषयाची दुसरी बाजूही विचारात घ्यावी लागते. विरुद्ध पक्षाचे मुद्दे मांडून ते खोडून काढता आले पाहिजेत. या

प्रकारचे दूरदर्शन शाप की वरदान? आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे का? यंत्र हे शाप की वरदान? खेळाचे जीवनातील स्थान, ग्रंथ हेच गुरु यासारखे निबंध खालीलप्रकारे सोडवता येतील - प्रथम दिलेल्या विषयाबाबत प्रास्ताविक विचार मांडावेत. त्यानंतर विरुद्ध पक्षाचे मत काय आहे, ते मांडावे याला पूर्वपक्ष म्हणता येईल. नंतर विरुद्ध पक्षाचे म्हणणे खोडून काढावे त्याला खंडन म्हणतात. त्यानंतर आपले विचार मांडून आपली बाजू पटवून द्यावी. याला उत्तरपक्ष म्हणतात. या उत्तरपक्षात आपल्या बाजूच्या विचाराचे मंडन (मांडणी) असते. हे खंडणमंडण झाले म्हणजे शेवटी आपल्या विचाराबाबतचा निष्कर्ष द्यावा.

### ७.३.२ वर्णनात्मक निंबध :

या प्रकारच्या निबंधामध्ये निबंधकाराने पाहिलेल्या एखाद्या दृश्याचे, व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे चित्र वाचकांसमोर हुबेहुबपणे शब्दांनी रेखाटणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात. यात वर्णनाला अधिक महत्त्व असते. वर्णन विविध प्रकारचे असू शकते. केव्हा केव्हा व्यक्तीचे पशु-पक्ष्याचे, एखाद्या स्थळाचे, एखाद्या प्रसंगाचे असेल किंवा निसर्गातील एखाद्या सुंदर किंवा भीषण दृश्याचे असेल किंवा सुंदर शिल्पाचे किंवा कोरीव लेण्याचे असेल.

या प्रकारच्या निबंधलेखनात लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीला अत्यंत महत्त्व असते. सूक्ष्म निरीक्षणाशिवाय वर्णन रसपूर्ण होत नाही. यात केवळ बाह्यात्कारी वर्णन पुरेसे नसते तर ते दृश्य पाहून आपल्या मनात भावनांचे जे तरंग उठतात त्याला महत्त्व असते. यामुळेच हा निबंध हृद्य व वाचनीय ठरतो. उदा. सर्कशीतील हत्तीचे आत्मकथन, युद्धात कामी आलेल्या सैनिकाच्या पत्नीचे मनोगत, एका क्रांतीकारकाचे मनोगत, माझा आवडता महिना-श्रावण, शेतकऱ्याचे हमालाचे, पोस्टमनचे मनोगत, एका संस्मरणीय सहल, पहिला पाऊस, माझा आवडता साहित्यिक, यासारखे निबंध वर्णनात्मक निबंध म्हणून ओळखता येतील. यातील शेतकऱ्याचे-हमालाचे-मजुराचे-पोस्टमनचे मनोगत या निबंधात वर्णनाबरोबरच त्यांची हलाखीची परिस्थिती, श्रमाच्या मानाने त्यांना मिळणारा अल्प मोबदला त्यांचे खडतर कौटुंबिक जीवन याकडेही सहानुभूतीपर नजर टाकून वर्णनात भावनेचा ओलावा निर्माण केल्यास तो निबंध अधिक आकर्षक, जिवंत आणि हृद्य होईल.

### ७.३.३ कल्पनाप्रधान निबंध :

कल्पनाप्रधान निबंधात कल्पनेला भरपूर वाव असतो. जी गोष्ट सत्यसृष्टीत घडत नाही. ती कल्पनेने मिळवून मनुष्य त्यात रमण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे जर तरची भाषा वापरुन आपण कल्पना करु शकतो. उदा. मी राष्ट्रपती झालो तर! मला पंख असते तर! सूर्य उगवलाच नाही तर! झाडे नसती तर! मला लॉटरी लागली तर! मला देव भेटला तर! कलावंत संपावर गेले तर! इत्यादी निबंधामध्ये रम्य कल्पना मांडून दिलेला विषय सजवता येईल. कल्पनाप्रधान निबंधात आपल्या कल्पनाशक्तीला स्वैर वावरु द्यावे. मात्र या कल्पना हास्यास्पद तर होणार नाहीत ना हे ही पहावे.

### ७.३.४ चरित्रात्मक निंबध :

चरित्रात्मक निबंधात व्यक्तीच्या जीवनकार्याला विशेष महत्त्व असते. चरित्रनायकाचा जन्म कोठे झाला? कोणत्या परिस्थितीशी झगडून त्याने आपले शिक्षण कसे पुरे केले. कोणते जीवितकार्य त्याने डोळ्यांसमोर ठेवले होते, ते साध्य करण्यासाठी त्यांना कोणकोणत्या अडचणी आल्या, कोणकोणत्या घटनांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविले गेले. प्राप्त परिस्थितींवर त्याने मात

munotes.in

करुन कोणता ठसा उमटविला. त्यांच्या जीवनातील ठळक घटना व त्या व्यक्तीचे यशापयश याचे निवेदन चरित्रात्मक निबंधात असते.

ज्याचे चरित्र आपण लिहितो ती व्यक्ती असामान्य किंवा लोकोत्तर असते. त्याच्या चरित्रकथनात तारिखवार तपशील असावाच असे काही नसते. या प्रकारचा निबंध आकर्षक करण्याकरिता त्या व्यक्तीच्या जीवनातील एखादा प्रभावी प्रसंग सांगून किंवा त्याच्या तोंडचे एखादे वाक्य उद्धृत करुन त्याचे जीवनचरित्र सांगितले तरी चालते. थोर महात्म्याची चरित्रे वाचून आपण त्याच्यासम होण्याची ईर्षा बाळगावी हा चरित्रात्मक निबंधाचा हेतू असतो. चरित्र नायकाच्या जीवनातील ठळक घटनांची कालानुक्रमे नोंद निबंधकाराला माहित असणे आवश्यक असते. चरित्रलेखन हा इतिहास असतो. ती कल्पितकथा होऊ नये याची दक्षता निबंधकाराने घेणे आवश्यक असते.

### ७.३.५ आत्मकथनात्मक निंबध :

हा कथनात्मक निबंधाचाच एक प्रकार आहे. मात्र यातील कथन करणारी व्यक्ती ही कोणी तिऱ्हाईत व्यक्ती नसून स्वतःच्याच जीवनातील प्रसंगाचे निवेदन स्वतः त्या व्यक्तीला किंवा वस्तूला करावयाचे असते. आत्मकथनात्मक निबंध म्हणजे केवळ आत्मचरित्र असते असे नाही. अशा प्रकारच्या निबंधात ज्याचे आत्मकथन करायला सांगितलेले असते त्या वस्तूच्या किंवा प्राण्याच्या अंतरंगात आपण मनाने शिरुन त्याची सुख-दुःखे व अनुभव यांच्याशी एकरुप होऊन ती कथन करायची असतात. या प्रकारच्या निबंधात कल्पनाविलासाला वाव असतो. दिलेल्या विषयाच्या वैयक्तिक जीवनात घडलेल्या प्रसंगाचे संगतवार कथन करण्याऐवजी काही निवडक प्रसंग सुसंगत व चटकदार पद्धतीने सांगता आले पाहिजेत. अशा निबंधातील वाक्यरचना प्रथमपुरुषी असावयास हवी. आत्मकथनपर निबंधानाच कोणी मनोगत, कैफियत, कहाणी, आत्मवृत्त अशा वेगवेगळ्या नावांनीही ओळखले जाते.

आत्मकथनपर निबंधात रायगड बोलू लागला तर, सह्याद्रीला वाचा फुटली तर, चंद्राचे मनोगत, एका निर्वासिताची कहाणी, सर्कशीतील हत्तीचे आत्मकथन, बेरोजगार तरुणाचे आत्मकथन, एका क्रांतिकारकाचे आत्मकथन, इत्यादी निबंध आत्मकथनपर निबंध म्हणून विचारण्यासारखे आहेत.

याप्रकारचे निबंध लिहिताना अलंकारिक भाषा, संबोधनात्मक शब्द, उद्गारवाचक शब्दप्रयोग इत्यादी स्वरुपाची भाषा अधिक आवश्यक असते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकताही वापरता येईल.

### ७.३.६ लघुनिंबध :

लघुनिबंध म्हणजे लहान निबंध नव्हे. लघुनिबंधात 'मी' चे वर्चस्व असते. वाचकांशी हितगुज करीत, गप्पा करीत, एखाद्या हलक्याफुलक्या विषयावर या प्रकारच्या निबंधातून विचार प्रकट केले जातात.

लघुनिबंधात इतर प्रकारच्या निबंधाप्रमाणे साधक-बाधक चर्चा नसते. विषयाचे खंडन किंवा मंडन अथवा विषयाचे ज्ञान करुन द्यावे हा हेतुसुद्धा नसतो. उलट यात विषयाच्या निमित्ताने लेखकाने वाचकाशी मारलेल्या त्या स्थैर गप्पा असतात. या प्रकारच्या निबंधलेखनात लेखकाच्या भावनाशील, हळूवार, अनुभवी व रसिक वृत्तींची आवश्यकता असते. ही वृत्ती लेखकात जितकी जास्त तितका तो निबंध खुमासदार, भारदस्तपणा येतो. लघुनिबंधात लेखक

आपल्या आयुष्यात घडलेला एखादा प्रसंग सांगतो. त्यामुळे लघुनिबंधात एकाचवेळी कथन, आत्मकथन, वैचारिकता कल्पनात्मकता देखील पहावयास मिळते. अनंत काणेकरांनी लिहिलेला दोन मेणबत्त्या, स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी मेलास तर जगलास असा मौलिक विचार देतो. या संदर्भात वि.स.खांडकेर यांनी लघुनिबंधाचे स्वरुप सांगताना 'मोहक व्यक्तित्वाचा आविष्कार हा लघुनिबंधाचा आत्मा आहे' असे म्हटले आहे.

## ७.४ निंबध लेखकासाठी काही मार्गदर्शक सूचना

निबंधाचे निरनिराळे प्रकार समजून घेताना आपण त्या प्रकारच्या निबंध लेखनासाठी आवश्यक असलेले घटक यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. या महत्त्वपूर्ण घटकाशिवाय निबंध लेखनाच्या क्षेत्रात नव्याने पाऊल टाकणाऱ्या निबंध लेखकासाठी काही मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. निबंध लेखन करता येणे ही भाषेच्या अभ्यासाची खरी परीक्षा आहे. भाषा बोलणे, वाचणे, लिहिणे आणि समजून घेणे म्हणजे भाषा आत्मसात झाली असे नाही तर भाषा शिक्षणाचा प्रमुख हेतू आपले विचार आपल्या भावना सुस्पष्टपणे आकर्षक पद्धतीने आणि मुद्याला धरुन दुसऱ्यासमोर मांडता येणे हा आहे. निबंध लेखनाच्या प्रश्नावरुन विद्यार्थ्याची भाषेची तयारी किती आहे ? त्याची लेखनात किती गती आहे याची कल्पना येते.

२. निबंध कोणत्याही प्रकारचा असला तरी सर्वप्रथम आपणाला ज्या विषयावर निबंध लिहायचा आहे तो विषय मनाशी पक्का ठरवावा. विषय ठरविल्यानंतर त्या विषयाशी संबंधित असलेले विचार, अनुभव मनातल्या मनात जुळवावेत, सर्वसाधारणपणे प्रत्येक मुद्यासाठी स्वतंत्र परिच्छेद बनवावा.

३. निबंधाची एक रुपरेषा तयार करावी. रुपरेषा बनविल्याने विषय अधिक सुस्पष्ट होतो आणि निबंध परिणामकारक व प्रभावशाली बनतो.

४. निबंध लिहिणे ही एक कला आहे. एक सुसंगत निबंध प्रस्तावना मध्यभाग (आशय) आणि उपसंहार या तीन भागांमध्ये विभागता येईल. प्रस्तावनेमध्ये निबंधाची भूमिका स्पष्ट होते. म्हणून निबंधाची प्रस्तावना आकर्षक आणि सुंदर असावी. या प्रस्तावनेत निबंधकाराने विषयाशी संबंधित प्रभावशाली पद्धतीने विचार व्यक्त करावेत. ही प्रस्तावना आकर्षक असावी. एखाद्या काव्यपंक्तीने, सुभाषिताने किंवा तुमच्या वैयक्तिक अनुभवाच्या साहाय्याने ती आकर्षक करता येईल. प्रस्तावना पाल्हाळिक असू नये त्याचप्रमाणे तिच्यात विषयांतर सुद्धा असू नये.

५. निबंधाच्या मध्यभागी (आशयामध्ये) विषयाशी संबंधित विचार प्रतिपादन केले जातात. हा भाग लिहित असताना विषयाला अनुसरुन विचारांचे विश्लेषणात्मक पद्धतीने विवेचन करावे. यात विषयाची अनुकूल आणि प्रतिकूल या दोन्ही चर्चा करावी. त्यासाठी वेगवेगळे परिच्छेद पाडावेत व एका परिच्छेदात एका विचाराची चर्चा करावी. यात आपले मनोगत व्यक्त करणारी माहिती अधिक न सांगता विषयाच्या खंडनमंडनात्मक आशयाच चर्चा करावी.

६. निबंध लेखनात जेवढी प्रस्तावना महत्त्वाची असते तेवढाच उपसंहारसुद्धा (समारोप) महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तावनेप्रमाणेच उपसंहारसुद्धा आकर्षक असावा. निबंध समाप्त झाला तरी

तो वाचकांच्या मनात तो विचाराचे तरंग निर्माण करील. तो निबंध विसरणार नाही. इतका उपसंहारसुद्धा परिणामकारक असावा.

७. निबंधाची भाषाशैली निबंधाचे शरीर आहे आणि निबंधातून व्यक्त केले जाणारे विचार निबंधाचा आत्मा आहे. निबंधामध्ये स्पष्ट, शुद्ध आणि सुबोध भाषा असावी. निबंधाची भाषा परखड असावी. तसेच वाचकांना आकृष्ट करणारी असावी. भाषेला प्रभावशाली बनविण्यासाठी वाक्यप्रचार, सुभाषिते, म्हणी, यांचा योग्य वापर केल्यास तसेच त्यांचा सराव केल्यास ही कला कोणालाही आत्मसात करता येईल.

८. निबंधामध्ये प्रसंगानुरुप आलेल्या विचारांना स्पष्ट, सशक्त आणि परिणामकारक बनविण्यासाठी प्रश्नार्थक चिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह, अवतरण चिन्हे यांचा योग्य वापर करावा.

९. निबंध जरी प्रस्तावना-मध्यभाग-उपसंहार या तीन भागात लेखनाच्या दृष्टीने विभागला गेला असला तरी निबंधातील आशय-विषयात सुसंगती असावी. निबंधातील प्रत्येक वाक्यात संगती असावी आणि एक वाक्य दुसऱ्या वाक्याशी संबंधित असावे त्यामुळे निबंध एकसंध होईल.

१०. आपल्या निबंधाला परीक्षेत अधिक गुण मिळावेत म्हणून हिंदी इंग्रजी संस्कृत किंवा मराठी भाषेतील अवतरणे देणे अधिक योग्य ठरेल. अवांतर वाचनाने ती आपणाला सहज सापडू शकतात. उदा.

1. तुम्हाला आदर्श विद्यार्थ्यांवर निबंध लिहायचा असेल तर - Early to sleep, Early to rise, that makes a man happy and wise.

२. यत्न तो देव जाणावा हा निबंध लिहायचा असेल तर कर्मण्यैव हि सेसिद्धिमास्थिता जनकादय, किंवा प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे, थांबला तो संपला.

३. माणसाला पंख असते तर... हा लिहायचा असेल तर पंछी बनु उडती फिरु मस्त गगन में। आज मैं आजाद हूँ दुनिया की चमन में।।

4. शील हाच अंलकार हा निबंध लिहायचा असेल तर... 'शीलं परमं भूषणमं,।।' If wealth is lost, nothing is lost, if health is lost, something is lost, but if character is lost, everything is lost.

५. माझा आवडता महिना श्रावण - हा निबंध लिहायचा असेल तर बालकवींची श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे।।

६. कलावंत संपावर गेले तर हा निबंध लिहायचा असेल तर कवी केशवसुतांच्या आम्ही कोण? या काव्यपंक्ती वापरता येईल.

आम्हाला वगळा - गतप्रभा क्षणी होतील तारांगणे
आम्हाला वगळा - विकेल कवडी मोलावरी हे जिणे

अशा प्रकारची विधाने, काव्यपंक्ती, वाक्यप्रचार, म्हणी, सुभाषिते, अवतरणे, टाकले तर अधिक सौंदर्यसूचक व आशयसूचक ठरेल. आणि निबंध अधिक आकर्थक, नेटका आणि सुस्पष्ट होईल.

## ७.५ निंबधाचे प्रकार

### ७.५.१ ग्रंथ हे गुरु :

असतो मा सद्गमय।
तमसो मा ज्योतिर्गमय।।
मृर्त्योमा मृतं गमय।।

म्हणजे हे परमेश्वर! मला वाईटाकडून चांगल्याकडे ते अंधाराकडून प्रकाशाकडे ने. मृत्युऐवजी अमरत्वाकडे ने. शून्यातून अस्तित्वाकडे ने. अशी भारतीय विचारधारा आहे. हा जीवनमंत्र रुजविण्याचे, फुलविण्याचे व वृद्धींगत करण्याचे काम अनादी काळापासून गुरुजन मोठ्या निष्ठेने करीत आले आहेत. या गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना गुरुर्बह्मा गुरुविष्णु गुरर्देवो महेश्वरा म्हटले जाते. भारतवर्षात गुरुजनांना अतिशय महत्त्व दिले जाते. भारताबरोबरच अनेक प्रगत राष्ट्रात गुरुजनांची महान परंपरा आहे. ही गुरुशिष्याची परंपरा निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर, स्वामी रामकृष्ण परमहंस-विवेकानंद, आचार्य रामानंद, संत कबीर, चाणक्य-चंद्रगुप्त, द्रोणाचार्य-एकलव्य, बुद्ध-कबीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाकांत आचरेकर-सचिन तेंडूलकर, प्लेटो-ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस-प्लेटो, ॲरिस्टॉटल-अलेक्झांडर, या सर्व गुरुशिष्यांना स्थलकालाची मर्यादा आहे. त्याची विचारसरणी व जीवनमूल्य निरपेक्ष व चिरंतन टिकून आहेत. भारतीय व पाश्चात्य परंपरेत गुरुला-अतिशय मानाचे स्थान आहे. कारण 'गुरुविण कौन बतावे वाट,' असे मानले जातात.

मानवी जीवन टप्प्याटप्प्याने विकसित झालेले आहे. भूतकाळ याची साक्ष आहे. या जडणघडणीत माणूस किती अप्रगत होता. आज किती सुसंस्कारीत झाला आहे. याची कल्पना येते. भूतकाळाचा मागोवा घेऊन मनुष्याला भविष्याची वाटचाल करता येते. आत्मपरिक्षण करता येते. इतिहास यासाठी तर उभा आहे. इतिहासातील मागील घटना प्रसंगावरुन वर्तमानकाळातील ध्येयधोरणे ठरविता येतात.

आजच्या विज्ञानयुगात गुरुबरोबरच मार्गदर्शनाचे कार्य ग्रंथ मोठ्या समर्थपणे सांभाळत आहेत. मानवाने मुद्रणकलेचा शोध लावला आणि ग्रंथगुरुचा साक्षात्कार झाला. ज्ञानाच्या कक्षा आज रुंदावल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही विषयाचे ज्ञान साध्य करणे ग्रंथामुळे शक्य झाले आहे. मानवाच्या उत्कर्षासाठी ग्रंथ महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रंथ मानवाला त्याच्या पूर्वजाचा वारसा सुरक्षितपणे आणून पोहचवितात. त्यामुळे मागच्या अनुभवाच्या पायावर माणूस पुढील प्रगती वेगाने करु शकतो. ग्रंथ निरपेक्ष, चिरंतन असतात. त्याला स्थलकाल व्यक्तिनिरपेक्षतेची बंधने नसतात. तो जितक्या सावधपणे भूतकाळात संचार करतात. किंबहुना तितक्याच सहजसुलभतेने तो भविष्यकाळात विहार करतो. किंबहुना वर्तमानाला भूतकाळाशी आणि भविष्यकाळाशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य हे ग्रंथरुपी गुरु पार पाडतात.

आजच्या नव्या युगात ग्रंथाचा खूप विस्तार झालेला आढळतो. त्याच्याकरिता स्वतंत्र इमारती, पुस्तके ठेवण्यासाठी छानपैकी कपाटे, देखभालीसाठी माणसे नेमलेली आढळतात. वाचनामुळे माणसाला खरे प्रौढत्व मिळते. मानवी मन मूलतः प्रकृतीग्राही आहे. त्यामुळे ते सहजपणे ते विकृतीकडे जाऊ शकते. ते ज्याचे मन आहे. त्यालाही कळू शकत नाही. माझे तेच सत्य ही प्रवृत्ती बळावते. परंतु ग्रंथामुळे सत्याचे आकलन होते. तसेच माझे ते माझे व तुझे तेही

माझे अशी स्वार्थी वृत्ती प्रकृतीग्राही मनामुळेच होऊ शकते. पण ग्रंथामुळे अशा सर्वसंहारक वृत्तीची सर्वांना नवसंजीवन देणारी चिकित्सा होऊ शकते.

शास्त्रीय साहित्य भौतिक संपन्ता जशी प्रदान करतात तर ललित साहित्य, धर्मग्रंथ समाजाला कल्याणकारी व सुनीतिमत्ता प्रदान करतात, या ललितसाहित्यातून बुद्धिविकास आणि विवेकविलास याचे अजब मार्गदर्शन होते. उदा. भगवद्‌गीता, श्रीमद्‌भागवत, अभंगवाणी भारुडे इ. यांच्या चिंतनात हे सामर्थ्य आहे. ग्रंथामुळे भाषेचे ज्ञान योग्य प्रकारे होण्यास मदत होते. जिज्ञासापूर्ती होते. ग्रंथामुळे प्रगती-अधोगती, उचित-अनुचित, सत्य-असत्य, विवेक-अविवेक यांच्यातील फरक कळतो. ग्रंथ वाचकांसाठी एक प्रसन्न विरंगुळा, एक आधाराचे ठिकाण अभिरुची संपन्न वाचक तयार करण्याचे कार्य ग्रंथ करतात. म्हणून साहित्यसम्राट न. चि. केळकर (तात्यासाहेब) यांनी ग्रंथ व ग्रंथालयांना ज्ञानाची सदावर्ते असे म्हटले आहे तर ग्रंथाचे महत्त्व सांगताना दुर्गा भागवत यांनी ग्रंथ केवळ रंजनच करतात असे नाही तर ते मनाचेही पोषण करतात. त्यावर सुसंस्कार करतात. त्यातले हीन काढून त्याचे बावनकशी सुवर्णात रुपांतर करतात. अज्ञानाच्या खोलखोल दरीतून हात धरुन त्याला वर काढतात. आणि ज्ञानाची नवीनवी क्षितिजे उजळवीत 'ज्ञानाची पवित्रता, ज्ञानाची अथी' असे ज्ञानदेवांचे बोट धरुन म्हणायला लावतात, अशा शब्दात ग्रंथांचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट केले आहे. (दै. लोकमत नोव्हे. २००९)

### ७.५.२ ललित साहित्याकडून माझी अपेक्षा :

कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादी ललित साहित्य वाचताना आपल्याला जाणवते की, त्यामधले जग आपल्या सभोवतालच्या जगासारखेच आहे. लेखकाला ज्या प्रकारचे अनुभव येतात. त्यांच्याच आधारे तो साहित्याचे विश्व निर्माण करीत असतो. वास्तव जगातील अनुभवाची निवड करुन कल्पनेच्या साहाय्याने त्यामध्ये अधिक भर घालून एक नवे विश्व तो निर्माण करीत असतो. वास्तवातील जीवनाचे जसेच्या तसे चित्रण साहित्याने केलेले नसते तर वास्तवाच्या आधारे एक नवे विश्व साहित्यकृतीमध्ये तो रेखाटत असतो.

साहित्यामध्ये लालित्याला म्हणजे सौंदर्याला महत्त्व असल्याने त्याला ललित वाङ्‌मय ही संज्ञा योजिली जाते. शिल्प, नृत्य, संगीत, चित्र इत्यादी कलांप्रमाणे साहित्य ही सुद्धा कला आहे. ती शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होणारी असल्यामुळे तिला 'शब्दकला' म्हणूनही ओळखले जाते. कोणत्याही कलेमधून जसे सौंदर्य प्रतीत होत असते तसेच साहित्यामधूनही सौंदर्य प्रतीती घडत असते.

वास्तवातील जीवन हा एक वाहता प्रवाह आहे. पण साहित्यकृतीमध्ये अविष्कृत होताना त्याला प्रारंभ, मध्य अंत अशा बंदिस्त स्वरुपामध्ये व्यक्त केलेले असते. जीवनाचा एक सुसंगत तुकडा साहित्यामध्ये प्रकाशमान होत असतो. आणि या मर्यादित असलेल्या तुकड्यामधून साहित्याला संपूर्ण जीवनाला सामावून घ्यायचे असते. बनगरवाडी, पण लक्षात कोण घेतो? नटसम्राट, पडधवली, गारंबीचा बापू, यासारख्या साहित्याचे वाचन करताना लेखकांनी दिलेल्या तपशीलातून वाचकांचया नजरेसमोर बनगरवाडीचे, पडघवलीचे, गारंबीचे यमूच्या दु:खाचे, आप्पासाहेबांच्या यातनांचे चित्र उभे राहते. काश्मिरी गुलाब यासारख्या कादंबरीत तर फडके यांनी काश्मिरचे साक्षात शब्दचित्र रेखाटले आहे. लेखक शब्दाच्या कुंचल्याने निसर्गाचे, प्रदेशाचे, व्यक्तिरेखावे, त्यांच्या पेहरावाचे, हालचालीचे चित्र रेखाटत असतो. चित्रकार किंवा

छायाचित्रकार जसे रंगरेषाच्या साहाय्याने दृक्प्रत्यय देणारी चित्राकृती फलकावर साक्षात करीत असतो. तसेच निसर्गाचे चित्र रेखाटता यावे इतके तपशील बालकवींच्या निर्झरास, फुलराणी, औदुंबर, अरुण इ. कवितांमधून आलेला दिसतो. त्यामुळे शब्द हे साहित्याचे माध्यम आहे हे स्पष्ट होते.

मराठीतील थोर साहित्यात मानवी विकासाची चिन्हे प्रतिबिंब उमटलेले आहे. मानवी विकासावर साहित्याचा परिणाम व प्रभाव पडला आहे. एवढेच नव्हे तर जेव्हा केव्हा माणूस आपल्या मनुष्यत्वापासून दूर जातो तेव्हा माणूस आणि मानवता यांचा सहसंबंध साहित्यानेच जोडला आहे. हे विसरता येत नाही.

१९६० नंतरचे साहित्य परिवर्तनवादी साहित्य म्हणून ओळखले जाते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य हे उपेक्षित कष्टकरी, गावकुसाबाहेरील परिस्थितीचे चित्रण करणारे साहित्य आहे. माणूस ज्या वर्गात जन्माला येतो त्या वर्गाचे संस्कार, प्रेरणा, भावभावना त्याच्या व्यक्तिमत्त्वात खोलवर रुजलेल्या असतात. सर्व समाजाला ग्रासून टाकणाऱ्या प्रश्नांनी, समस्यांनी कलावंत अस्वस्थ होतो व त्याच्या हातून साहित्यनिर्मिती होते.

दलित, शोषित, पीडित यांनी आपल्यावरच्या अन्यायाचा प्रतिकार करावा तो स्वतः सुशिक्षित होऊन, सुसंस्कृत होऊन, संघटितरित्या समर्थ होऊन अशी लोकशाहीर अण्णाभाऊ साठेची शिकवण होती. महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या वतीने आयोजित केलेल्या महिला साहितय संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अण्णाभाऊ म्हणतात - "आम्हाला गंगेसारखे निर्मळ साहित्य हवे आहे. आम्हाला मांगल्य हवे आहे. आम्हाला मराठी साहित्याच्या थोर परंपरेचा अभिमान आहे. कारण मराठी साहित्याची नांदी आमच्याच जीवन-संघषाने झडली आहे. जेव्हा दलितांची सावली असह्य होती तेव्हा महानुभाव साहित्यिकांनी सर्वांना ज्ञान मिळाले पाहिजे, ज्ञान हे मोक्ष असे समजून त्यांनी बंड केले. ते आमचे साहित्यिक. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे असा दावा मांडून ज्यांनी दलितांच्या भाषेत महाराष्ट्राला सुंदर ज्ञानेश्वरी दिली ते आमचे साहित्यिक आणि चुकलेले महाराचे मूल कडेवर घेऊन जाणारे ते एकनाथ, ते आमचे साहित्यिक. आम्ही आमच्या वर्गाचे इमान पटवून त्याचा उपमर्द होणार नाही याची काळजी घेऊ त्याचे साहित्य निर्माण करु या. या दलिताचे जीवन सुखी व समृद्ध कसे होईल याची काळजी करु या, या दलिताला नि त्याच्या जीवनाला वरच्या पातळीवर नेण्याचा आपल्या कलेतून प्रयत्न करु या" अशी अपेक्षा केली आहे आणि ती अगदी योग्य आहे असे मला वाटते.

### ७.५.३ वाचनाने घडतो मानव :

आज जो तो पैशाच्या मागं लागलेला दिसतो. पण संपत्तीपेक्षा संस्कृती श्रेष्ठ आहे.

मनाची आणि विचारांची संपत्ती साठवण्याचा एकच मार्ग आहे अन् तो म्हणजे ग्रंथवाचन. ग्रंथांनीच मानवाचं ज्ञान 'अक्षर' म्हणजे न झिजणारे म्हणजे 'अमर' केलं आहे. ग्रंथ म्हणजे मानवी संस्कृतीचा जिवंत आणि जागता जसा संजीवन इतिहास आहे.

वाचनानं ज्ञानाच्या सीमा वाढतात. आपल्या जीवनाचे आपण शिल्पकार असतो. यशस्वी जीवन घडवायचं असेल तर माणसानं उत्तम वादक झालं पाहिजे. खूप वाचलं पाहिजे. वाचनानं तुम्हाला शिक्षण मिळेल, मनोरंजन होईल. तुमचं मन विशाल होईल आणि तुम्हाला कधीही एकाकीपणा जाणवणार नाही. जरा मागं वळून पाहिलं तर असं दिसून येतं की जितकी मोठमोठी माणसं आपल्या देशात किंवा परदेशातही होऊन गेली ती ती सगळी माणसं उत्तम वाचक होती.

लो. बाळ गंगाधर टिळक एकदा म्हणाले होते, "मी नरकातसुद्धा उत्तम पुस्तकाचं वाचन करीन, नरकातही पुस्तकाच्या साहाय्याने स्वर्ग निर्माण करीन."

उत्तम वाचक व्हायचं असेल तर एकचित्त व्हायची फार गरज आहे. एखादं पुस्तक वाचताना घरगुती समस्या, काही कटकटी, काळजी याचा थोडा वेळ का होईना. आपल्याला विसर पडतो. मनापासून केलेलं वाचन कधी वाया जाणार नाही. उत्तम वाचनाने संस्कार जर घडले तर नरामध्ये 'माणूस' होण्याची लक्षणे हळूहळू दिसू लागतात. ग्रंथप्रेम वाढू लागलं. वाचकाला जर एक दिशा वाचनाला मिळाली तर त्याचं जीवन यशस्वी होतं. माणसाच्या जन्माचं सार्थक होतं.

ख्यातनाम इतिहासकार गिबन म्हणाला होता की, 'भारतातली सगळी संपत्ती जरी माझ्या पायाशी ओतली तरी मी बालपणापासून जडलेलं वाचनाचं प्रेम सोडून देणार नाही.' त्याचप्रमाणे प्रख्यात कादंबरीकार चार्लस् डिकन्स तर नेहमी म्हणायचा की, "आयुष्यातल्या अन्य कोणत्याही मोहापासून मी परावृत्त होऊ शकलो ते केवळ पुस्तकांच्या प्रेमामुळे - त्याच्या वाचनांमुळ. यावरुन वाचनाचं वेड नसणारा प्राणी म्हणजे एक हतभागी जीव असंच नाईलाजानं म्हणावं लागेल. कुठल्याही क्षेत्रात काम करा पण त्या त्या क्षेत्रातल्या विषयावरची पुस्तकं तुम्ही वाचलीच पाहिजेत, अभ्यासलीच पाहिजेत. म्हणजे तुमच्या क्षेत्रात तुम्ही अधिक यशस्वी व्हाल-उजळून निघाल."

मंडालेच्या तुरुंगात असताना लो. टिळकांना जो प्रदीर्घ एकान्तवास जो सुसह्य केला तो केवळ ग्रंथांच्या सहवासात. पं. नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सतत वाचन लेखन करीत, तो त्याचा विसावा होता. सी.व्ही. रमन हे थोर शास्त्रज्ञ पण त्यांनाही पुस्तकांचा अतिशय नाद (छंद) होता. शास्त्रीय विषयावरची पुस्तकं वाचणं हा त्यांच्या व्यवसायाचाच एक भाग होता. नोबेल पुरस्कार मिळविणारे भारताचे महाकवी रविंद्रनाथ टागोर, हे मनस्वी वाचक होते.

आजचं युग सिनेमा अन् दूरदर्शनचं आहे. त्यामुळे वाचनाकडे पूर्णाशाने दुर्लक्ष होत आहे. ही लक्षण स्वतःच्या आणि देशाच्या उन्नतीच्या दृष्टीनं हानीकारक आहे, हे निर्विवाद. वाचायला वेळच नाही. अशी ओरड करणे धादांत खोटी आहे. आपण जर विचार की दररोज आपला किती वेळ फालतू जातो? याचा कधी विचार केलात? आपण वाचन करीत नाही याचाच अर्थ आपल्याला मोठे ध्येय नाही. पण वाचन हा संस्कृती संवर्धनाचा आत्मा आहे. हे आपण विसरता कामा नये. वाचाल तर वाचाल हे लक्षात घ्या. समर्थ रामदासांनी सुद्धा आपल्याला सांगितलंय - 'प्रसंगी अखंडित वाचीत जावे' पण लक्षात कोण घेतो?

एका पददलिताच्या कुटुंबात जन्माला आलेल्या माणसाने आपला देशाचा संविधानाच्या माध्यमातून इतिहास बदलून तर एका सुताराच्या कुटुंबात जन्मलेल्या मुलाने जगाचा इतिहास बदलून टाकला. हे खरं तरी वाटतं का? सभोवती मोठी माणसं नव्ही. चांगले मित्र नव्हते, वातावरण नव्हतं, मग या मुलानं मित्र मिळवायचा निश्चय केला. मित्र अर्थातच पुस्तकातलेच. मार्गदर्शन घ्यायचे ते जगातल्या थोर विचारवंतांचे. त्यांच्या ग्रंथातल्या शिकवणुकीपासून मग वाचनाचा झपाटा लावला. उसनी पुस्तकं आणायचा, घरातलं काम आटोपलं की स्वारी पुस्तकाच्या आधीन व्हायची. त्याला विचारावं खतपाणी मिळालं, त्याचं मन विशाल झालं, बुद्धी प्रगल्भ अन् चौरस झाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगला आकार प्राप्त झाला आणि हा सुतार

पुत्र एक दिवस अमेरिकेचा प्रेसिडेंट झाला. त्याचं नाव आब्राहम लिंकन म्हणून म्हणतो - खूप वाचा. वाचनाने घडतो मानव.

### ७.५.४ आरोग्य धनसंपदा :

अजून आठवतंय मला! असेन फार तर मी सहा-सात वर्षाचा! गावातील घरासमोरील अंगणात, दिवेलागणीला माझी आई तुळशी वृंदावनापाशी मला हात जोडून 'शुभंकरोती' म्हणावयास लावायची.

शुभंकरोती कल्याणं आरोग्यं धनसंपदा!

यातही आरोग्याला अग्रक्रम दिला आहे. पद, पैसा, प्रतिष्ठा, धनदौलत, संपत्ती इत्यादी पण... नंतर. त्यावेळी आरोग्याला इतक महत्त्व का? समजलंच नाही. त्यानंतर शाळेत जाऊ लागलो. आम्हाला एक पी.टी. शिक्षक होते. सुरुवातीलाच त्यांनी आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले. लोकमान्य टिळकांनी सुदृढ शरीर संपदेसाठी शोलय जीवनातील महत्त्वाचे एक वर्ष वाया कसं घालवलं हे सुद्धा सांगितले. ज्याचं शरीर सुदृढ त्याचं मनही निकोप निरोगी. म्हणून तर त्यांनी इंग्रजांच्या कैदेत असतानाही गीतारहस्यासारखा मौलिक ग्रंथ लिहिला. संबंध आयुष्यभर स्वराज्यासाठी झगडणाऱ्या, नाही नाही त्या इंग्रजांच्या जीवघेण्या छळाला हसतमुखाने सामोरे जाणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात असताना नियमित व्यायाम करुन शरीर कमावलं, ज्याचं सुदृढ व निरामय शरीर असेल तोच जीवनात काही करु शकतो हे त्यांनी जाणलं होतं व बरेचसे काही करुन दाखवले होते.

शिवकाळात वारंवार होणाऱ्या मोगलांच्या स्वाऱ्या, वारंवार येणारी संकटं, साथीचे रोग, सर्वच अस्थिरता या साऱ्या संकटाची जाणीव असलेल्या एका तरुण व व्यायामवेड्या संताने उभ्या महाराष्ट्रात पायी प्रवास करुन तरुणांना बलोपासनेचे महत्त्व पटवून देऊन गावोगावी शक्तीचे दैवत असलेल्या मारुतीची मंदिरे उभारली, तालिमखाने उभारली. राकट देश, कणखर देश खऱ्या अर्थाने बलदंड बनविला. तो संत रामदासांनी! त्यांनी शिवबाला स्वराज्याचे तोरण बांधण्याचा संदेश दिला. आरोग्य संपन्न, निकोप शरीराची रत्नाची खाणच जणू राजांना दाखविली. त्या खाणीतूनच शूर बलदंड, पराक्रमी वीररत्ने पारखून घेतली. त्यात निधड्या छातीचा सिंहासारखा नरवीर तानाजी, अनेक शत्रूंशी एकाकी लढणारा महाकाय बाजीप्रभू, सौदामिनीनेही लाजेने मान खाली घालावी अशी चपळता असणारा यसाजी कंक, आदी लग्न कोंढाण्याचे मग रायबाचे म्हणून लढण्याला महत्त्व देणारा तानाजी, संताजी-धनाजी-दत्ताजी असे कितीतरी नररत्ने छत्रपतींच्या खजिन्यात होती. अशी आरोग्य संपन्न, सुदृढ, निरोगी शरीराची आणि मनाची माणसं राजांना लाभली म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीत त्यांना स्वराज्याचं तोरण बांधता आले.

आरोग्य हे जीवनाचं उत्कृष्ट ध्येय आहे. आदर्श श्रेष्ठ जीवनाचं ते एक महत्त्वाचं साधनही आहे. चित्तवृत्ती नेहमी प्रसन्न, आनंदी असणं आणि कार्यक्षमता सदासर्वदा अबाधित राखणे हेच खरं आरोग्य म्हटलं पाहिजे. आपलं शरीर हे देखील एक यंत्र आहे. यंत्राची आपण नेहमी काळजी घेतो. तशी शरीराचीही घ्यावी लागते. व्यायामानं शरीर बलदंड होते. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, आदर्श आरोग्य आजकाल दुर्मिळ झालंय. शरीर कमावण्याचे जे दिवस असतात त्याच वयात व्यसनानी शरीर पोखवरले जाते. अनेक रोगांच माहेरघर बनते. नियमितपणा हाच

नियम करायचा. बलवान व्हायचं पण त्याचा दुरुपयोग करायचा नाही. अन्याय निपटण्यासाठीच बळाचा वापर करायचा.

सुंदर कपडे, हातात कडं, कानात बाळी (डूल) केसाची झुलपं, केस-नखं वाढवणं हा नखरा आजकाल दिसतो. ह्या बाह्यगोष्टींनी सौंदर्य खुलवण्यापेक्षा उत्तम प्रकृत्ती, नैसर्गिक सतेजता, प्रसन्नता यामुळं व्यक्तिमत्त्व कसं खुलून दिसतं. सामर्थ्य हेच पुरुषाचे सौंदर्य आहे. हे प्रत्येकाला उमगायला हवे. सुदृढ शरीर हाच अलंकार आहे.

आजचे हे जीवन दगदग, धावपळ आणि चढाओढीचे स्पर्धेचे आहे. शरीर जर सुदृढ असेल तरच सर्व गोष्टी साध्य होतात. 'आरोग्य भाग्यसाधनं' म्हणजे आरोग्याने भाग्य लाभले. शरीरमाध्यम खलु धर्म साधनं! शरीर बल हे पाहिलं धर्मसाधन आहे. आरोग्यच मोठी धनदौलत आहे. 'सिरसलामत तो पगडी पचास' याचा अर्थच असा की, आपण शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असलो तर कोणताही पुरुषार्थ, कर्तृत्व आपण करुन दाखवू.

### ७.५.५ सुशिक्षित बेरोजगाराचे आत्मकथन :

हसा हसा! बरोबर, तुम्ही हसणारच! आमच्या व्यथा तुम्हाला कशा कळणार? 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे', दु:ख कोणाला सांगू नये म्हणतात. पण ते जर सांगितले तर आपलं दु:ख हलकं होतं. म्हणून तुम्हाला त्रास देतोय.

बघा ना! आजही नोकरी मिळाली नाही. गावातून शहरात आलो. ते उच्च शिक्षण घेऊन एक सुयोग्य नोकरी मिळविण्यासाठी. जेणेकरुन खेड्यात जमीन गहाण ठेवून माझं शिक्षण पूर्ण करणाऱ्या वडिलांचे पांग फेडता येईल. पण कसलं काय? आजही नोकरी मिळाली नाही. वि.वा. शिरवाडकरांच्या नटसम्राटाने टाहो फोडला होता, 'कुणी घर देता का रे घर' म्हणून मलाही असंच ओरडावंस वाटतंय - 'कुणी नोकरी देता का हो नोकरी?' पोटाची खळगी भरण्यासाठी, आईबापाचे पांग फेडण्यासाठी, अन् जीव जात नाही म्हणून शरीर जगविण्यासाठी कुणी नोकरी देता का हो नोकरी?

मी एका छोट्याशा गावातील एक तरुण बेरोजगार, हे माझं विशेषण. लहानपणी शिक्षणाची आवड म्हणून वडिलांनी परिस्थिती नसताना हातात पाटी दिली आणि शेतातील साऱ्या कामाचा भार स्वतःच्या खांद्यावर घेतला. गावातली प्राथमिक शाळा, मग तालुक्यातील माध्यमिक शाळा अन् मग महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी शहराकडे, असा प्रवास करत मी आज एम.कॉम झालो. शहरात राहण्याचा, खाण्याचा व पुस्तकांचा खर्च करण्यासाठी वडिलांनी जमिनीचा तुकडा गहाण टाकला. पण माझ्या शिक्षणात अडथळा येऊ दिला नाही. मी दहावी, बारावी, बी.कॉम आणि एम.कॉम पास झालो हे ऐकून त्यांना केवढा आनंद झाला म्हणन सांगू आता. नोकरी करुन पैसा घेऊन ये व गहाण पडलेल्या आपल्या काळ्या आईला सोडव. या बाबाच्या उद्‌गारानं मी गहिवरलो.

म्हणून मी नोकरी शोधतो आहे. मी घेतलेल्या शिक्षणाचा जनतेला फायदा व्हावा यासाठी तडफडतो आहे. पण छे! वशिल्याशिवाय नोकरी अशक्य आहे. कुणातरी बड्या व्यक्तीचा वशिला सगळ्यात वर ठेवला तर खालच्या गुणपत्रिकेचा व प्रमाणपत्राचा कुणी विचारही करत नाही. याउलट तुमची गुणवत्ता कुवत नसली तरी या वशिल्याच्या भरवशावर तुम्हाला नोकरी मिळणारच!

वशिल्याशिवाय आणखी एक माध्यम म्हणजे पैसा. तुम्ही पैसे द्या अन् नोकरी मिळवा. जणू काही उपकारच करताहेत ते आमच्यावर मुलाखतीला प्रश्न विचारण्याऐवजी तुम्ही या जागेसाठी किती पैसे देऊ शकता असा दबकत प्रश्न विचारला जातो. जो जास्त पैसे देईल त्याला ती नोकरी मिळेल.

जिकडे तिकडे भ्रष्टाचार, वशिलेबाजी, सामाजिक विषमते बरोबरच आर्थिक विषमताही निर्माण झाली आहे. ज्याच्याजवळ पैसे तो बलवान अन् गुणवान, गरीबाच्या घामाचा पैसा स्वतःच्या तिजोऱ्यांमध्ये भरुन हे श्रीमंत मजा करतात अन् बिचारा गरीब तोच पैसा व्याजाने घेऊन स्वतःच्या पोटाची खळगी भरतो. आज प्रामाणिकपणा तर औषधालाही सापडत नाही. जो खरोखर प्रामाणिक आहे त्याचीही या साऱ्या धामधुमीत ओढाताण होते. अन् शेवटी याच दुष्टचक्रात तोही सापडतो. जसे कीड लागलेले फळ किंवा कांदा इतर फळांनाही खराब करतं तशीच परिस्थिती निर्माण झालीय. म्हणूनच आजचा तरुण भरकटतोय. पैसा मग ती कुठल्याही मार्गांन मिळो त्यांना हवा आहे. माझाही जीव असाच चिडतो. मनावरील ताबा सुटतो. वाटतं आपणही असाच पैसा कमवावा झटपट. पण नाही अप्रामाणिकपणा मला करायचा नाही. पण मग मी करु तरी काय ?

आपला मुलगा नोकरी करुन पैसा मिळवणार या आशेवर आई-बाबा जगताहेत, धाकटा भाऊ म्हणतो "दादा, मला तुझ्यासारखं खूप शिकायचय पण... मी काही करु शकत नाही. माझ्याजवळ ना पैसा, ना वशिला. आहे तो फक्त प्रामाणिकपणा. काम करण्याची जिद्द व गुणवत्ता."

एक बेरोजगार तरुण म्हणून मला हिणवलं जातं. पण मला आशा आहे. माझ्या प्रामाणिकपणाचं फळ मला मिळेलच. मी निराश होऊन प्रामाणिकपणाची कास कधीही सोडणार नाही.

### ७.५.६ विज्ञान आणि मानव :

भारत आणि श्रीलंका क्रिकेट सामना दुरदर्शनवर पाहण्यात आमच्या घरातले आणि मी सुद्धा अगदी रंगून गेलो होतो. भारताची सरशी होत होती. एकामागून एक झेलबाद होत होता. चौकार आणि षटकाराची बरसात होत होती. या सामन्यात विजय मिळणारच याची खात्री निर्माण झाली होती अन् इतक्यात विजेनं 'दगा' दिला. अस्सा राग आला म्हणता पण घरातल्या घरात चरफडल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. जरा वेळानं वीज आली अन् भारताचा दणदणीत विजय झाल्याचा मनसोक्त आनंद लुटता आला.

मानवी जीवन आणि विज्ञान आज इतकं एकरुप झालेलं आहे की, विज्ञानाशिवाय मानवी जीवन शक्यच नाही. आजचा माणूस यंत्रमय झाला आहे. यंत्रदेखील विज्ञानाचीच किमया आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मानवाला विज्ञानाची साथसंगत ही लागतेच.

विज्ञान उंचच उंच भरारी मारली. माणूस चंद्रावर पोहचला. आज माणूस नेत्रदान, रक्तदान, देहदान करु शकतो. शरीराचा कोणताही अवयव कृत्रिमरित्या तयार करता येतो. विविध शस्त्रक्रिया, प्रत्यारोपणे विज्ञानाच्या आधारे सहज करता येतात. असे विज्ञानाचे अचाट पराक्रम आहेत. माणूस विमानाच्या साहाय्याने उंच भरारी मारु शकतो तर पाणबुडीच्या साहाय्याने तो अथांग सागरतळाचा शोध घतो. आता तर अंतराळातही तो झेपावत आहे.

munotes.in

विज्ञानानं माणसाला सुखाची चटक लावली आहे. पायी प्रवास बैलगाडी, घोडा, उंट, हत्ती यांच्यावरील प्रवासापेक्षा आजचा प्रवासही सुखाचा झाला आहे. रेल्वे, मोटार, बस, आगबोट, विमान इत्यादी प्रवासाची साधने उपलब्ध झाली आहेत. दळणवळणाची साधनेही पूर्वीपेक्षा गतिमान झाली आहेत. पूर्वी एखादा निरोप द्यायचा असला तर एखाद्या माणसाला सांगावा घेऊन जावे लागत असे व त्यानंतर ती माहिती त्या माणसाला समजत असे. पत्रव्यवहार, तार इत्यादी सोयी नंतर निर्माण झाल्या. आज दूरध्वनी, दूरदर्शन, रेडिओ या सुविधा आपल्यासमोर हात जोडून उभ्या आहेत. ही विज्ञानाचीच देणगी आहे.

सर्वात मोठं वरदान म्हणजे वीज. वीजेने सारे मानवी जीवनच व्यापून टाकले आहे. मानव वीजेचा वापर दासीसारखा करीत आहे. बटन दाबले रे दाबले की, लख्खकन् प्रकाश खोलीत पसरतो. वातानुकूलीत हवा फेकली जाते. वीजेच्या आधारे शेकडो मीटर दूरपर्यंत विद्युत पंपाने पाणी शेतीला देता येते किंवा खोल विहीर अथवा इंधनविहिरीतील पाणी उपसता येते. वीजेमार्फतच अनेक अवघड व जोखमीची कामे आज सहज करता येऊ लागली आहेत.

विविध प्रकारची औषधे, दिवसेंदिवस प्रगती करणाऱ्या शस्त्रक्रियेच्या पद्धती, एक्सरे, प्लॅस्टिक सर्जरी यामुळे मानवी जीवनाला संजीवनीच लाभली आहे. त्यामुळेच क्षय (टी.व्ही.), कर्करोग (केन्सर), एड्स यासारख्या दुर्धर रोगांवर उपाय शोधून ते काबूत आणण्याचा प्रयत्न होत आहे. या विज्ञानाने शेतीमध्येही प्रचंड क्रांती केलेली आहे. नवनवीन तंत्रज्ञान शोधण्यात विज्ञान यशस्वी झाले आहे.

करमणुकीची साधने उपलब्ध करुन मानवाला आनंद देण्यात यशस्वी झाले आहे. हे सर्व खरे असले तरी विज्ञानामुळे संहार होण्याचा धोकाही आहे. हे विसरता येत नाही. अण्वस्त्रे म्हणजे संहाराकडे जाण्याचा मार्ग म्हणूनच मानवी शांतता व सुखसमृद्धीसाठी अणुशक्तीचा वापर केला गेला. पाहिजे म्हणूनच म्हणावेसे वाटते की, विज्ञान आणि मानव या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विज्ञानाशिवाय मानव ही गोष्ट आता संभवत नाही. विज्ञान म्हणजे मानवाचे कर्तृत्व आहे. अल्बर्ट आईनस्टाईन यांनी अणुबॉम्बच्या विनाशकारक दुरुपयोग विचारात घेऊन परमाणुशक्तीचा उपयोग विधायक कार्यासाठी जर केला नाही तर मानवाचा विध्वंस होण्यास वेळ लागणार नाही असे म्हटले होते. त्यामुळे विज्ञानाचा उपयोग मानवजातीच्या कल्याणासाठीच झाला पाहिजे.

### ७.५.७ स्त्रीशक्ती :

स्त्रीशक्ती हा एक संयुक्त शब्द आहे. स्त्री आणि शक्ती हे दोन्ही शब्द आपला आपला विशिष्ट अर्थ व्यक्त करतात. मुळात मानवजातीचे ही दोन रुपे आहेत. एक स्त्री आणि दुसरे पुरुष. या दोघांनाही मनुष्य म्हणतात. स्त्री आणि पुरुष यांच्यात अतिशय घनिष्ट संबंध आहे. या विशाल-महान-विस्तृत जगाच्या अस्तित्वात मूळ स्त्री व पुरुषच कारणीभूत आहेत. स्त्री आणि पुरुष हे शिव आणि शक्तीचे प्रतीक आहेत. त्यांच्या कल्पनेतून, साधनेतून आणि कार्यातून या सुंदर सृष्टीसौंदर्यात भर पडली आहे.

स्त्री पुजनीय, वंदनीय, आदरप्रीय आहे. कारण तिच्यामध्ये सर्वशक्तीमान देवताचा अंश असतो, असे मानले जाते. त्याची विविध रुपे आपणाला आपल्या अवती-भोवती पहायला मिळतात. त्याहीपेक्षा स्त्रीही सर्वप्रथम आपल्या सर्वांची माता आहे. म्हणजे जननी आहे. तिनेच

आपणा सर्वांना या धरित्रीवर जन्म दिला आणि आयुष्य बहाल केले. फुलापेक्षाही कोमल असलेल्या नवजात मुलाला आपल्या प्रेमळ स्पर्शाने नवतरुण आणि स्वावलंबी बनवते. त्या महान स्त्रीशक्तीचाच संचार प्रत्येक नवतरुणात पहायला मिळतो. तिचीच कृपा आहे. हीच स्त्री लहान मुलाचे केवळ संगोपनच करीत नाही तर त्याला सुसंस्कारीत करते. म्हणून आईलाच आपली पहिली शिक्षिका तर घर हीच मुलाची पहिली शाळा आहे, असे मानले जाते.

समाजामध्ये स्त्री पुरषाच्या खांद्याला खांदा लावून त्याच्या बरोबरीने जीवनाच्या सर्व क्षेत्रात वावरत आहे. ती त्याची सहचारिणी आणि मैत्रिणसुद्धा आहे. कोणी तरी म्हटले आहे की, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो. हे म्हणणे अगदी तंतोतंत खरे आहे. या संदर्भात काही दाखलेही देता येतील. माता जिजाऊंमुळे शिवराय घडले, क्रांतिज्योति सावित्रीमाईमुळे महात्मा फुले घडले तर माता रमाईमुळेच डॉ. बाबासाहेब! असे कितीतरी ऐतिहासिक दाखले देता येतील. या सर्व महापुरुषांच्या मोठेपणामागे एक स्त्री निश्चितच उभी आहे.

स्त्री शारीरिकदृष्ट्या नाजूक असली तरी आत्मशक्ती, धैर्य, जिद्द आणि बुद्धिमत्ता हे गुण तिच्या ठायी आहेत. ती कोमल कांतीची आहे म्हणून तिला कोमलांगी म्हणतात. नाजूक कोवळ्या फुलांबरोबर तिची तुलना केली जाते. कोमलता हे तिचे रुप आहे परंतु कोमलता-नाजूकपणा तिचे सर्वस्व नाही. प्रसंगानुरुप ती भिन्न-भिन्न भुमिका निभावते. सौंदर्यात्मकतेत ती अप्सरेचे रुप धारण करते. जसे रंभा, उर्वशी, मेनका, तिलोत्तमा, शौर्यामध्ये ती महिषासूरमर्दिनी बनते. तिच्या ठायी असलेल्या सौंदर्यामुळे ती केवळ विश्वसुंदरीच बनत नाही तर झांशीची राणी, इंग्लंडची राणी एलिझाबेथ, रझिया सुलतान बनून तिने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. त्यामुळे ती केवळ शरीराने कोमल नाही तर वीर, साहसी, पराक्रमी आणि शक्तिशालीसुद्धा आहे, हेच सिद्ध होते. हीच स्त्री जशी साहसी, धाडसी, पराक्रमी आहे तशी पतिपरायणसुद्धा आहे. जगात तिने अनेक पराक्रम दाखविले आहेत. त्यात महासती अनुसाय, सती सावित्री, महासती अरुंधती, रेणुका, मंडोदरी इत्यादींनी पतीला परमेश्वर मानून त्याची पूजा करुन अपरंपार शक्ती प्राप्त केली आहे. आजही पूजनीय, वंदनीय म्हणून त्याचे स्मरण केले जाते.

स्त्रीमध्ये सहनशीलतासुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तिला सहनशीलतेचे प्रतीक मानले जाते. सहनशीलतेच्या बाबतीत ती धरित्री मातेसम आहे. ज्याप्रमाणे धरणीला किती उखडले, जाळले, भाजले तरी ती जसे सहन करते तसे स्त्रीची सहनशीलता अमर्याद आणि अनंत आहे. म्हणूनच ती संतापी, व्यसनी, आळशी पतीने कितीही छळले तरी त्याच्याशी जमवून घेण्याचा प्रयत्न करते. मुलांनी, कुटुंबातील, नात्यातील लोकांनी दिलेला त्रास सहन करते असा सहनशील जीव म्हणजे स्त्री!

स्त्री त्यागाचे मूर्तिमंत प्रतीक आहे. दुसऱ्याच्या सुखासाठी वेळप्रसंगी ती स्वतःच्या सुखाला पारखी होते. पती कुटुंब चालविण्यास असमर्थ ठरला तर ती स्वतः पुढाकार घेऊन घर चालवते. घरची आर्थिक परिस्थिती डबघाईला आली तर स्वतःचे दागिने विकायला किंवा गहाण टाकायला ती कधीच मागेपुढे पाहत नाही. एखादी विधवा आई अपार कष्ट उपसून मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी धडपडते. हाच प्रसंग जर एखाद्या पुरुषावर आला तर (विधूर) मुलांच्या शिक्षणाकडे तो दुर्लक्ष करुन दुसरा विवाह करुन आपणांस ऐषआरामात कसे जगता येईल हाच विचार करील. पण स्त्री मात्र या सर्व सुखांचा त्याग करते. त्यामुळे पुरुषाच्या तुलनेत स्त्री

अधिक त्यागी आहे. हेच स्पष्ट होते. प्रसंगी आई उपासपोटी झोपते परंतु मुलांचे योग्य पालनपोषण करते व शेवटी अकाली मरते परंतु मुलांकडून स्वतःसाठी काहीच अपेक्षा करत नाही. म्हणून ती त्यागमूर्ती ठरते.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्त्री कुठली कुठे पोहचली आहे. आज ती लोकप्रिय लेखिका, अभिनेत्री, उद्योजिका, गायिका, संगीतकार, समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय नेता, साहसी सैनिक, प्रामाणिक पोलीस, डॉक्टर, प्राध्यापक, अभियांत्री, शास्त्रज्ञ, इत्यादी भूमिका समर्थपणे पार पाडीत आहे. या सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने तर पुरुषांच्या कंकणभर पुढे गेली आहे. जीवनाच्या हर एक क्षेत्रात ती अग्रेसर आहे. मानवजातीचा मूळ पुरुष मनुने आपल्या मनुस्मृतीत म्हटले आहे की, न स्त्री स्वातंत्र्य अर्हतं परंतु आज असे मानणे म्हणजे असंजमसपणाचे ठरेल. कारण स्त्रीने प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत केले आहे. पूर्वीच्या काळी स्त्री म्हणजे केवळ दासी आणि मुलांना जन्म देणारी मशिन मानले जात असे परंतु आज तीच स्त्री सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक प्रगतीचे यंत्र बनली आहे. याबद्दल दुमत होण्याचे काहीच कारण नाही. या स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याचा गौरव करताना क्रांतिसूर्य म. ज्योतिराव फुले म्हणतात -

"एका पुरुषाचे शिक्षण हे बहुधा त्याचे एकट्याचे शिक्षण ठरेल. पण एका स्त्रीचे शिक्षण म्हणजे भावी पिढीचे शिक्षण असते." भावी पिढीला सुसंस्कृत आणि सुनितीमान करण्याचे फार मोठे सामर्थ्य या स्त्रीत आहे. या स्त्रीला धर्म-देश-जाती-काळ-परिस्थितीच्या साठीच मर्यादा नाहीत. तिथे रुप भेदातीत आहे. हे सांगताना अखंडादि रचनेत ते म्हणतात -

धर्म-देश-जातीभेद नाही तिला ?। शोभे मनुजाला। खरी माता।।३।।
अशा मानवीस सत्स्त्री म्हणावी।। तिची कीर्ति गावी।। जोती म्हणे।।४।।

**७.५.८ प्रदूषण : एक समस्या :**

आमच्याकडे पाहुणे म्हणून आलेल्या परदेशातील मंडळींना घेऊन मी मुंबईच्या रस्त्याने जात होतो. तशी एक गाडी विशिष्ट रस्त्याने जाऊ लागली तशी एक विलक्षण दुर्गंधी आली. आपोआपोच सर्वांचे हातरुमाल नाकाशी आले.रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग व इतर घाण पाहून परदेशी पाहुण्यांचे डोळे विस्फारले गेले आणि आमची मान मात्र लज्जेने खाली गेली.

आमच्या देशातील नागरिकांचे हे अविचाराचे वागणे लज्जास्पद तर आहेच पण त्याहीपेक्षा सार्वजनिक आरोग्याला घातक आहे हे आमच्या केव्हा लक्षात येणार बरे ? भारतीय माणूस व्यक्तिगत स्वच्छतेचा जेवढा विचार करतो त्याच्या शतांशाने देखील तो सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष देत नाही. परिणामी स्वतःच्या घरातील कचरा तो रस्त्यावर टाकतो. पान-तंबाखूच्या पिचकाऱ्या वा निरुपयोगी कागदाचे कपटे कोठेही फेकून देतो. आळस, कामचुकारपणा आणि कामाचा वाढता व्याप यामुळे कचरा उचलरणारेही वेळेवर कचरा उचलत नाहीत. कचऱ्यातून प्लॅस्टिक, कागद, खिळे यांच्या विक्रीवर पोट भरणारे कचरा विखरुन टाकतात. आपल्या भाजीविक्रीच्या मंडया ह्या कचऱ्याच्या ढिगांनी भरलेल्या दिसतात. हे सारे हवेच्या प्रदूषणाला आमंत्रण ठरते. त्यामुळे निसर्गाच्या समतोल आपण बिघडवत आहोत याची आम्हाला जाणीवच नसते.

स्वतंत्र भारतामध्ये कारखानदारी विलक्षण वाढली हे आम्ही गौरवाने सांगतो परंतू पुण विचाराअभावी किंवा नियोजनाअभावी सुरु केलेली कारखाने हवा आणि जलप्रदूषण निर्माण करतात. हे आमच्या लक्षात आले नाही. त्यासाठी कारखान्याभोवती भरपूर झाडे लावणे आवश्यक आहे. कारखान्यांचे विकेंद्रीकरण केले पाहिजे हे लक्षात न घेतल्यामुळे आज औद्योगिक विभागात प्रचंड प्रदूषण वाढले आहे. प्रचंड प्रमाणात चालणारी वृक्षतोड ही देखील प्रदूषणाला मदत ठरते. कारखान्यातील दूषित, मलीन पाण्यामुळे नद्या समुद्र यांचे पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे नद्यातील पाणी दूषित झाल्यामुळे ते पाणी पिण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही कामासाठी निरुपयोगी ठरत आहे. त्यामुळे केंद्र सरकारला जलशुद्धीकरणाचे काम हाती घ्यावे लागेल. पाणी दुषित झाल्यावर ते स्वच्छ करण्याचा आटापीटा करण्याऐवजी ते दूषित न होण्याची काळजी आपण घ्यायला नको का ?

हवा, पाणी, याबरोबर 'ध्वनीप्रदूषण' ही आज एक मोठी ज्वलंत समस्या ठरली आहे. विशेषतः शहरातील गर्दी, गोंगाट यामुळे ध्वनिप्रदूषण वाढत आहे. आपली उत्सवप्रियता फार अजब आहे. आपले हे सारे उत्सव ध्वनिवर्धकांवाचून साजरे होत नाहीत. मोठमोठ्या आवाजात गाणी लावणे, वाद्य, चौघडा, बॅन्ड वाजवणे, ॲटमबॉम्बसारखे मोठ्या आवाजाचे फटाके यामुळे ध्वनिप्रदुषण मोठ्या प्रमाणात होत आहे.

पृथ्वीच्या पर्यावरणाच्या बाहेर सर्वत्र ओझोन वायू आहे. पृथ्वीचे जीवसृष्टीचे संरक्षण होण्यासाठी हा वायू आवश्यक आहे. पृथ्वीवरील वाढत्या प्रदूषणामुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. हा वायू ओझोनवर अतिक्रमण करत आहे. आणि या हल्ल्यात ओझोन नष्ट झाला तर सूर्याचे अल्ट्राव्हायोलेट किरण पृथ्वीवर येतील व येथील सजीवसृष्टी पार नष्ट होईल अशी भीती वाटते.

प्रदूषणाच्या या समस्येची भयानकता सर्वांना उमगली पाहिजे. याबाबतीत समाजशिक्षण व समाजप्रबोधन झाले पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्ती याबाबत जागरुक राहिल्यास ही समस्या अल्पावधीतच सुटू शकेल अशी आशा वाटते.

### ७.५.९ प्लॅस्टिकचे साम्राज्य :

प्लॅस्टिकचे साम्राज्य म्हटल्याबरोबर मला काही ऐतिहासिक साम्राज्यांची आठवण होऊन गेली. ज्याप्रमाणे राजपूत साम्राज्य, मोगल साम्राज्य, ब्रिटिश साम्राज्य इ. साम्राज्य म्हणजे आधिपत्य होय. आम्ही इतिहासात अभ्यासले आहे की मानवाच्या प्राचीन कालखंडाला शिलायुग म्हणून ओळखले जाते. या काळात दगडांना फार महत्त्व होते. दैनंदिन जीवनातील बऱ्याचशा वस्तू दगडापासून बनवल्या जात होत्या. प्राण्याची शिकार करण्याची शस्त्रास्त्रे दगडापासून बनवली जात होती. या काळातील माणूस मोठ्या खडकात कोरलेल्या गृहेत राहत असे. भोजनासाठी वापरली जाणारी ताट-वाटी, घरोटे (जाते), घागर, हंडा, पाटा, वरवंटा हीच त्याची संपत्ती सुद्धा होती. या काळातील देवदेवतांच्या मूर्तीसुद्धा दगडात कोरलेल्या होत्या. म्हणून आपण या युगाला शिलायुग म्हणून ओळखतो.

मनुष्याचा जेव्हा बौद्धिक विकास होऊ लागला तेव्हा त्याने लोखंडाचा शोध लावला. लोहखनिजाबरोबरच त्याने तांबे आणि पितळ या खनिजाचा शोध लावला. लोखंडाची साधनसामुग्री आणि शस्त्रास्त्रे बनविण्यास प्रारंभ केला. आपल्या दररोजच्या व्यवहारातील तांब्या

पितळेची भांडी, ढाल, तलवार, भाला इ. काही शस्त्रास्त्रे त्याने बनविली. यावरुन असे लक्षात येते की, मानव रानटी पशूपेक्षा थोडा थोडा सुधार होता कारण तो दगडमातीच्या भांड्यापेक्षा लोखंडी-तांबे-पितळेच्या वस्तू तो व्यवहारात आणू लागला. त्याचे महत्त्व वाढले होते. आता तो प्राण्यांची शिकार दगडाच्या शस्त्राने न करता लोखंडाच्या शस्त्राने करु लागला. त्यामुळे दगडाचे महत्त्व कमी झाले आणि लोखंडाचे महत्त्व वाढले. म्हणून या युगाला एक खास नाव दिले गेले ते म्हणजे ताम्रयुग होय. ताम्रयुगात तांबे-पितळेच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात बनविल्या जात असत.

जेव्हा सोन्याचांदीचा शोध लागला तेव्हा मनुष्य लोखंड, तांबे, पितळ सोडून सोने आणि चांदीच्या मागे लागला. सोन्या-चांदीचा त्याला इतका हव्या वाढला की, यापासून बनवलेल्या वस्तूसाठी तो आपापसात लढू लागला. लढता लढता तो एक दुसऱ्याचे प्राण घेऊ लागला. इतिहासातील राजाधिराज एक दुसऱ्यावर आक्रमण करुन शत्रूराष्ट्रातील सोने-चांदी-हिरे-मोती या साऱ्या चीजवस्तू लुबाडत होते. या अर्थाने या कालखंडाला सुवर्णयुग मानले जाते. कारण या कालखंडात सोने आणि चांदीलाच सर्वोच्य महत्त्व होते. राजामहाराजा, श्रीमंत लोक सोन्याचांदीच्या ताटात भोजन करीत होते.

त्यानंतर ॲल्युनियमचा जेव्हा शोध लागला तेव्हा ॲल्युनियमचा सगळीकडे फारच बोलबाला जाला. प्रत्येकजण ॲल्युनियमच्याच वस्तु खरेदी करु लागला. घराघरात जिकडेतिकडे ॲल्युनियमच ॲल्युनियम घरातील भांडीकुंडी, खिडक्या, दरवाजे, संदूक, पाच-दहा-वीस पैशाचे नाणे ॲल्युनियमचे बनविले जात होते. म्हणून या युगाला ॲल्युनियमचे युग म्हणणेच जास्त उचित ठरेल. ॲल्युनियम तांबे-पितळ यांच्यापेक्षा अतिशय स्वस्त त्यामुळे सगळीकडे ॲल्युनियमचा उपयोग होऊ लागला. म्हणून याला ॲल्युनियमचे साम्राज्य म्हणू या.

ॲल्युनियमच्यानंतर स्टेनलेस्टीलचा जमाना आला. त्याचा वापर वाढू लागला. स्टीलच्या चकचकीतपणाला प्रत्येकजण दिपून गेला. त्यामुळे स्टीलच्या वस्तूकडे आकर्षित झाला आणि स्टीलच्या तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूंनी घराची शोभा वाढविली. स्टीलमुळे घराचे सौंदर्य वाढू लागले. कुठल्याही घरी गेले तरी चमक जाणवू लागली. भांड्यावर साधी नजर टाकली तर ते जणू हसताहेत असा भास होऊ लागला. या स्टीलच्या भांड्यांना पावडरने घासले तरी चकाचक होतात. त्यामुळे तांब्या-पितळेची भांडी हद्दपार करुन टाकली. आणि ज्या घरात तांब्या-पितळेची भांडी वापरली जातात ते घर मागासलेले मानण्याइतकी लोकांची मजल जाऊ लागली. स्टेनलेस स्टीलचे स्थान अढळ बनले. त्यामुळे याला स्टीलचे साम्राज्य म्हणता येईल.

अशातऱ्हेने शिलायुग, ताम्रयुग, सुवर्णयुग, ॲल्युनियमचे युग, स्टेनलेसस्टीलचे युग आली व गेली. या कालखंडात सगळीकडे आबादी आबाद होते. स्टेनलेस स्टीलचे साम्राज्य सगळीकडे पसरले असतानाच त्यावर शनिदेवाची वक्रदृष्टी पडली. स्टेनलेस स्टीलवर संकट आले. हळूहळू त्याचे महत्त्व कमी होऊ लागले. जनमानसामध्ये प्लॅस्टिकचा बोलबाला झाला आणि स्टेनलेस स्टील आपले अस्तित्व गमावून बसले. त्यामुळे आज सगळीकडे प्लॅस्टिकचे साम्राज्य प्रस्थापित झाले आहे.

या प्लॅस्टिकचे साम्राज्य प्रस्थापित होण्यामागे प्लॅस्टिकच्या अंगी असणारे अनेक गुण आहेत. प्लॅस्टिक हलके-फुलके, कधीच न मळणारे, चोराच्या नजरेत न भरणारे असल्यामुळे, गरीबापासून ते श्रीमंतापर्यंत सगळ्यांनी त्याला आपलेसे केले आहे. म्हणून प्लॅस्टिकही विसाव्या शतकातील अनमोल देणगी आहे. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. प्लॅस्टिक, रबर, नायलॉन आणि फायबर हे प्रत्येक कुटुंबाचा एक सदस्यच झाला आहे. दैनंदिन जीवनात

प्लॅस्टिकला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कळत न कळत आपण ती घेतो व देतो. आपण जेव्हा दुकानातून अर्धा-एक किलो साखर घेतो तेव्हा दुकानदार ती प्लॅस्टिक पिशवीमध्ये देतो. आपण ती सहज घरी घेऊन जाऊ लागतो. रस्त्यात पाऊस आला तर आपण सहज भिजून जाऊ पण आपली साखर सुरक्षित राहील. भाजीपालासुद्धा आपणाला प्लॅस्टिकच्या पिशवीतून सहज नेता येतो. आपल्या बाथरुमचा दरवाजा लोखंडी असेल तर कालांतराने तो गंजतो, लाकडी असेल तर पाण्याच्या माऱ्यामुळे कुजून जातो. लोखंड आणि लाकडापेक्षाही स्वस्त परंतु मजबूत आणि टिकावू जर कोणती वस्तू असेल तर प्लॅस्टिक दरवाजे!

बाहेर कुठे सहलीला जायचे असेल तर पूर्वीसारखे स्टेनलेस स्टीलची भांडीकुंडी घेउन जाण्याची आज गरज नाही. त्याऐवजी प्लॅस्टिकचीच घागर, बादली, मग, ताट-वाटी-ग्लास, काटे-चमचे बरोबर नेण्याची सोय झाली आहे. ते वजनाने हलके असल्यामुळे सहज वाहून नेता येतात व किंमतीने स्वस्त असल्यामुळे फेकल्याचेही दुःख होत नाही. स्त्रियांचा शृंगार पूर्वी सोने-चांदी-हिरे-मोती यांच्यापासून पूर्वी बनविला जात असे. परंतु ते आज खूपच महाग आणि दुर्मिळ झाले आहे. त्यामुळे सर्वसाधारण स्त्रिया ते विकत घेऊ शकत नाही. परंतु कमी पैशात प्लॅस्टिकचे दागिने घेऊ शकते. आजची स्त्री सजण्यासाठी प्लॅस्टिकच्या दागिन्यांचा वापर करु लागली आहे. केस विंचरण्यासाठी प्लॅस्टिकचा कंगवा, प्लॅस्टिक हेअर पिन, रबरबँड,प्लॅस्टिक अथवा नायलॉनची रंगीबेरंगी फुले, कानातील बाळी, टॉप्स, रंगीबेरंगी आणि चमकदार बांगड्या, प्लॅस्टिक मोत्याच्या गळ्यातील माळा, हातातील रंगी पर्स, पायात हलकाफुलका उंच टाचेचा चप्पल किंवा सँडल, डोळ्यावर हलक्या वजनाची फ्रेम असलेला चष्मा, इ. या प्रकारची आभुषणे सर्वसाधारण महिला सहज विकत घेऊ शकते. या प्लॅस्टिक आभुषणाऐवजी जर एखादी स्त्री निव्वल सोन्याचांदीचे दागिने घालून रस्त्याने चालू लागली तर तिला खेडवळ म्हणून हिणवले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून आज सोन्या-चांदी दागिने घातलेच तर एखादा कार्यक्रम किंवा लग्नसमारंभातच! त्यामुळे लहान मुलीपासून ते वृद्ध स्त्रीपर्यंत प्लॅस्टिकचे सर्वानाच आकर्षण वाटते.

वीज एक अशी वस्तू आहे तिला स्पर्श होताच मनुष्याचा कोळसा होतो. अशी वीज प्रवाहित करण्यासाठी तांबे किंवा ॲल्युमिनीयमच्या धातूची तार वापरतात. ही वीज प्लॅस्टिकच्या नळीत घालून दूरपर्यंत नेता येते. या प्लॅस्टिकच्या नळीला स्पर्श झाला तरी आपणाला इजा पोचत नाही. अशा अतिशय शक्तीशाली व धोकादायक विद्युतला प्लॅस्टिक निष्क्रिय बनवते. त्यावरुन तरी प्लॅस्टिकच्या साम्राज्याला मानावेच लागेल. पूर्वी बऱ्याचशा पदार्थाची ज्यात

## ७.५.१० संदर्भ ग्रंथ


१. सुबोध मराठी व्याकरण लेखन - प्रा. चंद्रहास जोशी

२. व्यावहारिक मराठी - डॉ. लिलला गोविलकर


❖❖❖❖

# सराव प्रश्नपत्रिका - प्रथम वर्ष कला
# मराठी (अनिवार्य) - द्वितीय सत्र

**(३ तास)** **(एकूण गुण : १००)**

**सूचना :** सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

**प्र. १** 'नापास मुलांची गोष्ट' या ललित लेखसंग्रहातील यशस्वी झालेल्या सुशिलकुमार शिंदे यांचे व्यक्तिचित्रण तुमच्या भाषेत स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

'पन्नास पैकी शून्य मार्क' या विधानाचा आशय स्पष्ट करा.

**प्र. २** यशवंतराव गडाख यांच्या जीवनाच्या वाटचालीचा सविस्तर वृत्तांत तुमच्या भाषेत सांगा. **(२०)**

**किंवा**

'नापास मुलांची गोष्ट' म्हणजे अनुभवाची शिदोरी सविस्तर आढावा घ्या.

**प्र. ३ पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा.** **(१०)**

१) दया पवार
२) कोठे होतो कोठे आलो
३) देवगडची यात्रा
४) शांता शेळके

**प्र. ४** इतिवृत्तलेखन म्हणजे काय ते सांगून अहवालात्मक इतिवृत्ताचा नमुना लिहा. **(१०)**

**किंवा**

वृत्तात्मक इतिवृत्त लिहिण्याचे उद्देश व लेखन पद्धती सविस्तर मांडा.

**प्र. ५** जाहिरातलेखन म्हणजे काय ते सांगून जाहिरातीच्या मजकुरातील महत्त्वाचे घटक सांगा. **(१०)**

**किंवा**

साडीच्या दुकानाची जाहिरात करा.

**प्र. ६ पुढील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

मैत्रीमध्ये सहवासाला काही महत्त्व असतेच. जुन्या लोणच्यासारखी जुनी मैत्री मुरत जाते. एकमेकांचे स्वरुप एकमेकांना बरेचसे कळलेले असते. त्यामुळे अशा मित्रासमोर किंवा मैत्रिणीसमोर आपली विशिष्ट प्रतिमा उभी करण्याची गरज राहत नाही. आपण जसे आहोत तसे, निखळपणे, निर्भरपणे आपण तिथे प्रकट होतो. या साध्या स्वाभाविक संबंधातून आपल्याला एक

स्थैर्य लाभते. भोवतालच्या फसव्या, अस्थिर, धूर्त, मतलबी जगात मैत्रिची अशी स्वाभाविक सहज स्थाने म्हणजे आपला एक मोठा आधार असतो. तिथे पायाखालची जमीन ही जमीनच असते. मयसभेप्रमाणे जमीन समजून पाय टाकावा, तर तो पाण्यात खोल जावा आणि पाणी समजून पाऊल टाकायला जावे, तो टणक, खडबडीत जमीन लागावी असे या मैत्रीत घडत नाही. म्हणून मैत्रीचे असे एखादे तरी ठिकाण माणसाला हवेच.

**प्रश्न :**

१) मैत्रीमध्ये कोणत्या गोष्टीला महत्त्व असते ?
२) मैत्रीतून स्थैर्य का लाभते ?
३) मैत्री हा आधार केव्हा ठरतो ?
४) मैत्रीचे एखादे तरी ठिकाण असावे असे तुम्हाला का वाटते ?

**प्र. ७ खालील उताऱ्याचे सारांशलेखन करा.** **(१०)**

या साऱ्या प्रकरणात भरमुअण्णाची हार झाली होती... कायद्याच्या आधार घेऊन मास्तरने बाजी उलटविली होती. पोलिसांच्या घशात पाच-सहा हजार ओतून ही काहीच उपयोग झाला नव्हता. इतकं सारं रामायण घडूनही परत पूर्वीसारखी मुळ पदावर स्थिती झाली होती...पुर्वीसारखीच रुक्की बापाच्या घरात खित्तपत पडली होती आणि ज्याच्यामुळे हे सारं घडलं, त्या शिरप्याला याची काहीच झळ लागलेली नव्हती... अन मास्तरनं आता या अशा आपल्या तांगड्या आपल्याच गळ्यात घातल्या मुळे मधल्या मध्ये आपलीच नामुष्की व्हायची पाळी आली होती. यामुळे भरमुअण्णा पिसाळून गेला होता... या मास्तराचं काय करु नि काय नको, असं त्याला झालं होतं... मास्तरला कशाप्रकारे सतवता येईल, याचा विचार करण्यातच एक-दोन दिवस उडाले... एके दिवशी तो गडीमाणसे घेऊन तावातावाने गेला आणि मास्तराच्या माळावरल्या गोठ्यातील साऱ्या ढोरांची दावी कापून त्यांना बाहेर पिटाळून लावलं. गोठ्याभोवती मारलेल्या दोन-तीन हजाराच्या पत्र्याचा व आतल्या हजारभरच्या लाकडा-शेणकुट्यासह सर्व छपरांचा ताबा अण्णानं घेतला. अण्णाच्या चुलतभावाच्या नेमर्गोडाच्या मालकीच्या त्या माळावर मास्तरंन ते छप्पर बांधलेल... गेली वीस वर्षे ते छप्पर तेथे होतं. कुणाचा काही वाद नाही. काही नाही, पण त्या प्रकरणाच्या चिडीनं अण्णानं मास्तरला तेथून हुसकावुन ते सारं आच्युती आपल्या पदरात पाडुन घेतलं... अण्णाची मास्तराबरोबर घासाघासी सुरु झाल्यावर सारी भावकीही अण्णाच्याच बाजुने; त्यामुळे अण्णाच्या या कृत्याला नेमर्गोंडाची मुक संमत्तीच असल्याप्रमाणे झाली होती.

**प्र. ८ पुढीलपैकी कोणत्याही विषयावर निबंधलेखन करा.** **(१०)**

१) ग्रंथ हेच गुरू
२) आरोग्य धनसंपदा
३) सुशिक्षित बेरोजगाराचे आत्मकथन
४) शिक्षणमंत्री झालो तर

❖❖❖❖